Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.

महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक २७० * * नागपूर * | शुक्रवार, दिनांक २७ डिसेंबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## आमदार बालाजी किणीकर यांच्या हत्येची सुपारी



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई,दि. २६ :**
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार बालाजी किणीकर यांच्या हत्येचा कट रचण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी ठाणे गुन्हे शाखेने दोघांना ताब्यात घेतले आहे.

अंबरनाथ शहरात शिवसेनेत दोन गट आहेत. याच गटबाजीतून बालाजी किणीकर यांच्या हत्येचा कट रचण्यात आला. किणीकर हे एका कौटुंबिक लग्न सोहळ्यासाठी लातूरला गेले होते. येथेच त्यांची हत्या करण्यासाठी काही शूटर्सना सुपारी देण्यात आल्याची माहिती स्वतः आमदार किणीकर यांना मिळाली होती.

अग्राग्रलेख

**खरीखरी..**

## वाचाळांना कोण आवरणार?

इंडिया आघाडी संघटित होताना म्हणजेच गठबंधन करताना जी जी स्वप्ने आघाडीतील घटक पक्षांनी पाहिली. त्यातील बहुतेक स्वप्ने खरी ठरली आहेत. काँग्रेसचा जसा इतर प्रादेशिक पक्षांना मिळाला. तसाच फायदा इतर प्रादेशिक पक्षांचा काँग्रेसलाही मिळाला. अनेक ठिकाणी काँग्रेसने मोठे मन करून मित्र पक्षाला उदारपणाने जागा दिल्या किंवा सोडल्या. पण हे सर्व करताना इंडिया आघाडी म्हणजे सर्व घटक पक्षांसाठी समान दुवा आहे. हे अनेकांच्या लक्षातच आलेले नाही. बंगालची तृणमूल काँग्रेस आणि अरविंद केजरीवाल यांचा आम आदमी पक्ष या दोघांच्या मतांचा विचार केला. तर कोणे एकेकाळी ही सर्व मते काँग्रेसचीच होती. पश्चिम बंगालमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे शासन असताना त्यांच्याशी त्यांच्याच प्रमाणे जोरदारपणे ममता बॅनर्जी यांनी लढण्याचे काम केले. त्याच बरोबर त्यांच्याशी दोन हात केले. हे सर्वांना मान्य करावेच लागेल. आम आदमी पक्ष म्हणजेच आप ज्या आंदोलनातून उभा राहिला. त्या आंदोलनाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संपूर्ण समर्थन होते. हे आता सर्वच जण बोलतात. अरविंद केजरीवाल आपल्या मताप्रमाणे वागतील असा त्यांचा होरा होता. पण केजरीवाल यांनी अतिशय विचारपूर्वक वेगळी वाट स्वीकारली आणि त्यांनी आम आदमी पक्षाची स्थापना केली. त्यावेळी त्यांच्याबरोबर जे जे लोक होते. त्या सर्व बड्या बड्या लोकांना पद्धतशीरपणे बाहेर काढण्यात आले. आता दिल्लीतून देशाची सत्ता जरी भाजपकडे असली. तरी दिल्लीवर केजरीवाल यांचे राज्य असते. हे गेल्या तीन-चार निवडणुकीत दिसून आलेले आहे. आता प्रश्न असा आहे की, भारताच्या जुन्या इतिहासाप्रमाणे इंडिया आघाडीचे जे कडबोळे आहे. ते सर्व पक्षांच्या महत्त्वाकांक्षेपायी छिन-विछिन्न होते की काय, असे दिसायला लागलेले आहे. ज्या दिल्लीवर काँग्रेसने 15 वर्ष सलग म्हणजेच लागोपाठपणे शासन केले. त्या दिल्लीच्या विधानसभेत काँग्रेसचा एकही आमदार निवडून येऊ शकलेला नाही. काँग्रेसची शक्ती आता आम आदमी पक्षाने धारण केलेली आहे. हे मान्य करायला दिल्लीचे काँग्रेस वाले अजिबात तयार नाहीत. आज दिल्लीतील काँग्रेसचे भूतपूर्व बडे नेते अजय माकन यांनी आपवर अत्यंत गंभीर असे आरोप केलेले आहेत. आता आम आदमी पक्षाने काँग्रेसचा अनेक ठिकाणी पराभव केलेलाच आहे. गुजरात सारख्या राज्यात ज्या ज्या विभागात काँग्रेसचा जोर होता. त्या त्या ठिकाणी आपने जोर लावल्यामुळे पहिल्या निवडणुकीत जवळजवळ सत्तेवर येत असलेल्या काँग्रेसला या निवडणुकीत केवळ 17 जागा मिळाल्या. हरियाणामध्ये आपची मागणी 10 जागांची होती. काँग्रेसने पाच-सहा जागा देण्याचे मान्य केले होते. पण आम आदमी पक्षाचा ज्या एका जागेवर विशेष अट्टाहास होता. ते काँग्रेसला मान्य नव्हते. त्या ठिकाणी आघाडी तुटल्यावर झालेल्या निवडणुकीत काँग्रेसचा उमेदवार विजयी झाला आणि आपचे नेते तेथे सातव्या क्रमांकावर होते. म्हणजे आपच्याही अवास्तव मागण्या असतात आणि काँग्रेसचेही गतवैभवाची स्वप्ने पाहणारे अनेक नेते वास्तविकता विसरतात. ही वस्तुस्थिती आहे. मग आरोप आणि प्रत्यारोपांच्या फैरी सुरू होतात. काँग्रेसमध्ये ज्याला जे वाट्टेल ते बोलायची मुभा असते. त्यामुळेच अनेक वाचाळवीरांच्या बोल घेवडेपणाने नको ते प्रश्न उभे होतात. आता आम आदमी पक्षाने काँग्रेसलाच इंडियातून बाहेर काढण्याचा प्रस्ताव ठेवलेला आहे. हे सगळे महान प्राणी असेच भांडत राहिले. तर राजकारणाच्या जंगलातील सध्याचे सिंहासनाधिष्टीत अधिक मजबूत होतील. हे यांना कळते पण वळत नाही. खरा प्रश्न आहे तो हा की, इंडिया आघाडी मधल्या, सर्व घटक पक्षातील या वाचाळवीरांना कोण आवरणार ?

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# १७ मुलांना बाल पुरस्कार



राष्ट्रपती मुर्मू यांच्या हस्ते वितरण

■ **वृत्तसंस्था नवी दिल्ली, दि. २६ :**
राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुरुवारी राष्ट्रपती भवनात १७ मुलांना पंतप्रधान राष्ट्रीय बाल पुरस्काराने सन्मानित केले. यावेळी १४ राज्ये/केंद्रशासित प्रदेशातील १७ मुलांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. यामध्ये ७ मुले आणि १० मुलींचा समावेश आहे.
बाल पुरस्कार सात श्रेणींमध्ये दिले जातात. ज्यामध्ये कला आणि संस्कृती, शौर्य, नवोपक्रम, विज्ञान आणि तंत्रज्ञान, सामाजिक कार्य, क्रीडा आणि पर्यावरण यांचा समावेश आहे.

राष्ट्रीय बाल पुरस्कार केंद्र सरकारने १९९६ साली सुरू केला. महिला आणि बाल विकास मंत्रालयाने विविध क्षेत्रात असामान्य कामगिरी करणाऱ्या बालकांचा गौरव करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय बाल पुरस्कार सुरू केला. १९९६ पासून पुरस्कार मिळालेली ही मुले कर्तव्याच्या वाटेवर प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये भाग घेतात.

महिला आणि बाल विकास मंत्रालय पंतप्रधान राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी मुलांची निवड करते. ज्या मुलांचे वय ५ वर्षांपेक्षा जास्त आणि १८ वर्षांपेक्षा कमी आहे. जे भारताचे नागरिक आहेत आणि देशात राहतात. त्याला हा पुरस्कार दिला जाऊ शकतो. २०१८ मध्ये शौर्य क्षेत्रात यश संपादन केलेल्या मुलांचाही समावेश करण्यात आला.

सुरुवातीला हा पुरस्कार सहा श्रेणींमध्ये दिला जातो. ज्यामध्ये कला आणि संस्कृती, शौर्य, नवोपक्रम, शिक्षण, समाजसेवा आणि खेळ यांचा समावेश होता. आता त्यात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच या दोन क्षेत्राचीही भर पडली आहे.

पंतप्रधान राष्ट्रीय बाल पुरस्काराच्या प्रत्येक विजेत्याला पदक आणि प्रमाणपत्र दिले जाते. यासोबतच पुरस्कार विजेत्यांना एक लाख रुपयांचे रोख पारितोषिकही दिले जाते.

## एकनाथ शिंदेंनी घेतली पीएम मोदींची भेट



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई,दि. २६ :**
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व भाजप अध्यक्ष जे पी नड्डा यांची भेट घेतली. यावेळी त्यांच्यासोबत त्यांचे सुपुत्र श्रीकांत शिंदे व स्नुषा वृषाली होत्या.

ही सदिच्छा भेट असल्याचे बोलले जात आहे. तसेच विकसित भारताच्या वाटचालीत राज्याचे योगदान याबाबत चर्चा करण्यात आल्याची माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. या भेटीनंतर त्यांनी कल्याणच्या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे.

शिंदे म्हणाले, घडलेली घटना अत्यंत दुःखद आहे, वेदनादायी आहे, माणुसकीला काळिमा फासणारी आहे. कालच श्रीकांत शिंदे यांनी पीडित कुटुंबियांची भेट घेतली आहे. आम्ही सरकारने गांभीर्याने घेतले आहे. यामध्ये जो दोषी आहे आरोपी आहे त्याला फाशीची शिक्षा झाली पाहिजे. असे कृत्य करणाऱ्या नराधमांना जसास तसे उत्तर दिले जाईल, त्यांचा बंदोबस्त केला जाईल, असे शिंदे म्हणाले.

खासदार श्रीकांत शिंदे यांनी देखील कल्याण येथे घडलेल्या घटनेवर संतप्त प्रतिक्रिया दिली होती. आरोपीला फाशीची शिक्षा देण्याचा प्रयत्न आम्ही करणार असल्याचे त्यांनी म्हंटले आहे. तसेच या प्रकरणाची चौकाशी फास्ट ट्रॅक कोर्टात नेण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे देखील त्यांनी म्हंटले होते.

शिंदे यांनी शिवसेनेचे आमदार बालाजी किणीकर यांच्या हत्येचा कट रचण्यात आल्याच्या घटनेवर देखील प्रतिक्रिया दिली आहे. ही देखील अतिशय गंभीर घटना आहे. मी स्वतः लक्ष घातले आहे, गृहविभाग काम करत असल्याचे ते म्हणाले.

## विधानसभा निवडणुकीत गडबड

राहुल गांधींचा भाजपावर आरोप



■ **वृत्तसंस्था, बेळगाव, दि. २६ :**
काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत राहुल गांधी यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालांवर प्रश्न उपस्थित केले आहेत. ते म्हणाले, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात ११८ जागांवर ७२ लाख मतदार जोडले गेले, त्यापैकी भाजपने १०२ जागा जिंकल्या. कुठेतरी काहीतरी गडबड आहे हे स्पष्ट आहे.
पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, भाजपला सर्व घटनात्मक संस्था काबीज करायच्या आहेत. आम्ही लढाई लढत राहू. लोकांचा निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास हळूहळू कमी होत असून निवडणूक आयोगाच्या निःपक्षपातीपणावर प्रश्न उपस्थित होत आहेत.

## पुण्यात ८-९ वर्षांच्या दोन बहिणींचा खून




बारमधील वेटरचे कृत्य

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २६ :**
८ व ९ वर्षांच्या दोन लहान मुलींची हत्या करून त्यांचे मृतदेह खोलीतील पाण्याच्या टाकीत भरून ठेवल्याची भयंकर घटना पुण्याच्या खेड तालुक्यातील राजगुरूनगर येथील एका वस्तीत उजेडात आली आहे. पोलिसांनी या प्रकरणी एका ५० वर्षीय परप्रांतीय आरोपीला अटक केली आहे.

कार्तिकी सुनील मकवाने (९) व दुर्वा सुनील मकवाने (८) अशी मृत मुलींची नावे आहेत. आरोपी परप्रांतील तरुण एका स्थानिक बियर बारमध्ये काम करतात.

पोलिसांनी बारमध्ये काम करणाऱ्या मुलांच्या खोलीची झडती घेतली. तेथील एका पाण्याच्या टाकीत दोन्ही मुलींचे मृतदेह आढळले.

## माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचं निधन



**नवी दिल्ली, २६ डिसेंबर :**
काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचं निधन झालं आहे. प्रकृती खालावल्याने आज त्यांना दिल्लीमधील एम्स रुणालयात दाखल करण्यात आलं होतं. अतिदक्षता विभागात त्यांच्यावर उपचार सुरु होते. डॉक्टरांची एक विशेष टीम त्यांच्यावर उपचार करत होती. पण त्यांना यश आलं नाही. रात्री ९ वाजून ५१ मिनिटांनी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ते ९२ वर्षांचे होते. मागील अनेक काळापासून ते आरोग्यासंबंधी समस्यांचा सामना करत होते. याआधी त्यांना प्रकृतीच्या कारणास्तव अनेकदा रुणालयात दाखल करण्यात आलं होतं.
मनमोहन सिंग यांना ८ वाजून ६ मिनिटांनी रुणालयात आणण्यात आलं होतं. यानंतर अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आलं होतं. मनमोहन सिंग यांना रुणालयात दाखल करताच काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी तिथे पोहोचल्या होत्या. दुसरीकडे बेळगावमध्ये उद्या होणारी काँग्रेसची बैठक रद्द करण्यात आली आहे. राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे आज रात्री बेळगावहून दिल्लीला रवाना झाले आहेत.



**श्रीनगर गुलमर्गपेक्षा थंड**
पर्वतांवर झालेल्या बर्फवृष्टीमुळे श्रीनगरमध्ये पारा उणे ६ अंश सेल्सिअस नोंदवला गेला. गुलमर्गपेक्षा श्रीनगर थंड राहिले. येथील पारा उणे ६.६ अंश सेल्सिअस नोंदवला गेला. मात्र, या मोसमात आतापर्यंत श्रीनगरमध्ये बर्फवृष्टी झालेली नाही. हिमाचलमध्ये बर्फवृष्टी झाल्यानंतर तीन राष्ट्रीय महामार्गांसह सुमारे १३४ रस्ते बंद करण्यात आले आहेत. कोकसरमध्ये सर्वाधिक ५.६ सेमी बर्फवृष्टी झाली.

■ **नवी दिल्ली :** दिल्लीत धुक्यामुळे १८ गाड्या उशिराने धावल्या आहेत. लाहौल-स्पिती येथे बर्फवृष्टीचा आनंद घेण्यासाठी आलेल्या सुमारे १०० पर्यटकांची वाहने अडकली. हर्षिल खोऱ्यात बर्फवृष्टी सुरू आहे. अटारी आणि लेहमधील तीन राष्ट्रीय महामार्ग, कुल्लूमधील सेंज ते औट, किन्नौरमधील खाब संगम आणि लाहौल-स्पितीमधील ग्रम्फूसह एकूण १३४ रस्ते बंद करण्यात आले आहेत. शिमल्यात सर्वाधिक ७७ रस्ते बंद आहेत, तर कुल्लूमध्ये २५ रस्ते, लाहौल-स्पीतीमध्ये ३६ आणि मंडीमध्ये १४ रस्ते बंद आहेत.

# ३१ डिसेंबरला पार्टी करा पण जरा जपून...



चार पेक्षा अधिक पेग मिळणार नाहीत

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २६ :**
डिसेंबर अखेर म्हणजे मद्यप्रेमींना चाहूल लागते ती ३१ डिसेंबरची. अनेकांना मद्य सेवन करत ३१ डिसेंबरच्या रात्री पार्टी करत नवीन वर्षाचे स्वागत कारायचे असते. यासाठी आता ३१ डिसेंबरच्या रात्री पहाटे ५ पर्यंत हॉटेल आणि रेस्टॉरंट सुरू ठेवण्याची परवानगी देण्यात आली आहे. मात्र, याच सोबत निर्बंध देखील लावण्यात आले आहेत. हॉटेल असोसिएशनने कुठलीही गडबड होऊ नये यासाठी काही निर्बंध लागू केले आहेत.

हॉटेल असोसिएशनने ग्राहकांना आता चार मोठे पेग दिल्यानंतर दारू न पिण्याचे आवाहन करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे पार्टी करून परत घरी जाताना कुठली गडबड अथवा अपघात होऊ नये याची खबरदारी घेण्यास मदत होईल.

याच सोबत असोसिएशनने ग्राहकांना दारू देताना वयाची पडताळणी करण्यासाठी ओळखपत्र देखील तपासण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच मद्यपान केलेल्या लोकांसाठी भाड्याने ड्रायव्हर देण्याची देखील योजना हॉटेल असोसिएशनने केली आहे.

हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडियाचे सचिव प्रदीप शेट्टी यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, ३१ डिसेंबरच्या पार्टीच्या निर्णयाबाबत सर्व सदस्यांना कळवण्यात आले आहे. ग्राहकांची सुरक्षितता लक्षात घेऊन सर्व निर्णय घेण्यात आले आहेत. ग्राहकांना चार पेग प्यायल्यानंतर नशा चढल्याचे वाटल्यास सुरक्षितपणे घरी पोहोचवण्याची व्यवस्था करण्याच्या सूचना हॉटेल मालकांना देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, अनेक हॉटेलमध्ये अल्पवयीन मुलांना देखील दारू दिली जात असल्याचे प्रकरणे सुद्धा समोर येत असतात. त्यामुळे आता महाराष्ट्रातील तसेच मुंबईतील सर्वच हॉटेलमध्ये आता वयाची पडताळणी अनिवार्य केली आहे.

यासाठी आता ग्राहकांना त्यांच्यासोबत ओळखपत्र सोबत ठेवणे देखील बंधनकारक आहे. अनेकदा अल्पवयीन मुले दारू पिऊन गाडी चालवतात आणि अपघात घडल्याचे अनेक प्रकरणे गेल्या काही महिन्यात दिसून आले आहे. त्यामुळे आता असोसिएशनने ३१ च्या पार्श्वभूमिवर विशेष काळजी घेतली असल्याचे दिसत आहे.



**संक्षिप्त**

## कांदा स्वस्त; गृहिणींना दिलासा आठवडाभरात किलोमागे 20 ते 25 रुपयांनी घट

**पुणे, दि. २६ : प्रतिनिधी**

कांद्याची आवक वाढल्याने आठवडाभरात कांद्याच्या दरात किलोमागे २० रुपयांनी घट झाली आहे. तेजीत असलेल्या कांद्याच्या दरात घट झाल्याने गृहिणींना दिलासा मिळाला आहे. नवीन लाल कांद्याचा (हळवी) हंगाम सुरू झाला असून, बाजारात त्याची आवक वाढली आहे. त्याचबरोबर, हवामान विभागाने अवकाळी पावसाची शक्यता व्यक्त केल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर कांदा विक्रीसाठी बाजारात पाठविण्यास सुरुवात केली आहे. घाऊक बाजारात एक किलो कांद्याला प्रतवारीनुसार १५ ते ३० रुपये दर मिळाला आहे. किरकोळ बाजारात नवीन लाल कांद्याला प्रतवारीनुसार ३० ते ५० रुपये किलो दर मिळाला आहे.

गेल्या आठवड्यात किरकोळ बाजारात एक किलो कांद्याचा दर प्रतवारीनुसार ५० ते ७० रुपयांपर्यंत होता. मार्केट यार्डातील घाऊक बाजारात अहिल्यानगरमधील श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, बीड जिल्ह्यातील आष्टी, सोलापूर जिल्ह्यातील करमाळा, तसेच पुणे जिल्ह्यातील शिरुर तालुक्यातील शेतकऱ्यांनी कांदा विक्रीस पाठविला आहे. गेल्या आठवड्यापासून कांद्याची आवक वाढली असून, बाजारात दररोज ८० ते १०० ट्रक कांदा विक्रीस पाठविला जात आहे. गेल्या आठवड्यात घाऊक बाजारात एक किलो कांद्याला ४० ते ५० रुपये दर मिळाला होता. आठवडाभरात कांद्याचा दर निम्म्याने कमी झाला आहे.

## कल्याण-डोंबिवली शहरांचा पाणी पुरवठा अठरा तास बंद राहणार

**कल्याण, दि. २६ : प्रतिनिधी**

कल्याण, डोंबिवली, टिटवाळा शहर आणि ग्रामीण भागाला पाणी पुरवठा करणाऱ्या कल्याण डोंबिवली महापालिकेच्या उल्हास नदी काठच्या जलशुध्दीकरण केंद्रांमध्ये देखभाल आणि दुरुस्तीची कामे करायची आहेत. या कामासाठी कल्याण, डोंबिवली, टिटवाळा शहरांना होणारा पाणी पुरवठा गुरुवारी (ता. २ जानेवारी) सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने घतला आहे.

आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या मान्यतेने पाणी पुरवठा विभागाकडून हे काम केले जाणार आहे. कल्याण, डोंबिवली, टिटवाळा आणि लगतच्या ग्रामीण भागाला पालिकेच्या बारावे, मोहिली, नेतिवली आणि टिटवाळा येथील जलशुध्दीकरण केंद्रातून पाणी पुरवठा केला जातो. या चारही जलशुध्दीकरण केंद्रांमधील विद्युत आणि यांत्रिकी उपकरणांच्या देखभाल आणि दुरुस्तीचे काम करणे आणि शहराच्या विविध भागातील प्रभाग हद्दीतील पाणी पुरवठा जलवाहिन्या अनेक ठिकाणी गळत आहेत. या गळक्या जलवाहिन्यांमुळे त्या भागात कमी दाबाने पाणी पुरवठा, रस्त्यावर सतत पाणी वाहून जात असल्याने चिखलसदृश्य परिस्थिती निर्माण होत आहे. या रस्त्यावरून दुचाकी वाहने घसरतात.

## मद्य पाजून मुंबईतील तरुणीवर बदलापूरमध्ये अत्याचार

**कल्याण, दि. २६ : प्रतिनिधी**

मुंबईतील एका तरूणीला तिच्या मैत्रिणीने बदलापूर येथे बोलावून घेतले. या तरूणीला मैत्रिण आणि तिच्या मित्राने बदलापूर येथील एका पाण्याच्या टाकीजवळ बिअर पाजली. या तरूणीची शुध्द हरपल्यानंतर एकाने तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केला. या प्रकरणी पीडित तरुणीने बदलापूर पोलीस ठाण्यात शनिवारी तक्रार दाखल केली आहे.

मुंबईत राहणारी ही १९ वर्षाची तरूणी शिक्षण घेत आहे. ती कुटुंबीयांसह मुंबईत राहते. या प्रकरणात बदलापूर पोलिसांनी पीडित तरुणीच्या तक्रारीवरून दत्ता जाधव, नायर (पूर्ण नाव नाही) या संशयितांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

पीडित तरूणीने बदलापूर पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे, की शनिवारी आपली मैत्रिण नायरा हिने आपणास बदलापूर येथे बोलावून घेतले. यावेळी तिच्या सोबत तिचा मित्र दत्ता जाधव होते. बदलापूर येथे आल्यानंतर मैत्रिण नायराने पीडित तरूणीला बदलापूर येथील पाण्याच्या टाकीजवळ बोलावून घेतले. तेथे नायरा आणि दत्ता जाधव यांनी पीडित तरूणीला विश्वासात घेतले. तिला तेथे बिअर पाजण्यात आली. बिअर प्यायल्यानंतर पीडित तरूणीची शुध्द हरपली. पीडित तरुणी शुध्दीत नसल्याचे पाहून संशयित दत्ता जाधव यांनी आपणावर जबरदस्तीने अत्याचार केला. त्यामुळे आपण या दोघांविरुध्द तक्रार देत आहोत, असे पीडितेने तक्रारीत म्हटले आहे. भारतीय न्याय संहितेच्या कलम ६४(१), ६९, ३ (५) प्रमाणे पोलिसांनी दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणाचा गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राजेश गज्जल यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक अनु शर्मा तपास करत आहेत.

# राज्यात 27-28 डिसेंबरदरम्यान गारपीट आणि मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज

### खानदेश, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांनी हवामानाच्या अंदाजाची दखल घेऊन शेतीचे नियोजन करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

**मुंबई, दि. २६ : प्रतिनिधी**



27-28 डिसेंबरदरम्यान मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात गारपीट आणि मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. 27 डिसेंबरला दुपारपासून मेघगर्जनेसह पावसाची सुरुवात सर्वात प्रथम नंदुरबार, धुळे, जळगाव, अहिल्यानगर जिल्ह्यांसह, दक्षिण मराठवाडा, पुणे आणि नाशिक जिल्ह्यांतील पूर्व भागांमध्ये होईल. शुक्रवार रात्रीपर्यंत वादळी पाऊस पश्चिम विदर्भ आणि शेजारच्या मराठवाड्यात हजेरी लावेल, ज्यात बुलढाणा, अकोला, वाशीम, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली आणि बीड जिल्ह्यांचा समावेश आहे. या भागांमध्ये काही प्रमाणात गारपिटीची शक्यता देखील वर्तविण्यात आली आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या उर्वरित जिल्ह्यांतील काही भागांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता देखील आहे.

28 डिसेंबरच्या पहाटेपर्यंत वादळी पाऊस पूर्वेकडे सरकेल आणि विदर्भातील इतर जिल्ह्यांत हजेरी लावेल. यात यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, आणि चंद्रपूर जिल्ह्यांचा समावेश आहे. या भागांमध्ये काही प्रमाणात गारपीट होण्याची शक्यता आहे. पश्चिम विदर्भ आणि शेजारच्या मराठवाड्यातील काही भागांमध्ये पावसाची स्थिती या दिवशी देखील कायम राहण्याची शक्यता आहे. या दिवशी एकंदरीत विदर्भात आणि मराठवाड्यात आभाळी हवामान अपेक्षित असल्यामुळे कमाल तापमानात थोडी घट होईल. मात्र खानदेश आणि मध्य महाराष्ट्रात हवामान स्थिर होण्यास सुरुवात होईल.

29 डिसेंबरला विदर्भ आणि मराठवाड्यातील काही तुरळक ठिकाण वगळता राज्यातील बहुतांश भागांत स्थिर हवामान पहिला मिळेल, आणि 30 डिसेंबरपासून थंडीत वाढ होईल.



शेतकऱ्यांनी हवामानाच्या या स्थितीनुसार नियोजन करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. प्राण्यांना आणि काढणी केलेल्या पिकांना पाऊस, गारपीट आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावे. वादळ आल्यास झाडांखाली, मोकळ्या जागेत, टिनाच्या शेडखाली, वीजप्रवाह असलेल्या तारांखाली किंवा विद्युत रोहित्रांनजीक आसरा घेऊ नये, असे आवाहन देखील कृषी विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

# युरोप सहलीच्या बुकिंगचे 4.85 लाख हडपले

**कोल्हापूर, दि. २६ : प्रतिनिधी**

युरोप सहलीसाठी बुकिंग करून देण्याच्या निमित्ताने एका कुटुंबाला ४ लाख ८५ हजार रुपयांचा गंडा घालणारा प्रशांत पुरुषोत्तम जावडेकर (वय ३८, रा. कल्याण पश्चिम, ठाणे) याला शाहूपुरी पोलिसांनी अटक केली. त्याने दोन मार्च २०२२ ते जुलै २०२२ या कालावधीत फसवणूक केली. याबाबत शाल्मली सुनील जोशी (वय ५०, रा. निंबाळकर कॉलनी, कोल्हापूर) यांनी फिर्याद दिली होती. अटकेतील संशयिताने आणखी काही जणांची फसवणूक केल्याचा पोलिसांना संशय आहे. शाहूपुरी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शाल्मली जोशी या अडीच वर्षांपूर्वी कुटुंबासह परदेश सहलीला जाण्याच्या तयारीत होत्या. त्याचवेळी जिनिअस वर्ल्ड हॉस्पिटॅलिटी प्रा.लि. कंपनीचा एजंट असल्याचे सांगत प्रशांत जावडेकर याने मोबाइलवरून जोशी यांच्याशी संपर्क साधला. २ जुलै ते २ ऑगस्ट २०२२ दरम्यान जोशी यांच्यासह त्यांचे पती आणि मुलगा अशा तिघांसाठी प्रत्येकी १ लाख ५५ हजार रुपयांचे पॅकेज देत असल्याचे त्याने सांगितले.

बुकिंगसाठी ४ लाख ८५ हजार ५५७ रुपये त्याने स्वत:च्या बँक खात्यात वर्ग करण्यास सांगितले. त्यानुसार जोशी यांनी रक्कम पाठवली. पैसे घेऊन ठरलेल्या मुदतीत त्याने सहलीच्या प्रवासाची तिकिटे दिली नाहीत. याबाबत जिनिअस वर्ल्ड हॉस्पिटॅलिटी कंपनीकडे तक्रार केली असता, त्यांनी जावडेकर हा त्यांच्याकडे एजंट नसल्याचे सांगितले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी फिर्याद दिली.

**⏭ अडीच वर्षांनी अटक**

गुन्हा दाखल होताच शाहूपुरी पोलिसांचे पथक संशयिताच्या शोधासाठी कल्याणमधील पत्त्यावर गेले होते. मात्र, तो पसार झाला होता. त्यानंतर तपास रखडला होता. मात्र, पोलिस अधीक्षक महेंद्र पंडित यांनी गेल्या तीन वर्षांतील प्रलंबित तपास पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार तपास अधिकारी सहायक पोलिस निरीक्षक क्रांती पाटील यांनी कल्याणमध्ये जाऊन जावडेकर याला अटक केली. न्यायालयात हजर केल्यानंतर त्याची पोलिस कोठडीत रवानगी झाली.

## ऐतिहासिक वास्तू खराब करणाऱ्यांना आता पाच वर्षापर्यंत शिक्षा – डॉ. गोऱ्हे

**पुणे, दि. २६ : प्रतिनिधी**

ऐतिहासिक वास्तू, गड-किल्ले यांचे सौंदर्य खराब करणाऱ्यांना आता ३ ते ५ वर्षांची शिक्षा होईल. नागपूरमध्ये झालेल्या हिवाळी अधिवेशनात विधानपरिषद सभागृहात हा निर्णय घेण्यात आला. यापूर्वी कमी शिक्षा होती, त्यामुळे कोणावर धाक नव्हता. गड-किल्ले यांचे सौंदर्य अबाधित ठेवण्याच्या हेतूने हा निर्णय घेण्यात आला. विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी ही माहिती दिली. पुण्यात आपल्या निवासस्थानी पत्रकार परिषद घेत डॉ. गोऱ्हे यांनी अधिवेशनात झालेल्या विविध निर्णयांची माहिती दिली.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, विधानसभा आणि विधानपरिषद सभागृहात एकूण १७ विधेयके मंजूर झाली. तब्बल ३३ वर्षानंतर पहिल्यांदाच नागपूर अधिवेशनात इतर मंत्र्यांना शपथ देण्याचा कार्यक्रम पार पडला. कारागृहांच्या संदर्भातील विधेयक, सिद्धिविनायक मंदिराच्या समिती सदस्यांची मुदत ३ वर्षांपासून ५ वर्षे करण्याचा निर्णय, तसेच सदस्यसंख्या ९ वरून १५ करण्याचा निर्णय अधिवेशनामध्ये झाला.

राज्य महिला आयोग आणि उपसभापती कार्यालय यांनी मिळून नवनिर्वाचित महिला आमदारांची बैठक घेतली. काम करण्याच्या संदर्भामध्ये महिला आयोगाची माहिती व्हावी, महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी ज्या अडचणी असतील त्याचं निराकरण व्हावे आणि त्यांनी कुठल्या महत्त्वाच्या प्रश्नांवर काम करावे, यावर चर्चा केली. तसेच पालघर, नंदुरबारमधील शाळांमध्ये आढळलेला खराब पोषण आहार, बालकांचे कुपोषण या घटनांचा विशेष उल्लेख करत उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी या संदर्भात दिलेल्या निर्देशांवरही चर्चा केली. दर्जेदार आहार मिळावा यासाठी सरकारने गांभीर्याने लक्ष द्यावे, असा निर्देशही त्यांनी दिला. भविष्यकाळात स्त्रियांच्या चळवळीत, राजकारणात अनाथ मुलींचा सहभाग मोठ्या प्रमाणात दिसून येईल. अनाथ मुला-मुलींचे विवाह जमविण्यासंबंधी राज्यातील विविध संस्थांनी एकत्रितपणे काम करणे गरजेचे आहे, असेही डॉ. गोऱ्हे म्हणाले.

## पावात आढळल्या मेलेल्या माशा

### महेश कदम यांनी उघडकीस आणला किळसवाणा प्रकार

**ठाणे, दि. २६ : प्रतिनिधी**

ठाण्यातील चंदनवाडी परिसरात एका महिला ग्राहकाला चक्क पावांमध्ये मेलेल्या माशा आढळल्याचा किळसवाणा प्रकार आज भारतीय मराठा महासंघाचे प्रदेश अध्यक्ष महेश कदम यांनी उघडकीस आणला. या पावात एक दोन नव्हे तर चक्क तीन मेलेल्या माश्या होत्या.

सकाळी चंदनवाडी येथील एक महिला नेहमीप्रमाणे पाव खरेदी करायला गेली होती. त्यावेळी तिला त्या पावात मेलेली माशी दिसली. तिने पाव पुन्हा तपासल्यावर तिला एक, दोन नव्हे तर चक्क तीन मेलेल्या माशा आढळल्या. यावेळी ती विक्रेत्याला मेलेल्या माशा असलेला पाव दाखवत होती मात्र पाव विक्रेता ते मानायला तयार नव्हता त्यामुळे दोघांमध्ये बाचाबाची झाली. हा प्रकार कदम यांच्या नजरेस पडला असता त्यांनी पाव विक्रेत्याला याबद्दल जाब विचारला आणि त्यांनी देखील स्वतः पाव तपासला असता त्यांनाही तीन मेलेल्या माशा या पावांमध्ये दिसून आल्या. यावेळी त्यांनी पाव विक्रेत्याला विचारले असता तो राबोडी येथून पाव आणत असल्याचे त्यांनी सांगितले. कदम म्हणाले की, या पाव विक्रेत्याला विचारल्यावर त्याने प्रामाणिकपणाने हा प्रकार कबूल केला त्यामुळे त्याला आज सोडून देण्यात येत आहे मात्र ज्या बेकरीतून त्याने पाव विकण्यासाठी आणले त्याला हा व्हिडिओ दाखवून पुढची कारवाई केली जाईल. ते पुढे म्हणाले की, ठाणेकरांनी अशा घाणेरड्या, निकृष्ट दर्जाच्या ठिकाणचे पाव खाण्यापेक्षा आपल्या घरची चपातीच खा.



# नवी मुंबईतील होल्डींग पाँडच्या पुनर्जिवीकरणासाठी गतीमान कार्यवाही

**नवी मुंबई, दि. २६ : प्रतिनिधी**



नवी मुंबई शहर समुद्र सपाटीपासून खालच्या पातळीवर वसलेले असल्याने विशेषत्वाने पावसाळी कालावधीत समुद्राच्या भरतीचे पाणी साठवून ठेवण्यासाठी सिडकोने नवी मुंबई वसविताना डच पध्दतीने धारण तलावांची (होल्डींग पाँड) रचना केली आहे. बेलापूर, सानपाडा, वाशी, कोपरखैरणे, ऐरोली विभागांमध्ये 11 होल्डींग पाँड तयार करण्यात आले असून सेक्टर 12 बेलापूर व सेक्टर 8 वाशी येथे होल्डींग पाँडलगत पर्जन्य जलउदंचन केंद्र बांधलेले आहेत. तुर्भे सेक्टर 21 एपीएमसी मार्केटजवळही पर्जन्य जलउदंचन केंद्र कार्यरत असून हे केंद्र परिसरातील सखल भागातील पावसाळी पाणी निचरा होण्याकरिता उपयुक्त आहे.

उर्वरित होल्डींग पाँडच्या ठिकाणी फ्लॅपगेट बसविण्यात आले असून ते खाडीच्या दिशेने उघडतात. ज्यावेळी खाडीत भरतीची वेळ असेल आणि त्याचवेळी मोठया प्रमाणात पाऊस पडत असेल तर हे फ्लॅपगेट खाडीच्या पाण्यातील दबावामुळे बंद होतात व पावसाचे पाणी होल्डींग पाँडमध्ये साठून राहते आणि शहरात शिरत नाही. ज्यावेळी ओहोटी सुरु होते तेव्हा होल्डींग पाँडमध्ये साठलेल्या पावसाळी पाण्याच्या दबावामुळे फ्लॅपगेट खाडीच्या दिशेने उघडतात व होल्डींग पाँडमधील साठलेले पावसाळी पाणी खाडीमध्ये वाहून जाते. अतिवृष्टी होत असेल अशावेळी पर्जन्य जल उदंचन केंद्रामधील पंपाव्दारे पावसाचे पाणी उचलून खाडीमध्ये सोडण्यात येते.

तथापि पावसाळ्यात ज्या होल्डींग पाँडमुळे नवी मुंबई शहराचे पावसाळी पाण्यापासून संरक्षण होते, अशा होल्डींग पाँडची पावसाचे पाणी धारण करण्याची क्षमता ही इतक्या वर्षात त्यामध्ये मोठया प्रमाणात गाळ साचल्याने व पाण्यात वाहत आलेल्या खारफुटींचीही वाढ झाल्याने मोठया प्रमाणात कमी झाली आहे. त्यामुळे मागील काही वर्षात उधाण भरतीची वेळ व मोठया पर्जन्यवृष्टीची वेळ जुळून आल्यास होल्डींग पाँडची पावसाळी पाणी साठवून ठेवण्याची क्षमता अत्यंत कमी झाली असल्याने ते पाणी शहराच्या सखल भागात जमा होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

याकरिता सदर होल्डींग पाँड गाळ काढून स्वच्छ करणे व त्याची पाणी धारण क्षमता वाढविणे हा उपाय असून याकरिता परवानगी मिळावी यादृष्टीने महानगरपालिकेच्या वतीने सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.




**भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीदिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात समाजविकास विभागाचे उपआयुक्त श्री.किसनराव पलांडे यांच्या शुभहस्ते, अधिकारी – कर्मचारी यांच्या उपस्थितीत प्रतिमेस पुष्पमालिका अर्पण करून अभिवादन करण्यात आले.**

# शहरातील उद्यानांची दुरावस्था

## मनपा प्रशासनाचे उद्यानांकडे दुर्लक्ष



**भिवंडी, दि. २६ : प्रतिनिधी**

महापालिका कार्यक्षेत्रातील उद्यानांची दुरावस्था झाली असल्याने लहान मुलांना खेळण्यासाठी उद्याने कमी पडत असून मनपा प्रशासनाचे उद्यान देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष झाले आहे.त्यामुळे शहरातील चिमुरड्यांनी खेळायचे कुठे असा प्रश्न निर्माण झाला आहे.भिवंडी महापालिकेच्या आत्यारित एकूण २६ उद्याने असून यातील अनेक उद्यानांची दुरावस्था झाली आहे.शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील नझराना टॉकीजच्या समोर असलेले सुभाष उद्यान सध्या दुरुस्ती अभावी बंद असल्याने येथील लहान मुलांच्या खेळाचा प्रश्न उपस्थित झाला आहे.शहरात मनोरंजनाची साधने उपलब्ध नसून उद्यानांच्या देखभाल दुरुस्तीकडे मनपाने दुर्लक्ष केल्याने अनेक उद्याने दुरुस्ती कामी बंद पडली आहे. महापालिकेच्या अखत्यारीतील सुभाष उद्यान २२ एप्रिल २००० मध्ये नूतनीकरण करण्यात आले होते. या नूतनीकरणाच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी धर्मवीर स्व.आनंद दिघे स्वतः उपस्थित होते.दिघेंच्या उपस्थितीत या उद्यानाचे उदघाटन झाल्यानंतर मनपा प्रशासनाने काही काळ स्वतः व नंतर ठेकेदारांमार्फत हे उद्यान सुरु ठेवले होते.मात्र ठेकेदाराच्या ठेक्याचा १० वर्षांचा कार्यकाळ सध्या संपला असल्याने मनपा प्रशासनाने हे उद्यान स्वतःच्या ताब्यात घेतले आहे.सध्या बांधकाम विभागाच्या दुरुस्ती कामांमुळे हे उद्यान बंद असल्याची माहिती मनपाच्या उद्यान विभागाकडून देण्यात आली आहे.सुभाष उद्यानाबरोबरच शहरातील इतर अनेक उद्यानांची सध्या दुरावस्था झाली असल्याने मुलांना खेळण्यासाठी हक्काची जागा उपलब्ध नसल्याने चिमुरड्यांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

# ज्वेलर्सचे दुकान लुटणाऱ्या आंतरराज्य टोळीचा 72 तासांत पर्दाफाश

**ठाणे, दि. २६ : प्रतिनिधी**

ठाण्यातील नौपाडा भागातील वामन शंकर मराठे ज्वेलर्स या सोने-चांदीच्या दागिन्यांच्या दुकानातून २८ लाख ७७ हजारांचे दागिने लुटणाऱ्या लीलाराम ऊर्फ लीलेश मेघवाल (२९, रा. सुरत, मूळ रा. जालोर, राजस्थान) याच्यासह पाचजणांच्या टोळीला अटक केल्याची माहिती ठाणे गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलिस उपायुक्त अमरसिंह जाधव यांनी मंगळवारी दिली. हे सराईत चोरटे असून त्यांच्याकडून ४८३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, साडेपाच किलो वजनाची चांदीची नाणी, भांडी, दागिने, इमिटेशन ज्वेलरी आणि मोबाईल फोन असा २९ लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

१७ डिसेंबर २०२४ रोजी पहाटे १:५० ते ४:३० वाजण्याच्या सुमारास दुकानाच्या मुख्य प्रवेशद्वाराचा कडीकोयंडा तोडून चोरट्यांनी आत शिरकाव करून २८ लाख ७७ हजार ४९० रुपयांचे सोन्याचे दागिने पळविले होते. नौपाडा पोलिस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर हे प्रकरण समांतर तपासासाठी पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपविले होते. अतिरिक्त पोलिस आयुक्त डॉ. पंजाब उगले यांनी खंडणीविरोधी पथक, मध्यवर्ती गुन्हे शोध, युनिट एक आणि नौपाडा पोलिस यांची चार वेगवेगळी पथके तयार केली.

सहायक पोलिस आयुक्त शेखर बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणीविरोधी पथकाचे निरीक्षक नरेंद्र पवार, सहायक पोलिस निरीक्षक सुनील तारमळे, श्रीकृष्ण गोरे, भूषण कापडणीस, उपनिरीक्षक विजयकुमार राठोड आणि मध्यवर्ती शोधपथकाचे निरीक्षक संजय शिंदे, आदींच्या पथकाने दुकानातील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे कौशल्यपूर्वक तपास करून लीलाराम तसेच चुन्नीलाल ऊर्फ सुमत प्रजापती (३५, रा. नाडीयावाड, सुरत, मूळ रा. राजस्थान), जैसाराम ऊर्फ जेडी कलब ( ३२, मुंबई, मूळ रा. राजस्थान), दोनाराम ऊर्फ दिलीप पराडिया, (२४, रा. सुरत, गुजरात, मूळ रा. पहाडपुरा, राजस्थान ) आणि नागजीराम मेघवाल (२९, रा. नाडीयावाड, मूळ रा. राजस्थान) या पाचजणांच्या टोळीला २१ डिसेंबर रोजी ताब्यात घेतले. त्यांच्याकडून चोरीतील सर्व दागिन्यांसह मुद्देमाल हस्तगत केला. त्यांना ठाणे न्यायालयाने २६ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडी दिली. आरोपींवर सुरतमध्येही चोरीचे दोन गुन्हे यापूर्वी दाखल आहेत.

**अशी आहे एमओबी**

दुकानात चोरी करण्यापूर्वी आधी रेकी करून बाजूच्या दुकानात गाळा भाड्याने घेऊन दुकानाला भगदाड पाडले. चोरी करण्याची या टोळीची एमओबी आहे. नौपाड्यात त्यांनी आधी काही दिवसांपूर्वी टेहळणी केल्याचे उघड झाले.

**अशी केली अटक-**

सीसीटीव्हीमध्ये दोघांचे फुटेज पोलिसांना मिळाले होते. त्याच आधारे दुकान ते ठाणे रेल्वे स्टेशन आणि रेल्वे स्टेशन ते थेट गुजरातमधील १० ते १२ रेल्वे स्थानकातील फुटेजची तपासणी केली. याच पडताळणीमध्ये हा गुन्हा उघड झाला.

# प्रभू येशुंच्या प्रेम, त्यागाच्या विचारांची अनुकरणाची गरज: रे.अघमकर

■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला, दि. २६ :** संपूर्ण जगभरात प्रभू येशू ख्रिस्ताचा जन्मदिवस ख्रिसमस ( नाताळ) सण हर्षोल्हासात साजरा करण्यात आला. अकोल्यात ही नाताळ सण मोठ्या हर्षोल्हासात साजरा करण्यात आला. ख्रिश्चन कॉलनी येथील बेथेल झेवियर्स अलायन्स चर्चमध्ये रेव्ह. नीलेश अघमकर यांनी पवित्र बायबलमधील आठ व्यक्तीचा संदर्भ देत विविध वचनांच्या आधारे नाताळाचा संदेश दिला. प्रत्येक गोष्टीसाठी आणि प्रत्येक परिस्थितीत आपण सदोदित देवाची स्तुती केली पाहिजे, सध्याची जागतिक परिस्थिती पाहता प्रभू येशू यांच्या प्रेम, त्याग आणि स्नेहाच्या विचारांचे अनुकरण करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. प्रभू येशू हे अखिल मानवजातीच्या उद्धारासाठी या जगात आले. त्यांनी जगाला प्रेम, शांती, स्नेह आणि त्यागाची शिकवण दिली, त्याचेच अनुकरण करण्याची गरज असल्याचे रेव्ह. अघमकर म्हणाले.



२५ डिसेंबर रोजी सर्व चर्चमधून सकाळी ९ वाजता प्रार्थना सभांचे आयोजन करण्यात आले होते. सर्व चर्चमधील धर्मगुरूंनी ख्रिश्चनांचा पवित्र धर्मग्रंथ बायबलमधील वचनांच्या आधारे ख्रिस्त जन्मावर संदेश दिला. यावेळी संडेस्कुलच्या लहान मुलांनी ख्रिस्त जन्मावर आधारित नाटिका, गीते, नृत्य सादर केली. तसेच तरुण संघ आणि महिला संघाच्या सदस्यांनी ख्रिस्तजन्माची गीते सादर केली. यावेळी नव्याने जन्मलेल्या बालकांचे अर्पण करण्याचा विधीही आयोजित करण्यात आला होता. प्रार्थना सभेनंतर सर्व ख्रिस्ती बंधूभगिनी यांनी एकमेकांना नाताळाच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर आता सलग आठ दिवस सर्व चर्चमधून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने लहान मुलांचे खेळ, तरुणांचे आणि प्रौढांचे खेळ, महिलांचे खेळ यासोबतच बायबल क्विझ स्पर्धा, सहभोजन, सहल आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांचा समावेश आहे. अकोला शहरातील अलायन्स मिशन आणि इतर मिशनची असे एकूण ८ चर्च असून, नाताळनिमित्त त्या चर्चवर सुंदर रोषणाई करण्यात आली आहे. ३१ डिसेंबरला पुन्हा रात्री कॅरोल पार्टी घरोघरी जाऊन नवीन वर्षाच्या स्वागताची गीते सादर करतील.

१ जानेवारीला ख्रिश्चन समाज नवीन वर्ष हादेखील सण साजरा करतो. अशाप्रकारे आठवडाभर विविध कार्यक्रमांची रेलचेल असते.

## ख्रिश्चन बांधवांनी विश्वशांतीची केली प्रार्थना

**अकोला :** ख्रिस्ती बांधवांचा आनंद आणि उत्साहाचे प्रतिक ख्रिसमस अर्थात नाताळाचा सण शहरात बुधवारी उत्साहात साजरा करण्यात आला. विश्व शांतीचा संदेश देणारा येशू ख्रिस्ताचा जन्मोत्सव शहरातील विविध चर्चमध्ये ख्रिश्चन बांधवांनी उत्साहात भेटवस्तू व शुभेच्छा देत साजरा केला. येशू ख्रिस्तांचा करुणा व क्षमाशीलतेच्या संदेशाचे करुन देणा ?या सणानिमित्त शहरातील विविध चर्चमध्ये सकाळी 'हे प्रभू येशू... जगात शांती नांदू दे... आपसात सौहार्द राहू दे... सर्व पृथ्वी एक कुटुंब म्हणून नांदो'' अशी सर्वधर्मीय प्रार्थना चर्चमध्ये ख्रिसमसच्या औचित्यावर पार पडली. बुधवारी मध्यरात्री उशीरापर्यंत शहरातील चर्चमध्ये पारंपरिक पद्धतीने येशू जन्माचे स्वागत करून ख्रिश्चन बांधवांनी नाताळाचा सण उत्साहात साजरा केला. शहरातील पाचही चर्चचा परिसर

## प्रभू येशूच्या जन्मोत्सवानिमित्त विविध चर्चमध्ये गुंजले गीतांचे सूर



विद्युत रोषणाईने झळाळून निघाला होता. येशू जन्माचा देखावा, बालकांना परिधान केलेले सांताक्लॉजची वेशभूषा, ख्रिसमस ट्री, पाश्चात्य संगीत यांसारख्या उपक्रमामुळे वातावरणातील उत्साह ओसंडून वाहत होता. विद्युत रोषणाईने ख्रिसमस ट्री सजवण्यात आल्या होत्या. प्रार्थना आणि त्यानंतर सायंकाळी लहान मुलांचे विविध मनोरंजनाचे खेळ झाले.

सेव्हिअर अलायन्स चर्च 'येशू मानवरूपी देहात जन्म घेऊन जगाचा उद्धारकर्ता झाला. त्यांनी जगासाठी त्याग केला. प्रभू येशू म्हणजे त्यागाचे, नम्रतेचे उदाहरण आहे. त्यामुळे माणसाने त्यांच्या शिकवणीतून स्वतःमध्ये बदल घडवावा आणि अंतःकरण शुद्ध ठेवले पाहिजेत', असे आवाहन शहरातील अशोक वाटिकेजवळील सेव्हिअर अलायन्स चर्चमध्ये रेव्हरंड राजेश पाटोळे यांनी ख्रिश्चन बांधवांना उपासना संदेशप्रसंगी केले. तत्पूर्वी उपस्थित बांधवांनी प्रभू येशूच्या जन्मोत्सवानिमित्त सकाळी प्रार्थना केली. प्रार्थनेप्रसंगी 'जगी तारक जन्मला..चला पाहूया..., पवित्र देवा करितो स्तवन तुला, चला चला जाऊ जगाचा उद्धार पाहू... अशी भक्तिगीते सादर करण्यात आली.

दि अलायन्स चर्च लायब्ररी शहरातील अलायन्स (लायब्ररी कंपाउंड) चर्चमध्ये ख्रिस्त जन्मोत्सव सोहळा उत्साहात झाला. ख्रिस्त जन्मोत्सव उपासना, गीतगायन व दाणार्पण सोहळा झाला. रेव्ह. बी. व्ही. अभ्यंकर यांनी आपल्या संदेशात सांगितले की, येशू ख्रिस्त हे केवळ ख्रिस्ती लोकांसाठी नाही तर संपूर्ण जगासाठी भू-तलावरआले. त्यांनी शांतीचा, उद्धाराचा मार्ग संपूर्ण जगाला दाखवला. त्यामुळे आज ख्रिसमसनिमित्त सर्व समाजासाठी, सर्व समाजातील लोकांसाठी प्रार्थना करण्यात आली.

Process Paid **Adv. Krishna Thacker**

**PUBLIC NOTICE**

**IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D.) CBD BELAPUR AT CBD BELAPUR**
**Misc. Appl. No. 1248 of 2024** **Exh-06**
**MR DHARMESH DILIP PAREKH**
Aged:47 years, Occu: Service
Having address at: H-9/1-2, Sharayu CHS Ltd. opposite South Indian Bank, Sector-29, Vashi, Navi Mumbai-400703
Mobile no. 9987179724 Email Id-dhparekh@hotmail.com **... Applicant**
**V/s**
**1. MRS ASHA DILIP PAREKH**
Aged: 72 years, Occu: Housewife
Having address at: H-9/1-2, Sharayu CHS Ltd, opposite South Indian Bank, Sector-29, Vashi, Navi Mumbai-400703.
**2. MRS RUPAL CHOUBEY**
Aged 51 years, Occu: Professional
Having Address at: 1208/737,East End Hospital, C.A. Road, Opposite Verma tractor deshapande layout Bhandewadi, Bagadganj Mauda Nagpur, Maharashtra 440008
**3. MRS BATAVIA SHEETAL S**
Age: 48 years, Occupation: Professional
Having Address at: 2021 Deerview Common UN2021 Oakville, ON L6M 0Y2. **... Opponents**

That **LATE DILIPKUMAR MANILAL PAREKH** alias DILIP M PAREKH alias D.M. PAREKH who expired on **14th APRIL 2022** at NAGPUR is the father of the applicant **MR DHARMESH DILIP PAREKH**
The Property descriptions in the names of the deceased herewith- 50% share in Flat no.H-9/1:2, on the first floor, Sharayu Co-Operative Housing Society, Sector-29, Vashi, Navi Mumbai-400703. Taluka and District Thane.
Whereas the above named applicants have filed Misc. Application for Heirship Certificate under Bombay Regulation Act 1827 Regulation No. VIII the Court of Civil Judge (S.D.) CBD Belapur At CBD Belapur.
You the member of public are hereby given notice to appear in the court of Civil Judge (S.D.) CBD Belapur At CBD Belapur, in person or by pleader duly instructed and to file your Say/Objections if any within 30 (Thirty) days from the date of publication of this public notice failing which the said application will be held presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided.
Given under the hand & Seal of the court this 26/12/2024
Sd/- Jr.Clerk (Court Seal)
by Order
Sd/-
**Asst. Superintendent**
**Civil Court S.D., Belapur**

# वंचित बहुजन युवा आघाडीच्या वतीने मनुस्मृतीचे दहन



■ महासागर प्रतिनिधी,

अकोला, दि. २६ : वंचित बहुजन युवा आघाडीतर्फे बुधवारी मनुस्मृतीचे प्रतीकात्मक दहन करण्यात आले. हे दहन जिल्हा परिषद कर्मचारी भवन परिसरात करण्यात आले. २५ डिसेंबर १९२७ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथे मनुस्मृतीचे दहन केले होते. ही घटना भारतीय स्त्री मुक्तीची सोनेरी पहाट होती. या दिनाचे औचित्य साधून गत २७ वर्षांपासून २५ डिसेंबर हा दिवस भारतीय स्त्री मुक्ती दिन म्हणून घोषित व्हावा, अशी एकमुखी मागणी वंचित बहुजन महिला आघाडी तर्फे करण्यात येत आहे. दरम्यान मंगळवारी वंचित बहुजन युवा आघाडीच्या महानगरतर्फे प्रतीकात्मक मनुस्मृतीचे दहन करण्यात आले. यावेळी युवा आघाडी जिल्हा पदाधिकारी नासरी चव्हाण, अॅड. मीनल मेंढे, पायल कांबळे, नंदिनी ढोले हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रदेश महासचिव राजेंद्र पातोडे, मंगला

**औचित्य साधून गत २७ वर्षांपासून २५ डिसेंबर हा दिवस भारतीय स्त्री मुक्ती दिन म्हणून घोषित व्हावा**

खिंवसरा, महिला आघाडी जिल्हा अध्यक्षा आम्रपाली खंडारे , जि.प. अध्यक्षा संगीता अढाऊ , महिला आघाडी महानगर अध्यक्षा वंदना वासनिक, युवक आघाडी जिल्हाध्यक्ष श्रीकांत घोगरे , सचिन शिराळे, विकास सदांशिव आदी उपस्थित होते.

## THE PUBLIC TRUST REGISTRATION OFFICE GREATER MUMBAI REGION, MUMBAI.

Dharmadaya Ayukta Bhavan, 1st Floor Sasmira Building, Sasmira Road, Worli, Mumbai-400 030.

**PUBLIC NOTE OF INQUIRY**

Change Report No. ACC/VII/8141/2024
**Filled by: Dr. Indrajit Yashwantrao Mohite**
**In the matter of: "Vasantdada Sugar Institute"**
P.T.R. No. F-3728 (Mumbai)

To,
All concerned having interest :-
WHEREAS THE Reporting Trustee of the above trust has filed a Change Report under Section 22 of the Maharashtra Public Trusts Act, 1950 for bringing the below described property on the record of the above named trust and an inquiry is to be made by the Ld. Assistant Charity Commissioner-VII, Greater Mumbai Region, Mumbai viz.
**1)** Whether this property is the property of the Trust? And could be registered in the name of the above Trust?

**DESCRIPTION OF THE PROPERITIES**

**Immovable Property:-**
All the piece and parcel of property in the form of land situated at Khapari (Subhedar), Tq. Nagpur rural Dist. Nagpur within the limits of Panchayat Samiti Nagpur rural Dist. Nagpur bearing;
**Gat No. 42- 0.62 H**
**Boundaries : On the East** - by Part of Survey No. 43
**On the West** - by Vithoba (Vakil) Shiva Pandhan
**On the North** - by Part of Survey No. 49
**On the South** - by Road
**Gat No. 43/1 - 1.00 H**
**On the East** - by Part of Survey No. 43
**On the West** - by Survey No. 42
**On the North** - by Part of Survey No. 49
**On the South** - by Road
**Value Rs. 84,06,300/-**

This is to call upon you to submit your objections, if any in the matter before the Ld. Assistant Charity Commissioner-VII, Greater Mumbai Region, Mumbai at the above address in person or by a pleader within 30 days from the date of publication of this notice. If no objection is received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary, orders will be passed.
Given under my hand and seal of the Hon'ble Joint Charity Commissioner, Greater Mumbai Region, Mumbai.
**This 16th day of the Month of December, 2024.**
**Supertendent-(J)**
**Public Trusts Registration Office,**
**Greater Mumbai Region, Mumbai.**

## THE PUBLIC TRUST REGISTRATION OFFICE GREATER MUMBAI REGION, MUMBAI.

Dharmadaya Ayukta Bhavan, 1st Floor Sasmira Building, Sasmira Road, Worli, Mumbai-400 030.

**PUBLIC NOTE OF INQUIRY**

Change Report No. ACC/VII/9539/2024
**Filled by: Dr. Indrajit Yashwantrao Mohite**
**In the matter of: "Vasantdada Sugar Institute"**
P.T.R. No. F-3728 (Mumbai)

To,
All concerned having interest :-
WHEREAS THE Reporting Trustee of the above trust has filed a Change Report under Section 22 of the Maharashtra Public Trusts Act, 1950 for bringing the below described property on the record of the above named trust and an inquiry is to be made by the Ld. Assistant Charity Commissioner-VII, Greater Mumbai Region, Mumbai viz.
**1)** Whether this property is the property of the Trust? And could be registered in the name of the above Trust?

**DESCRIPTION OF THE PROPERITIES**

**Immovable Property:-**
All the piece and parcel of property in the form of land situated at Mhasala, PSK, 82 Tq. Nagpur rural Dist. Nagpur within the limits of Panchayat Samiti Nagpur rural Dist. Nagpur bearing;
**Gat No. 18- 1.61 H**
**On the East** - Shiv Pandhan
**On the West** - by Survey No. 16
**On the North** - by Survey No. 19
**On the South** - by Survey No. 17/A
**Gat No. 21/A- 0.40 H**
**On the East** - by Survey No. 21/B
**On the West** - Gopalpur Shiv
**On the North** - by Survey No. 22/3 & 22/1
**On the South** - by Survey No. 20
**Gat No. 22/1- 1.66 H**
**On the East** - by Survey No. 22/2
**On the West** - by Survey No. 22/3
**On the North** - by Survey No. 23
**On the South** - by Survey No. 21/A & 21/B
**Value Rs. 1,48,49,000/-**

This is to call upon you to submit your objections, if any in the matter before the Ld. Assistant Charity Commissioner-VII, Greater Mumbai Region, Mumbai at the above address in person or by a pleader within 30 days from the date of publication of this notice. If no objection is received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary, orders will be passed.
Given under my hand and seal of the Hon'ble Joint Charity Commissioner, Greater Mumbai Region, Mumbai.
**This 16th day of the Month of December, 2024.**
**Supertendent-(J)**
**Public Trusts Registration Office,**
**Greater Mumbai Region, Mumbai.**

## THE PUBLIC TRUST REGISTRATION OFFICE GREATER MUMBAI REGION, MUMBAI.

Dharmadaya Ayukta Bhavan, 1st Floor Sasmira Building, Sasmira Road, Worli, Mumbai-400 030.

**PUBLIC NOTE OF INQUIRY**

Change Report No. ACC/VII/8142/2024
**Filled by: Dr. Indrajit Yashwantrao Mohite**
**In the matter of: "Vasantdada Sugar Institute"**
P.T.R. No. F-3728 (Mumbai)

To,
All concerned having interest :-
WHEREAS THE Reporting Trustee of the above trust has filed a Change Report under Section 22 of the Maharashtra Public Trusts Act, 1950 for bringing the below described property on the record of the above named trust and an inquiry is to be made by the Ld. Assistant Charity Commissioner-VII, Greater Mumbai Region, Mumbai viz.
**1)** Whether this property is the property of the Trust? And could be registered in the name of the above Trust?

**DESCRIPTION OF THE PROPERITIES**

**Immovable Property:-**
All the piece and parcel of property in the form of land situated at Khapari (Subhedar), Tq. Nagpur rural Dist. Nagpur within the limits of Panchayat Samiti Nagpur rural Dist. Nagpur bearing;
**Gat No. 48- 0.93 H**
**On the East** - by Survey No. 52
**On the West** - by Survey No. 49/B
**On the North** - by Survey No. 51
**On the South** - by Survey No. 47
**Gat No. 49/A - 0.93 H**
**On the East** - by Survey No. 49/B
**On the West** - by Survey No. 49/A/2
**On the North** - by Survey No. 50
**On the South** - by Survey No. 42 and Part of Survey No.43
**Gat No. 49/B - 0.40 H**
**On the East** - by Survey No. 48
**On the West** - by Survey No. 49/A
**On the North** - by Survey No. 51
**On the South** - by Part of Survey No.43
**Value Rs. 1,17,28,500/-**

This is to call upon you to submit your objections, if any in the matter before the Ld. Assistant Charity Commissioner-VII, Greater Mumbai Region, Mumbai at the above address in person or by a pleader within 30 days from the date of publication of this notice. If no objection is received within the stipulated time then further inquiry would be completed anecessary, orders will be passed.
Given under my hand and seal of the Hon'ble Joint Charity Commissioner, Greater Mumbai Region, Mumbai.
**This 16th day of the Month of December, 2024.**
**Supertendent-(J)**
**Public Trusts Registration Office,**
**Greater Mumbai Region, Mumbai.**

## THE PUBLIC TRUST REGISTRATION OFFICE GREATER MUMBAI REGION, MUMBAI.

Dharmadaya Ayukta Bhavan, 1st Floor Sasmira Building, Sasmira Road, Worli, Mumbai-400 030.

**PUBLIC NOTE OF INQUIRY**

Change Report No. ACC/VII/9540/2024
**Filled by: Dr. Indrajit Yashwantrao Mohite**
**In the matter of: "Vasantdada Sugar Institute"**
P.T.R. No. F-3728 (Mumbai)

To,
All concerned having interest :-
WHEREAS THE Reporting Trustee of the above trust has filed a Change Report under Section 22 of the Maharashtra Public Trusts Act, 1950 for bringing the below described property on the record of the above named trust and an inquiry is to be made by the Ld. Assistant Charity Commissioner-VII, Greater Mumbai Region, Mumbai viz.
**1)** Whether this property is the property of the Trust? And could be registered in the name of the above Trust?

**DESCRIPTION OF THE PROPERITIES**

**Immovable Property:-**
All the piece and parcel of property in the form of land situated at Khapari (Subhedar) PSK, 81 Tq. Nagpur rural Dist. Nagpur within the limits of Panchayat Samiti Nagpur rural Dist. Nagpur bearing;
**Gat No. 50- 2.36 H**
**Boundaries : On the East** - by Survey No. 51
**On the West** - by Vithoba (Vakil) Village Shiv
**On the North** - by Mhasala (Naik) Village Shiv
**On the South** - by Survey No. 49/A & 49/A/2
**Value Rs. 1,22,45,100/-**

This is to call upon you to submit your objections, if any in the matter before the Ld. Assistant Charity Commissioner-VII, Greater Mumbai Region, Mumbai at the above address in person or by a pleader within 30 days from the date of publication of this notice. If no objection is received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary, orders will be passed.
Given under my hand and seal of the Hon'ble Joint Charity Commissioner, Greater Mumbai Region, Mumbai.
**This 16th day of the Month of December, 2024.**
**Supertendent-(J)**
**Public Trusts Registration Office,**
**Greater Mumbai Region, Mumbai.**

## THE PUBLIC TRUST REGISTRATION OFFICE GREATER MUMBAI REGION, MUMBAI.

Dharmadaya Ayukta Bhavan, 1st Floor Sasmira Building, Sasmira Road, Worli, Mumbai-400 030.

**PUBLIC NOTE OF INQUIRY**

Change Report No. ACC/VII/9321/2024
**Filled by: Dr. Indrajit Yashwantrao Mohite**
**In the matter of: "Vasantdada Sugar Institute"**
P.T.R. No. F-3728 (Mumbai)

To,
All concerned having interest :-
WHEREAS THE Reporting Trustee of the above trust has filed a Change Report under Section 22 of the Maharashtra Public Trusts Act, 1950 for bringing the below described property on the record of the above named trust and an inquiry is to be made by the Ld. Assistant Charity Commissioner-VII, Greater Mumbai Region, Mumbai viz.
1) Whether this property is the property of the Trust? And could be registered in the name of the above Trust?

**DESCRIPTION OF THE PROPERITIES**

**Immovable Property:-**
All the piece and parcel of property in the form of land situated at Gopalpur, Tq. Nagpur rural Dist. Nagpur within the limits of Nagpur Municipal Corporation bearing;
**Gat No. 20/1-1-76 H**
**Boundaries : On the East** - by Survey No. 20/2
**On the West** - by Survey No. 19
**On the North** - by Pandhan Road
**On the South** - by Survey No. 20/3
**Total Area of 1.76 H**
**Value Rs. 68,36,700/-**

This is to call upon you to submit your objections, if any in the matter before the Ld. Assistant Charity Commissioner-VII, Greater Mumbai Region, Mumbai at the above address in person or by a pleader within 30 days from the date of publication of this notice. If no objection is received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary, orders will be passed.
Given under my hand and seal of the Hon'ble Joint Charity Commissioner, Greater Mumbai Region, Mumbai.
**This 16th day of the Month of December, 2024.**
**Supertendent-(J)**
**Public Trusts Registration Office,**
**Greater Mumbai Region, Mumbai.**

## THE PUBLIC TRUST REGISTRATION OFFICE GREATER MUMBAI REGION, MUMBAI.

Dharmadaya Ayukta Bhavan, 1st Floor Sasmira Building, Sasmira Road, Worli, Mumbai-400 030.

**PUBLIC NOTE OF INQUIRY**

Change Report No. ACC/VII/9322/2024
**Filled by: Dr. Indrajit Yashwantrao Mohite**
**In the matter of: "Vasantdada Sugar Institute"**
P.T.R. No. F-3728 (Mumbai)

To,
All concerned having interest :-
WHEREAS THE Reporting Trustee of the above trust has filed a Change Report under Section 22 of the Maharashtra Public Trusts Act, 1950 for bringing the below described property on the record of the above named trust and an inquiry is to be made by the Ld. Assistant Charity Commissioner-VII, Greater Mumbai Region, Mumbai viz.
1) Whether this property is the property of the Trust? And could be registered in the name of the above Trust?

**DESCRIPTION OF THE PROPERITIES**

**Immovable Property:-**
All the piece and parcel of property in the form of land situated at Gopalpur, Tq. Nagpur rural Dist. Nagpur within the limits of Nagpur Municipal Corporation bearing;
**Gat No. 20/2-1 H**
**Boundaries : On the East** - by Survey No. 22
**On the West** - by Survey No. 20/1/3
**On the North** - by Pandhan Road
**On the South** - by Survey No. 25
**Total Area of 1.00 H**
**Value Rs. 38,84,000/-**

This is to call upon you to submit your objections, if any in the matter before the Ld. Assistant Charity Commissioner-VII, Greater Mumbai Region, Mumbai at the above address in person or by a pleader within 30 days from the date of publication of this notice. If no objection is received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary, orders will be passed.
Given under my hand and seal of the Hon'ble Joint Charity Commissioner, Greater Mumbai Region, Mumbai.
**This 16th day of the Month of December, 2024.**
**Supertendent-(J)**
**Public Trusts Registration Office,**
**Greater Mumbai Region, Mumbai.**

## THE PUBLIC TRUST REGISTRATION OFFICE GREATER MUMBAI REGION, MUMBAI.

Dharmadaya Ayukta Bhavan, 1st Floor Sasmira Building, Sasmira Road, Worli, Mumbai-400 030.

**PUBLIC NOTE OF INQUIRY**

Change Report No. ACC/VII/9324/2024
**Filled by: Dr. Indrajit Yashwantrao Mohite**
**In the matter of: "Vasantdada Sugar Institute"**
P.T.R. No. F-3728 (Mumbai)

To,
All concerned having interest :-
WHEREAS THE Reporting Trustee of the above trust has filed a Change Report under Section 22 of the Maharashtra Public Trusts Act, 1950 for bringing the below described property on the record of the above named trust and an inquiry is to be made by the Ld. Assistant Charity Commissioner-VII, Greater Mumbai Region, Mumbai viz.
1) Whether this property is the property of the Trust? And could be registered in the name of the above Trust?

**DESCRIPTION OF THE PROPERITIES**

**Immovable Property:-**
All the piece and parcel of property in the form of land situated at Gopalpur, Tq. Nagpur rural Dist. Nagpur within the limits of Nagpur Municipal Corporation bearing;
**Gat No. 20/3-1.00 H**
**Boundaries : On the East** - by Survey No. 20/2
**On the West** - by Survey No. 19
**On the North** - by Survey No. 20/1
**On the South** - by Survey No. 25
**Total Area of 1.00 H**
**Value Rs. 38,84,000/-**

This is to call upon you to submit your objections, if any in the matter before the Ld. Assistant Charity Commissioner-VII, Greater Mumbai Region, Mumbai at the above address in person or by a pleader within 30 days from the date of publication of this notice. If no objection is received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary, orders will be passed.
Given under my hand and seal of the Hon'ble Joint Charity Commissioner, Greater Mumbai Region, Mumbai.
**This 16th day of the Month of December, 2024.**
**Supertendent-(J)**
**Public Trusts Registration Office,**
**Greater Mumbai Region, Mumbai.**

## THE PUBLIC TRUST REGISTRATION OFFICE GREATER MUMBAI REGION, MUMBAI.

Dharmadaya Ayukta Bhavan, 1st Floor Sasmira Building, Sasmira Road, Worli, Mumbai-400 030.

**PUBLIC NOTE OF INQUIRY**

Change Report No. ACC/VII/9323/2024
**Filled by: Dr. Indrajit Yashwantrao Mohite**
**In the matter of: "Vasantdada Sugar Institute"**
P.T.R. No. F-3728 (Mumbai)

To,
All concerned having interest :-
WHEREAS THE Reporting Trustee of the above trust has filed a Change Report under Section 22 of the Maharashtra Public Trusts Act, 1950 for bringing the below described property on the record of the above named trust and an inquiry is to be made by the Ld. Assistant Charity Commissioner, Greater Mumbai Region, Mumbai viz.
1) Whether this property is the property of the Trust? And could be registered in the name of the above Trust?

**DESCRIPTION OF THE PROPERITIES**

**Immovable Property:-**
All the piece and parcel of property in the form of land situated at Gopalpur, Tq. Nagpur rural Dist. Nagpur within the limits of Nagpur Municipal Corporation bearing;
**Gat No. 28-1.58 H**
**Boundaries : On the East** - by Survey No. 27
**On the West** - by Survey No. 51/52/53
**On the North** - by Survey No. 18/19
**On the South** - by Survey No. 29
**Total Area of 1.58 H**
**Value Rs. 63,81,500/-**

This is to call upon you to submit your objections, if any in the matter before the Ld. Assistant Charity Commissioner-VII, Greater Mumbai Region, Mumbai at the above address in person or by a pleader within 30 days from the date of publication of this notice. If no objection is received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary, orders will be passed.
Given under my hand and seal of the Hon'ble Joint Charity Commissioner, Greater Mumbai Region, Mumbai.
**This 16th day of the Month of December, 2024.**
**Supertendent-(J)**
**Public Trusts Registration Office,**
**Greater Mumbai Region, Mumbai.**

# सरकारी मनमानी!



180 वर्षांपासून जेथे नमाज सुरू, ती मशीद अवैध करार देण्यात आली. 10 डिसेंबर 2024 रोजी उत्तर प्रदेशातील लालौली शहरातील 185 वर्षे जुन्या नूरी जामा मशिदीजवळ प्रशासनाने 3 बुलडोझर उभे केले. आजूबाजूचा 500 मीटर परिसर सील करण्यात आला. 10 पोलिस ठाण्यांतील सुमारे 200 पोलिस, जलद कृती दलाच्या 3 तुकड्या आणि पीएसी यांनी संपूर्ण परिसराला वेढा घातला. मशिदी समितीच्या सदस्यांव्यतिरिक्त कोणालाही मशिदीजवळ येऊ दिले नाही. प्रशासनाने मशिदीचा मागील भाग बेकायदेशीर ठरवून अवघ्या 90 मिनिटांत तो पाडला. नूरी मशीद प्रकरणाची अलाहाबाद उच्च न्यायालयात 3 दिवसांनी सुनावणी होणार असताना ही कारवाई झाली. सरकारच्यावतिने केली जाणारी ही मनमानी नव्हे काय?

---------------

मशिदीवर बुलडोझरच्या कारवाईनंतर लालौलीची अवस्था बिकट दिसून आली येथे मशिदीचा पडलेला भाग कपड्याने झाकण्यात आला आहे. पाडलेल्या भागासमोर लोक नमाज अदा करत आहेत. नूरी मशीद 185 वर्षांहून अधिक जुनी असू शकते, परंतु पूर्वी तिची रचना वेगळी होती. 100 वर्षांपूर्वी मशिदीचा आकार लहान होता. त्यावेळी ती 210 चौरस मीटरमध्ये पसरले होते. मस्जिद समितीने खासराचा 185 वर्षे जुना सरकारी नकाशा दाखवला, ज्याचे मोजमाप समान आहे.

मुस्लिम मशिदीच्या आसपास राहतात. त्यांचा दावा आहे की त्यांचे पूर्वज अनेक पिढ्यांपासून या मशिदीत रोज नमाज अदा करत आहेत. एएसआयने स्वतः याला ऐतिहासिक वारसा मानले आहे. येथील रस्त्याचे रुंदीकरण करण्यात येत असल्याचे फतेहपूर प्रशासनाचे म्हणणे आहे.

यामध्ये लालौली गावात 139 मालमत्तांची ओळख पटली, ज्याचा काही भाग महामार्गावर येत होता. रस्त्याचे मोजमाप करताना मशिदीमागील 150 चौरस फूट जागा बेकायदेशीर असल्याचे आढळून आले, त्यामुळे तो पाडण्यात आला.

1839 मध्ये बांधलेल्या नूरी मशिदीवर बुलडोझर चालवल्याने लालौलीतील लोक संतप्त झाले आहेत. देशभरातील मशिदी आणि दर्ग्यांवर खटले सुरू असताना ही कारवाई झाली आहे. अलीकडेच संभलमध्ये अशाच वादातून हिंसाचार उसळला होता, ज्यामध्ये 4 जणांचा मृत्यू झाला होता.

याशिवाय जौनपूरची अटाला मशीद, फतेहपूर सिक्रीची जामा मशीद आणि राजस्थानची अजमेर शरीफ दर्गा यांचीही प्रकरणे न्यायालयात आहेत. हे मंदिर पाडल्यानंतर बांधण्यात आल्याचा दावा केला जातो. दरम्यान, नूरी मशिदीचा काही भाग पाडल्याचा ऑल इंडिया मुस्लिम जमातसारख्या अनेक इस्लामिक संघटनांनी निषेध केला आहे.

ऑल इंडिया मुस्लिम जमातचे राष्ट्रीय अध्यक्ष मौलाना मुफ्ती शहाबुद्दीन राजावी बरेलवी म्हणतात, '180 वर्षे जुनी नुरी मशीद हा ऐतिहासिक वारसा आहे. शासनाच्या सर्व नोंदींमध्ये त्याचे नाव नोंदवले गेले आहे. तरीही बुलडोझर वापरणे बेकायदेशीर म्हणणे अतिरेक आहे.

'सर्वोच्च न्यायालयाने धार्मिक स्थळांवर बुलडोझर चालवण्यास बंदी घातली आहे. मात्र सरकार याकडे दुर्लक्ष करून न्याय आणि संविधानाच्या विरोधात काम करत आहे.

मशीद समितीचे मुख्य सचिव मोहम्मद तय्यब नूरी त्या दिवसाविषयी सांगताना भावुक होतात. ते म्हणतात, 'ज्या मशिदीत शतकानुशतके नमाज अदा केली जात आहे. ती पाडण्यापूर्वी प्रशासनाने एकदाही विचार केला नाही.'

'10 डिसेंबर रोजी अधिकारी मोठ्या फौजफाट्यासह मशिदीजवळ पोहोचले. त्यांना बुलडोझर चालवण्याची एवढी घाई झाली होती की, आम्हाला मशिदीच्या आतून सामान बाहेर काढण्याचीही परवानगी नव्हती. आतमध्ये दीड लाख रुपये किमतीचे गालिचे होते. अडीच लाख रुपये किमतीचा सोलार प्लांट बसवण्यात आला. धार्मिक पुस्तके, पंखे-



कूलर, एसी आणि अनेक घड्याळे लावण्यात आली. एका झटक्यात सर्व काही तुटले.

नूरी जामा मशीद प्रकरणाची अलाहाबाद उच्च न्यायालयात 13 डिसेंबर रोजी सुनावणी होणार होती, परंतु जिल्हा प्रशासनाने सुनावणीच्या 3 दिवस आधी बुलडोझर फिरवला.

मशीद इतकी जुनी असताना अचानक बेकायदेशीर का घोषित करण्यात आली? मशिदीचा 185 वर्षांचा मुहाफिजखाना नकाशा दाखवत तय्यब उत्तर देतात, 'जर कोणी दुसऱ्याच्या जमिनीवर कब्जा केला तर त्याला अतिक्रमण म्हणतात. आम्ही सरकारी जमिनीवर मशीद बांधलेली नाही.

'या कारवाईत प्रशासनाची केवळ घाई दिसून आली. काही प्रमाणात याला सरकारची मनमानीही म्हणता येईल. ती सतत त्याच समाजाला टार्गेट करत असते. फतेहपूर प्रशासन मशिदीवर कारवाई करू शकते की नाही याबाबत अलाहाबाद उच्च न्यायालयात 13 डिसेंबर रोजी सुनावणी होणार होती. त्याआधीही मशिदीचा काही भाग पाडण्यात आला होता. कायदेशीररीत्या, मशीद पाडल्यानंतर तिच्यावर कारवाई करण्याची कोणतीही भूमिका नाही.

अशा परिस्थितीत मशीद समितीचे मुख्य सचिव तय्यब नूरी म्हणतात, 'मशीद पाडण्यात आली. आता लालौलीत मशीद की रस्ता आधी आला हे सिद्ध करण्यासाठी आम्ही प्रशासनाला न्यायालयात आव्हान देणार आहोत. इतक्या जुन्या मशिदीवर अचानक कारवाई कशी होऊ शकते?

'आम्हाला जाणून घ्यायचे आहे की, जर हे प्रार्थनास्थळ बेकायदेशीर होते, तर प्रशासन आजपर्यंत का झोपले होते. याबद्दल आधी का बोलले नाही? बेकायदेशीर किंवा बेकायदेशीर जमिनीवर मशीद बांधता येणार नाही असा कायदा इस्लाममध्ये आहे. मग प्रशासन याला अवैध अतिक्रमण कसे म्हणायचे?

**मशीद नसताना काय होतं?**

नूरी मशिदीच्या इतिहासावर समिती अनेक दावे करते. लालौली येथील रहिवासी अन्सार खान यांच्या म्हणण्यानुसार, 'नूरी मशीद 1839च्या आसपास स्थानिक लोकांनी बांधली होती. तेव्हा इथे रस्ता नव्हता. हा निर्जन भाग होता. स्वातंत्र्यानंतर 1956 मध्ये येथे प्रथमच महामार्ग बांधण्यात आला. पूर्वीपासून लोक येथे नमाज अदा करत आहेत.

'स्वातंत्र्य लढ्यातही या मशिदीचे योगदान आहे. ब्रिटीश राजवटीत फतेहपूरमध्ये गावे वसवली जाऊ लागली. येथे मुस्लिम समाजातील लोक मोठ्या संख्येने राहत होते. यातील अनेक स्वातंत्र्यसैनिकांची कुटुंबे आजही येथे राहत आहेत.

अन्सार सांगतात, 'समितीने फतेहपूर प्रशासन आणि पीडब्ल्यूडीला 3 नोटिसा पाठवल्या, पण प्रतिसाद मिळाला नाही. नूरी मशीद प्रकरणाची सुनावणी 6 डिसेंबरला हायकोर्टात होणार होती, मात्र नंतर ती 13 डिसेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आली. प्रशासनाने सुनावणीच्या 15 दिवस आधी मशिदीचा मागील भाग पाडला.

मशिदीसोबतच अनेक हिंदू-मुस्लिम दुकानदारांची रोजीरोटी गमवावी लागली ऑगस्ट 2024 मध्ये बांदा-फतेहपूर राज्य महामार्गाच्या विस्तारापूर्वी, प्रशासनाने लालौलीतील 139 घरे आणि दुकानांवर लाल चिन्हे लावली होती. त्यातील काही भाग रस्त्याच्या आवाक्यात येत होता. ते पाडण्यापूर्वीच लोकांनी स्वतःहून घरे व दुकाने पाडली होती, जेणेकरून त्यांच्याकडून कोणतेही पाडण्याचे शुल्क घेतले जाऊ नये. नूरी जामा मशिदीचा काही भाग कोसळल्यानंतर येथील लोकांच्या वेदना पुन्हा वाढल्या आहेत.

विजय कुमार 17 वर्षांपासून लालौली मार्केटमध्ये दागिन्यांचा व्यवसाय करत आहेत. त्याचे दुकानही पाडावे लागले. विजय सांगतात, 'एकीकडे सरकार म्हणते की आम्ही लोकांना घरं आणि रोजगार देतो, पण इथे ना घरं उरली ना रोजगार. या तोडफोडीला लालौलीतील लोक कंटाळले आहेत.

त्यांच्या शेजारी उभ्या असलेल्या मेहबूब अली यांनीही मान हलवत त्याच्याशी सहमती दर्शवली. मेहबूब नाज हे मोबाईल शॉप नावाचे दुकान चालवत असत. त्यांचे दुकानही ३ महिन्यांपूर्वी फोडण्यात आले होते. मेहबूब सरकारकडे मागणी करतात आणि म्हणतात, 'आम्हाला सरकारकडून हा रस्ता लवकरात लवकर बनवायचा आहे जेणेकरून लोकांचा त्रास कमी होईल.'

उच्च न्यायालयात सुनावणीपूर्वी मशिदीवर बुलडोझरची कारवाई कशी झाली? प्रशासनाने कारवाईची घाई का केली? हे प्रश्न यूपी पीडब्ल्यूडी कार्यालयातील वरिष्ठ अभियंत्यांना विचारले असता, प्रकरण संवेदनशील असल्याने अधिकारी बोलणे टाळतात.

फतेहपूर विभागाचे पीडब्ल्यूडी अभियंता म्हणतात, 'विभागाने नियमानुसार कारवाई केली आहे. रस्ता रुंद करण्याचे आदेश आहेत. पीडब्ल्यूडीने ऑगस्टमध्येच लालौलीला याबाबत नोटीस पाठवली होती. बांदा-बहराइच महामार्गाच्या रुंदीसाठी रस्त्याचे मोजमाप केले असता, मशिदीमागील 150 चौरस फूट भाग बेकायदेशीरपणे बांधण्यात आल्याचे आढळून आल्याने ते पाडण्यात आले.

तथापि, सुनावणी पूर्ण होईपर्यंत कारवाई थांबवता आली नसती का? या प्रश्नावर अधिकारी म्हणतात, 'नूरी मशिदीचे प्रकरण हायकोर्टात सुरू आहे. पीडब्ल्यूडीला न्यायालयाकडून रस्त्याचे काम थांबवण्याचे आदेश न मिळाल्याने विभागाने वेळापत्रकानुसार कारवाई केली.

आता येथील परिस्थिती पूर्णपणे सामान्य झाली आहे. तथापि, उत्तर प्रदेश सरकारला सर्वसामान्य लोकांचे अगणित प्रश्न सोडविण्याऐवजी धार्मिक स्थळांमध्ये आणि विशेषतः मुस्लिम समुदायांचे प्रार्थना स्थळ तोडण्यात रूची दिसून येते.

●●●●●●●●●

---

सध्याच्या स्पर्धात्मक युगात आपल्या पाल्यांना बहुतांश हिंदु पालक आपल्या पाल्यांना कॉन्व्हेंट शाळांत घालत आहेत. या ठिकाणी शिक्षणासोबत विद्यार्थांना खिस्ती पंथाच्या परंपरा, इतिहास यांच्या संदर्भातही माहिती दिली जात असल्याने या हिंदू मुलांच्या घरी खिसमस सुध्दा साजरा होऊ लागला आहे. पालकांना २५ डिसेंबर ते १ जानेवारी दरम्यान खिस्ती इतिहासात काय काय घडले याची इथंभूत माहिती असते; मात्र २१ ते २७ डिसेंबर या दिवसांत भारताच्या इतिहासात काय घडले हे मात्र ठाऊक नसते. अनेकांना या दिवसांचा पराक्रमी इतिहास ठाऊक नाही. शीख समाजातील लोक डिसेंबर महिन्यातील या सात दिवसांत कोणतेही शुभकार्य करत नाहीत. त्यांच्यासाठी हा सप्ताह अत्यंत दुःखद समजला जातो. या सात दिवसांत शिखांचे दहावे गुरू गुरु गोविंद सिंह यांचे संपूर्ण कुटुंब धर्माकरीता हुतात्मा झाले.

# वीरपुत्र फतेह सिंह आणि जोरावर सिंह

-----------------------

२१ डिसेंबर १७०४ या दिवशी सिरसा नदीच्या काठावर चमकौर येथे शीख आणि मुघल यांच्यात घनघोर लढाई झाली. हीच लढाई पुढे चमकौरची लढाई नावाने इतिहासात अजरामर झाली. गुरु गोविंद सिंह यांच्या नेतृत्वाखाली केवळ ४० शिखांनी वजीर खानच्या १० लाख मुघल सैनिकांशी जीवाच्या शिकस्तीने लढा दिला.

२१ डिसेंबरला श्री गुरु गोविंद सिंह यांनी आपल्या कुटुंबासह श्री आनंदपूर साहिबचा किल्ला सोडला. २२ डिसेंबरला गुरु साहिब आपल्या दोन मोठ्या मुलांसह चमकौरच्या मैदानावर पोहोचले. त्यांच्या घरातील स्वयंपाक्याने गुरू साहिबांची पत्नी आणि दोन लहान मुलांना आपल्या घरी नेले.

चमकौरच्या लढाईत शत्रूंशी लढताना गुरू साहिब यांचा १७ वर्षीय मोठा मुलगा अजित सिंह आणि १४ वर्षाचा धाकटा मुलगा जुझार सिंह त्यांच्या ११ साथीदारांसह हुतात्मे झाले. २३ डिसेंबरला गुरु गोविंद सिंहांची पत्नी आणि दोन्ही लहान मुलांना फितुरीने पकडण्यात आले. २४ डिसेंबरला आई गुजर कौर आणि दोन भावांना सरहिंद येथे नेण्यात आले.

२५ डिसेंबरला ६ वर्षाच्या धाकट्या फतेह सिंह यांना वजीर खानच्या दरबारात हजर करून त्यांना धर्मांतराचे आमिष दाखवण्यात आले. यावेळी वजीर खान ६ वर्षाच्या कोवळ्या फतेह सिंहांना मग्रुरीने सांगतो, इस्लाम धर्म स्वीकारा, नाहीतर मरणाला तयार राहा !'

त्यावर फतेह सिंह तेवढ्याच बाणेदारपणे सांगतात, इस्लाम स्वीकारला, तर मरण येणार नाही का? मरण येणारच असेल, तर ते आपल्या धर्मात राहून धर्मासाठी बलिदान करून मरण पत्करू. ६ वर्षे वयात कुठून आला हा धर्माप्रतीचा एव्हढा जाज्वल्य अभिमान? फतेह सिंहांच्या या उत्तराने वजीर खानही चक्रावला. धर्मांतरास तयार न झाल्याने २६ डिसेंबरला ८ वर्षीय जोरावर सिंह आणि ६ वर्षांचे फतेह सिंह यांना भिंतीत जिवंत गाडण्यात आले.

फतेह सिंहांच्या मानेपर्यंत वीटा बांधण्यात आल्या तेव्हा जोरावर सिंह रडू लागले आणि म्हणाले तू माझ्यानंतर जगात आलास; मात्र बलिदानात तू माझ्यापुढे चाललास. ६-८ वर्षांच्या वयात कोणामध्ये असते एव्हढे धैर्य आणि एव्हढा त्याग? ज्या वयात मुलांना पदोपदी आई वडिलांच्या आधाराची गरज भासते त्या वयात या दोघा भावंडांचा धर्माप्रतीचा त्याग, धमार्साठी हसत हसत बलिदान करण्याची वृत्ती केवळ अवर्णनीय आहे. दोन्ही मुलांच्या बलिदानाचे वृत्त माता गुजर कौर यांच्या कानी पडताच २७ डिसेंबरला त्यांनीही प्राणत्याग केला.

काश्मीर मधील हिंदूंचे धर्मांतर थांबावे यासाठी गुरु गोविंद सिंह यांचे पिता गुरु तेगबहादूर सिंह यांनी स्वतःहून बलिदान दिले. शिखांच्या सर्वच गुरुनी हिंदू धर्माच्या रक्षणासाठी प्रसंगी स्वतःचे प्राण पणाला लावले. गुरु गोविंद सिंहाच्या परिवाराच्या त्यागाचे स्मरण म्हणून केंद्र सरकारने गतवर्षीपासून २६ डिसेंबर वीर बाल दिवस म्हणून साजरा करण्याचे जाहीर केले. गुरु गोविंद सिंहांच्या पुत्रांनी दाखवलेले शौर्य आणि धर्माभिमान ही भारतभूमी कधीही विसरणार नाही.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

लहान वयातच देश आणि धर्म यासाठी बलिदान करण्यास सिद्ध झालेल्या अशा वीरपुत्रांच्या आणि त्यांना घडवणाऱ्या पालकांच्या कथा मोबाईल गेम्स आणि इंटरनेटच्या दुनियेत हरवलेल्या आजच्या पिढीला ज्ञात असणे आवश्यक आहे. भारतभूमी ही शूरांची, वीरांची आणि क्रांतिकारकांच्या निस्सीम त्यागाची भूमी आहे. धर्माप्रती आणि देशाप्रती त्याग करण्याची भविष्यात वेळ आलीच तर या वीरपुत्रांचा आदर्श आपल्या डोळ्यासमोर राहायला हवा ! ●●●

---

# बॉक्सिंग डेः शॉपिंग आणि मनोरंजनासाठी प्रसिद्ध

बॉक्सिंग डे हा दरवर्षी २६ डिसेंबर रोजी खिसमसच्या दुसऱ्या दिवशी साजरा केला जातो. हा सण प्रामुख्याने युनायटेड किंगडम, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडसारख्या देशांमध्ये महत्त्वाचा आहे. बॉक्सिंग डेचा मूळ उद्देश गरजू लोकांना मदत करणे हा आहे. पूर्वी या दिवशी श्रीमंत लोक त्यांच्या नोकरांना आणि गरीब लोकांना भेटवस्तू किंवा मदतीचे बॉक्स-पेटारे द्यायचे. त्यामुळेच या दिवसाला बॉक्सिंग डे असे नाव पडले. या दिवशी चर्चमध्ये विशेष दानपेट्या उघडल्या जातात आणि गरजू लोकांसाठी मदतीचे आयोजन केले जाते.

---------------

आजकाल, बॉक्सिंग डे हा शॉपिंग आणि मनोरंजनासाठी प्रसिद्ध आहे. या दिवशी विविध ठिकाणी मोठ्या सवलती मिळतात, त्यामुळे लोक खरेदीसाठी गर्दी करतात. त्याशिवाय, क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनही होते. बॉक्सिंग डे आपल्याला दानशूरतेचे आणि परोपकाराचे महत्त्व अधोरेखित करतो. हा दिवस आनंद, एकोपा, आणि समाजातील गरजूंप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी साजरा केला जातो.

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात आजपासून मेलबोर्न येथे पहिला कसोटी सामना सुरु झाला. याशिवाय दक्षिण आफ्रिकेत दक्षिण आफ्रिका विरुद्ध श्रीलंका कसोटी सामनाही आजपासून सुरु झाला. खिसमसच्या दुसऱ्या दिवशी कसोटी सामना खेळण्याची प्रथा रुढ झाली आहे. इतर खेळांमध्येही ही प्रथा दिसून येते. या दिवसाला म्हणजेच २६ डिसेंबरला बॉक्सिंग डे म्हणतात. परंतु, याचा बॉक्सिंग या खेळाशी काहीही संबंध नाही. आता तुम्ही म्हणाल मग याचा अर्थ काय?

**कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे**
**रामनगर वार्ड, गडचिरोली.**
**9423714883**

तर या बॉक्सिंग डेचा संबंध एखाद्या खोक्यामधून अर्थात बॉक्समधून भेटवस्तू देणे किंवा दानपेट्या उघडून त्याचे गोरगरीबांना वाटप करण्याशी येतो. कॉमनवेल्थ देशांमध्ये ही प्रथा रुढ झाल्याचे दिसून येते.

ही प्रथा रुढ होण्यामागे अनेक तर्क लावले जातात. इंग्लंडमध्ये एकोणिसाव्या शतकात ही प्रथा रुढ झाल्याचे काही इतिहासकार सांगतात. खिसमसच्या दिवशी अनेक जण चर्च- गिरीजाघरांमध्ये जाऊन दानपेटीत दान टाकतात. त्याच्या दुसऱ्या दिवशी दानपेटी उघडून त्यातील दान गरीबांमध्ये वाटले जाते. त्यामुळे या दिवसाला बॉक्सिंग डे म्हटले जाऊ लागले.

हा शब्द श्रीमंत घरांमधुनही रुढ झाल्याचे काही जण सांगतात. अशा कुटुंबांमधील नोकरवर्ग खिसमस साजरा करुन सुटीवर जायचा. त्यामुळे नोकरवगार्ला कपडे, पैसे इत्यादी भेटवस्तू दिल्या जायच्या. या भेटवस्तू बॉक्समधून दिल्या जायच्या.

काही जणांनुसार गिरीजाघरांच्या बाहेर दानपेट्या ठेवण्यात येत होत्या. वर्षभर त्यात पडणारे दान खिसमसच्या दुसऱ्या दिवशी गरीबांच्या मदतीसाठी वाटप केले जायचे. सुटी असल्यामुळे या दिवशी अनेक जण शिकारीला जायचे किंवा खेळाचे आयोजन करायचे. त्यामुळे या दिवशी अनेक खेळांचे आयोजन केले जाऊ लागले. युरोपमध्ये बॉक्सिंग डेच्या दिवशी फुटबॉलच्या सामन्यांचे आयोजन करण्यात येते. !!

जागतिक बॉक्सिंग डेच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !

●●●●●●●●●

---

# ... तर नववर्षाचा आनंद द्विगुणित होईल!

३१ डिसेंबरच्या रात्री नववर्षाचे स्वागत दारू पिऊन करण्याकडे तरुण वर्गाचा कल असतो. नववर्षाच्या पूर्वसंध्येला पब किंवा क्लब मध्ये जाऊन पार्टी करणे, दारू पिऊन गाडी चालवणे, हुल्लडबाजी करणे, सायलंसरच्या पुंगळ्या काढून आवाज करणे, मोठ्या आवाजाचे फटाके वाजवणे, डिजेच्या किंवा लाऊड स्पिकरच्या कर्णकर्कश आवाजात भिभत्स नृत्य करणे यासारख्या गोष्टी तरुण वगार्मार्फत केल्या जातात.

यावर्षी तर हे प्रमाण खूपच वाढणार आहे कारण शासनानेच पब, क्लब, रेस्टॉरंट रात्रभर सुरू ठेवण्यास परवानगी दिली आहे. पब, क्लब, रेस्टॉरंट रात्रभर सुरू राहणार असल्याने तरुणांनी आतापासूनच पार्टीची तयारी सुरू केली आहे. नववर्षाचे अशाप्रकारे स्वागत करणे म्हणजे कायदा सुव्यवस्थेचा भंग करणे हे माहीत असूनही अशा गोष्टी केल्या जातात. अलीकडे तर या गोष्टी खूपच वाढल्या आहेत.

दारू पिऊन नववर्षाचे स्वागत करण्याची फॅशनच हल्ली रूढ झाली आहे. नववर्षाच्या पूर्वसंध्येला दारू पिलीच पाहिजे असाच समज तरुण वर्गाचा झाला आहे. दारू न पिताही नववर्षाचे स्वागत करता येते यावर त्यांचा विश्वासच नाही त्यामुळेच नववर्षाचे स्वागत दारू पिऊनच केले जाते. दारूचे दुष्परिणाम माहीत असूनही या गोष्टी केल्या जातात. दारू पिऊन भरधाव वेगात गाड्या चालवतात. दारू पिऊन भरधाव वेगात गाडी चालवल्याने बऱ्याचदा अपघात होतात. या अपघातात काही जण मरण पावतात तर काही जण जखमी होतात काही तर काही जण कायमचे जायबंदी होतात.

दारू पिऊन गाडी चालवल्याने झालेल्या अपघातात घरातील कर्ता पुरुष गेल्याने कुटुंब रस्त्यावर येते. दारू पिऊन गाडी चालवणे म्हणजे स्वतःसह इतरांचाही जीव धोक्यात घालणे म्हणूनच नववर्षाचे स्वागत करताना स्वतःसह इतरांना त्रास होणार नाही याचे भान सर्वांनी ठेवावे. सरत्या वर्षाला निरोप देताना आणि नव्या वर्षाचे स्वागत करताना बंधनाची ऐशीतैशी होणार नाही याची काळजी सर्वांनीच घ्यायला हवी.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

नववर्षाचे स्वागत म्हणजे चांगल्या वाईट गोष्टी दूर सारुण नववर्षाच्या सूर्योदयाच्या साक्षीने नव संकल्पाचा अवलंब करणे, त्याचे निश्चित धोरण ठरवणे, सत्याची कास धरणे आणि नव्या जोमाने, नव्या उत्साहाने कामाला लागणे. यामुळे नव्या वषार्चे स्वागत करताना पाश्चात्यांचे अंधानुकरण बंद करून प्रत्येकाने चांगले काम करण्याचा संकल्प केला पाहिजे.

आज जगाचा पोशिंदा संकटात आहे. आस्मानी आणि सुलतानी संकटांने पिचलेला बळीराजा आत्महत्या करीत आहेत. देशाचे रक्षणकर्ते जवान दहशतवाद्यांच्या, नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात शहीद होत आहेत. दारूच्या नशेत नववषार्चे स्वागत करण्यापेक्षा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुले, शहीद जवानांची मुले तसेच अनाथ मुलांना मदत करून आपण नव वर्षाचे स्वागत करू शकतो. आर्थिकदृष्ट्या गरीब कुटुंबाना आर्थिक मदत करून त्यांच्या मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारून, गोरगरीब मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून, वृद्धाश्रमाला, अनाथ आश्रमाला आर्थिक मदत करून आपण नववर्ष साजरे करू शकतो. रक्तदान म्हणजे सर्वश्रेष्ठ दान. नववर्षाची सुरुवात जर आपण रक्तदान करून केली तर एखाद्या रुग्णाचे प्राण वाचवल्याचे समाधान आपल्याला मिळू शकते. अवयव दानाचा संकल्पही करू शकतो.

छोटे छोटे संकल्प आपल्याला भविष्यात मोठा फायदा करून देणारे ठरू शकतात त्यामुळे आपले आणि आपल्या प्रिय जणांचे जीवन अधिक समृध्द आणि अर्थपूर्ण होऊ शकते.

*जुने जाऊ द्या मरणागुनी.....*
*जाळूनी किंवा पुरूनी टाका....*


या कवितेच्या ओळी प्रमाणे मागील वर्षीच्या सर्व चांगल्या वाईट भावना पुसून नव्या वषार्चे स्वागत करायला हवे. सामाजिक बांधिलकीचे ऋण सेवेतून व्यक्त करण्याचा तसेच अपप्रवृत्तींना आळा घालण्याचा संकल्प केला तर, नववर्षाचा आनंद द्विगुणित होईल.

■ ■ ■

---

# अनेक समस्यांवर रामबाण औषधी गुळवेल

आयुर्वेदानुसार, गुळवेल आपल्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानली जाते. गुळवेलचा रस प्यायल्यामुळे तुमच्या शरीरातील अनेक समस्या दूर ठेवण्यास मदत होते. सध्या अनेकांना कामाच्या व्यापामुळे स्वतःच्या जीवनशैलीकडे लक्ष देता येत नाही. खराब जीवनशैलीमुळे तुमच्या शरीरामध्ये अनेक हार्मोनल बदल होतात.



शरीरात हार्मोनल बदल झाल्यामुळे अनेक समस्या होण्याची शक्यता असते. गुळवेलचा रस प्यायल्यामुळे तुमच्या शरीरातील अनेक रोग दूर होण्यास मदत होते. अनेकजण गुळवेलच्या फायद्यामुळे त्याचे सेवन त्यांच्या दैनंदिन आहारात समावेश करतात. परंतु अनेकवेळा काही लोकांना गुळवेलच्या रसाचे सेवन केल्यास त्रास होऊ शकतो.

**गुळवेलचा रस पिण्याचे फायदे :**

रोगप्रतिकारशक्ती वाढते झ गुळवेलचा रस प्यायल्यामुळे तुमच्या शरीरातील रोगप्रतिकारकशक्ती वाढण्यास मदत होते. शरीरातील रोगप्रतिकारशक्ती वाढल्यामुळे रोगांशी लढण्याची शक्ती मिळते आणि शरीर निरोगी राहाण्यास मदत होते.

**ताप येत नाही :** तुम्हाला जर भरपूर प्रमाणात ताप, सर्दी किंवा खोकला यांच्यासारखा त्रास होत असेल तर गुळवेलचा रस तुमच्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरते.

**पचनसंस्था सुधारते :** तुम्हाला जर भरपूर प्रमाणात बद्धकोष्ठता आणि अपचन यांसारख्या समस्या होत असतील तर गुळवेलचा रस तुमच्या शरीरासाठी अत्यंत फायदेशीर ठरते. गुळवेलचा रस प्यायल्यामुळे तुमची पचनक्रिया सुधारण्यास मदत होते.

**त्वचेसाठी फायदेशीर :** तुम्हाला जर कोणत्या प्रकारच्या त्वचेसंबंधीत समस्या असतील तर गुळवेलचा रस तुमच्यासाठी फायदेशीर ठरते. गुळवेलचा रस तुमच्या शरीरातील विषारी पदार्थ कमी करण्यास मदत करते.

**मधुमेहासाठी फायदेशीर :** गुळवेलचा रस तुमच्या शरीरासाठी अत्यंत फायदेशीर ठरतात. गुळवेलचा रस प्यायल्यामुळे तुमच्या रक्तातील साखर नियंत्रित राहाते.

गुळवेल अनेकांसाठी फायदेशीर ठरते तर काही लोकांसाठी घातक ठरु शकते.

तुम्हाला जर कमी रक्तदाबाचा त्रास असेल तरर अशा लोकांनी गुळवेलचा रस पिऊ नये. गुळवेलमुळे तुमच्या शरिरातील रक्तदाब कमी होतो.

गरोदर आणि स्तनपान करणा?्या महिलांनी गुळवेलचा रस पिऊ नये. यामुळे तुम्हाला अनेक समस्या होऊ शकतात.

तुम्हाला जर कोणत्याही प्रकारचे यकृताच्या समस्या असतील तर गुळवेलचा रस पिऊ नये.

तुमच्या घरातील लहान मुलांना तज्ञांच्या सल्ल्याशिवाय गुळवेलचा रस देऊ नये.

●●●●●●●●●

---

## अशोकायन

### पैशाचा पाऊस ?

**पैशाचा पाऊस भौ**
**खरचं का पाडता येतो?**
**अती लोभापायी माणूस**
**सर्व हिरावून बसतो ..**

**जादू अंधश्रध्देच्या आहारी**
**सुशिक्षीत ही जाती**
**बुद्धीचा वापर न केल्याने**
**उर बडवत बसती...**

**त्यांच्यात जर असती**
**पाऊस पाडण्याची शक्ती**
**विचार करा ते स्वतःच**
**नसते झाले करोडपती?**



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

# खासगी वाहनांवर 'महाराष्ट्र शासन' लिहिल्यास कारवाई

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. २६ : महाराष्ट्र शासनाच्या स्वमालकीची वाहने वगळता खासगी वाहनावर 'महाराष्ट्र शासन' लिहून व आतील भागात महाराष्ट्र शासन, नावाची लाल रंगाची पाटी लावण्यास मनाई करण्यात आली आहे. जर अशा प्रकारची वाहने ज्यावर 'महाराष्ट्र शासन' नाव, लाल रंगाची पाटी लावून तसेच वाहनाच्या आतील भागास स्टिकर चिकटवून वाहने रस्त्यावर फिरताना आढळून आली तर अशा वाहनांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे.




खासगी वाहनांवर किंवा वाहनांत 'महाराष्ट्र शासन' अशा पाटी किंवा बोध चिन्हाचा वापर होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यावर मोटार वाहन अधिनियम व त्या अंतर्गत नियमानुसार कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

मोटार वाहन अधिनियम १९८४ नुसार सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांना खासगी वाहनावर सरकारी नावाची पाटी लावण्यास सक्त मनाई आहे. मात्र, खासगी वाहनांवर पोलिस, वकील, डॉक्टर, खासदार, आमदार, न्यायाधीश, महाराष्ट्र शासन, राज्य सरकार, राज्य शासन, केंद्र सरकार, केंद्र शासन अशी स्टिकर लावून राजरोजसपणे परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यां समोरून धावत असतात.

कोणताही सरकारी कर्मचारी अथवा अधिकारी असला, तरी त्याला आपल्या खासगी गाडीवर 'महाराष्ट्र शासन' नावाची पाटी लावता येत नाही. याबाबत प्रादेशिक परिवहन खात्याकडून जाहीर करण्यात आले आहे. सरकारी कर्मचारी आपल्या वाहनांवर 'महाराष्ट्र शासन' नावाची पाटी लावून पोलिस कारवायांपासून वाचण्यासाठी आणि टोलपासून सुटका मिळावी, यासाठी वाहनांवर पोलिस, महाराष्ट्र शासन, केंद्र सरकार, प्रेस आदी पाट्या सर्रासपणे लावल्या जातात. अशा वाहनांच्या आडून गैरकृत्य होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी सावधगिरीची बाब म्हणून परिवहन खात्याने महाराष्ट्र शासनाच्या स्वमालकीची वाहने बगळता खासगी वाहनावर 'महाराष्ट्र शासन लिहून व आतील भागात महाराष्ट्र शासन, नावाची लाल रंगाची पाटी लावण्यास मनाई केली आहे. तसा अध्यादेशच जारी केला आहे.

'पोलिस', 'प्रेस'चाही सर्रास वापर शासकीय कामासाठी ज्या गाड्या भाडेतत्त्वावर शासनाने घेतल्या होत्या, पण आता त्यांचा करार संपला आहे. अशा गाड्यांच्याही दर्शनी भागावर अजूनही 'महाराष्ट्र शासन' असे लिहिलेले असल्याचे समोर आले आहे. अनेक खासगी वाहनांवर 'महाराष्ट्र शासन', 'पोलिस', 'अत्यावश्यक सेवा', 'प्रेस' लिहिलेल्या पाट्याचा वापर काही कर्मचारी तसेच त्यांच्या नातेवाइकां कडून खासगी वाहनात सर्रास करत असतात. यामुळे बऱ्याचदा वाद उद्भवतात. प्रवाशांची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर देखील याचा अवैध वापर वाढला आहे.

नावांच्या पाट्यांचा दुरुपयोग म्हणून कारवाई सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांना ओळखपत्र पुरवले असताना देखील वाहनावर 'महाराष्ट्र शासन' आणि 'पोलिस' अशा अनधिकृत पाट्या लावण्याचे प्रमाण वाढले आहे.

गुन्हेगारांकडून देखील या नावाच्या पाट्यांचा वापर होण्याची शक्यता असते. यामुळे या दृष्टीने सावधगिरी म्हणून अशा वाहनांची तपासणी मोहीम लवकरच परिवहन विभागाच्या वतीने राबवली जाणार आहे., अशी माहिती राज्य शासनाच्या वतीने नुकत्याच जारी करण्यात आलेल्या अध्यादेशात म्हटले आहे.

# टाळमृदंगाच्या गजरात भागवत कथा प्रवचन सोहळ्याचा समारोप



■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. २६ : शिवर येथे टाळमृदंगाच्या गजरात श्रीमदब संगीत भागवत कथा प्रवचन सोहळ्याचा समारोप झाला. श्री दुर्गादेवी मूर्ती व विठ्ठल रुक्मिणी मूर्तींच्या प्राणप्रतिष्ठेच्या वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शिवर येथे १७ ते २४ डिसेंबर या कालावधीत खामगाव येथील भागवताचार्य पुरुषोत्तम महाजन कोळसे यांच्या वाणीतून श्रीमदब संगीत भागवत कथा प्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्त महाराष्ट्रातील नामवंत हरीकीर्तनकारांची हरीकीर्तनांसह विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. या सप्ताहाचा समारोप २४ डिसेंबरला तुकाराम महाराज सखारामपुरकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने करण्यात आला. याप्रसंगी संस्थानचे अध्यक्ष जगदीश मुरूमकार, संत श्री गजानन महाराज मंदिराचे अध्यक्ष धनंजय महाराज मोरखडे उपस्थित होते.

महाप्रसादाचे वितरण : संस्थानतर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या महाप्रसादाचा लाभ अनेकांनी घेतला. श्री दुर्गादेवी संस्थानच्या सोहळ्यात अकोला जिल्ह्यातील हरिपाठ मंडळे, व्यायाम शाळेची पथके, विविध शाळेचे शिक्षक, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सोहळा यशस्वी करण्यासाठी आयोजन समिती व गावकऱ्यांनी परिश्रम घेतले.


शिवर गावातून माऊली हरिपाठ मंडळाच्या नेतृत्वाखाली गावातून श्रीमदब भागवत ग्रंथाची व भागवताचार्य पुरुषोत्तम महाजन कोळसे यांची भव्य नगरप्रदक्षिणा काढण्यात आली.

यावेळी श्रीमदब भागवत ग्रंथाचे व महाराजांचे प्रत्येक चौकात पूजन करण्यात आले. टाळ मृदंगाच्या गजराने व हरीनामाच्या जयघोषाने शिवर नगरी दुमदुमली होती. भाविक भक्तांच्या स्वागतासाठी महिलांनी आपल्या घरासमोर रस्त्यावर मनमोहक आकर्षक रांगोळ्या काढल्या होत्या.

नगर प्रदक्षिणामध्ये सहभागी झालेल्या हरिपाठ मंडळांना प्रत्येक चौकात गावकऱ्यांनी तसेच विविध मंडळांनी नास्ता व चहा-पाण्याची व्यवस्था केली होती.

# वीस लाखांची फसवणूक; सुरतच्या तीन आरोपींना अटक

### एका शिक्षकाची वीस लाखाने ऑनलाइन फसवणूक




■ महासागर प्रतिनिधी,
बुलढाणा, दि. २६ : तंत्रज्ञानाच्या या युगात सामान्य नागरिकांना ऑनलाइन फसवले जात असून अशा घटना नेहमी उघडकीस येत आहेत.

तंत्रज्ञानाचा वापर करून फफसवणूक करणाऱ्या अति हुशार आरोपींपर्यंत पोहोचण्यासाठी पोलिस सुद्धा तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत. शहरातील एका शिक्षकाची वीस लाखाने ऑनलाइन फसवणूक केल्याप्रकरणी बुलडाणा सायबर पोलिसांनी तीन संशयित आरोपींना गुजरात राज्यातील सुरत येथून अटक केली आहे.

शहराला लागून असलेल्या सुंदरखेड येथील शिक्षक अशोक प्रकाश बुलकुडे (वय २९) यांना मागील जानेवारी महिन्यात व्हाइट्स ॲपवर मेसेज आले व त्यांना शेअर मार्केट मध्ये जास्त नफा देण्याचे आमिष देऊन त्यांच्या कडून जवळपास वीस लाख रुपये उकळण्यात आले. मोठ्या रकमेची गुंतवणूक करून ही त्याचा परतावा मिळत नसल्याने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर अशोक बुलकुडे यांनी बुलडाणा सायबर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुध्द गुन्हा दाखल केला. पोलिस अधीक्षक विश्व पानसरे, अप्पर पोलिस अधीक्षक बी.बी.महामुनी यांनी बुलडाणा सायबर ठाण्याचे पोलिस निरीक्षक शिरीष खंडारे यांना हा गुन्हा उघडकीस आणण्याचे निर्देश दिले. त्यानुसार खंडारे यांनी एएसआय शकील खान, पोलिस कर्मचारी राजदीप वानखेडे, विकी खरात, राजू आडवे, कुणाल चव्हाण, ऋषिकेश खंडेराव तसेच पंढरी सातपुते यांचे एक पथक तयार केले. त्यानंतर तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपींचा शोध घेण्यात आला.

यावेळी पथकाने सुरत येथील आरोपी सय्यद नवाज सय्यद समद ( वय २४), अल्ताफ उर्फ फैजल खान अजीज खान (वय २७), शेख सुफीयान शेख इम्रान (वय २३) सर्व राहणार सुरत, यांना अटक करून बुलडाणा येथे आणले. आरोपींना न्यायालयात हजर केले असता त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आल्याची माहिती दिली.

# सैनिकी शाळेच्या विद्यार्थिनी टेनिस क्रिकेटमध्ये राज्यस्तरावर

■ महासागर प्रतिनिधी,
चिखली, दि. २६ : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलडाणा यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीय टेनिस क्रिकेट स्पर्धा तालुका क्रीडा संकुल, मेहकर येथे १९ डिसेंबर रोजी पार पडल्या. या स्पर्धेत राजमाता जिजाऊ मुलींची सैनिकी शाळा व कनिष्ठमहाविद्यालय (विज्ञान), चांधई ता. चिखली येथील १७ वर्षे व १९ वर्षे वयोगटातील मुलींच्या टेनिस क्रिकेट संघाने भाग घेतला होता.




१७ वर्षे संघामध्ये प्राजली वायाळ, लक्ष्मी राजपूत, शुभांगी हांडे, प्रतीक्षा जाधव, अनामिका चौधरी, संध्या धांडेकर, धनश्री ठाकरे, संजना मोरे, समिक्षा पवार, जानवी नेवरे, वर्षा कनाशा, पुजा डावर, रोशनी चोंगळ, ज्ञानेश्वरी चंगळ, पुनम मांडलेवी, श्रुती सुरडकर तर १९ वर्षे संघामध्ये राईया पठाण, पायल कोकाटे, रेणूका कबले, कांचल दांडगे, अस्तिका ढोके, अमृता हाडे, अश्विनी कदम, रागिनी लठाड, शुभांगी धंदरे, प्रियंका बावस्कर, आरती मुकाडे, ऋजुजा लोखंडे, भूमिका जारेकर, ऋजुजा शिंदे, तन्वी तायडे, ओमश्री जोजार यांचा सहभाग होता.

चांगली कामगिरी केल्यामुळे या विद्यार्थिनींची आता राज्यस्तरासाठी निवड झाली आहे. संस्थेचे सचिव राहुल समाधान सावळे, संचालक विवेक समाधान सावळे, शाळेच्या प्राचार्या एम. एस. गवते, अधिक्षिका, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी या यशस्वी विद्यार्थिनींचे कौतुक करत अभिनंदन केले. तसेच पुढे होणाऱ्या राज्यस्तरावरील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या विद्यार्थिनींना शिक्षण निदेशक टी.व्ही. काटे यांनी मार्गदर्शन करत आहे.

# सिंचन योजनेच्या मुख्य कालव्याचे जलपूजन

■ महासागर प्रतिनिधी,
देऊळगाव राजा, दि. २६ : सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार मनोज कायंदे यांच्या हस्ते दगडवाडी उपसा सिंचन योजनेच्या मुख्य कालव्यावरील मौजे आळंदातील वितरण कुंड येथे जल पूजनाचा कार्यक्रम २४ डिसेंबर रोजी संपन्न झाला.



याप्रसंगी बोलताना आ. कायंदे यांनी पिके वाचवण्यासाठी पाणी कमी पडू देणार नाही. तसेच लाभधारकांनी जास्तीत जास्त पाणी मागणी देऊन पाण्याचा लाभ घ्यावा. तसेच पाणीपट्टी भरून शासनास सहकार्य करावे, असे आवाहन केले. दगडवाडी उपसा सिंचन या कालव्यामुळे मौजे आळंद गोंधनखेड, पिंपळगाव, असोला जहागीर, चिंचोली बुरकुल, जवळखेड, उंबरखेड, अंभोरा येथील शेतकऱ्यांना त्यांचे रब्बीचे पीक वाचवण्यासाठी मुबलक पाणी मिळणार आहेत.

यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या जलपूजन कार्यक्रम प्रसंगी संतोष खांडेभराड, दिलीप सानप, गजानन काकड, प्रदीप वाघ, सुधीर खरात सरपंच, रुण भुतेकर, सर्जेराव भूतेकर, साहेबराव खरात, संतोष हिवाळे, बबन नागरे सरपंच, प्रभु सोरमारे, युवराज अटोळे, गवणाजी खार्डे, जगण खार्डे, संतोष डोके, नाजिम शेख, खालिद शेट, पोलिस पाटील विजय खरात, वसंता खार्डे, सरपंच विष्णु बोंद्रे, भगवान चाटे, शरद मांटे, गजानन मांटे, नारायण नागरे, तसेच खडकपूर्णाचे उपअभियंता निलेश घुले, कनिष्ठ अभियंता नितीन डोईफोडे तसेच इतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# प्रभू येशू ख्रिस्तांची शिकवण आत्मसात करुन जीवन सुखकर बनवा

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. २६: प्रभू येशू ख्रिस्तांची शिकवण आत्मसात केल्याने जीवन अत्यंत सुखकर होते. त्यामुळे त्यांचे विचार स्वीकारावे, असे आवाहन अमरावती ख्रिस्त धर्मप्रांताचे महागुरु मॅल्कम सिक्वेरा यांनी केले. साधारणत: महिनाभर चालणाऱ्या ख्रिस्त काळाचा बुधवारी नाताळच्या दिवशी प्रारंभ झाला. यावेळी येथील सेंट झेवियर कॅथ्रेडल चर्चमध्ये आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.



अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके, आचार्य कमल गवई, एकता मंचचे सुरेश रतावा, मनपाचे सहायक आयुक्त नरेंद्र वानखडे, विशेष पोलिस महानिरीक्षक रामराव पोकळे, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे व सागर पाटील, महामंदिरचे प्रमुख धर्मगुरू तथा प्रति महागुरु फादर रमशीन, महामंदिरचे सहायक धर्मगुरु लॉरेन्स मुर्मू, धर्म शिक्षणालयाचे अधीशिक्षक (रेक्टर) फादर मॅथ्यू, उप अधीशिक्षक फादर डॅनियल, आर्थिक बाबींचे प्रशासक फफादर लॉरेन्स गोन्साल्विस, फफादर जेम्स वाकमाला, महागुरुंचे स्वीय सहायक फफादर क्रिसलर आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. नाताळनिमित्त महामंदिर (बिशप हाऊस) परिसरात सर्वत्र ख्रिस्त जन्माचा देखावा सजवला आहे. धर्म शिक्षणालय, मुख्य प्रशासकीय इमारत, ख्रिस्त भगीनींचा कक्ष, बिशप हाऊस या ठिकाणी हे देखावे सजवले आहे. ख्रिस्त काळ संपल्यानंतर हे देखावे त्या ठिकाणाहून हटवले जाणार आहेत. उपस्थित मान्यवरांनी या देखाव्यांचेही अवलोकन केले. यावेळी पोलिस आयुक्तालय, राष्ट्रीय एकता मंचच्यावतीने शुभेच्छा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यालाही आमदार सुलभा खोडके यांनी उपस्थित राहून अनुयायांना गुलाब पुष्प देत शुभेच्छांचे आदान-प्रदान केले. कार्यक्रमा दरम्यान बिशप मॅल्कम सिक्वेरा यांनी आमदार सुलभा खोडके यांचे स्वागत केले. या वेळी लहान मुलांद्वारे सुरेल आवाजात कॅरॉल म्हणजे अर्थातच येशूच्या जन्माच्या गाण्यांचे सादरीकरण केले. अशी होती दिनचर्या : सकाळी ९ वाजता ख्रिस्तयाग, त्यानंतर स्थानिक लोकप्रतिनिधींनी शुभेच्छापर भेटी दिल्या. या वेळी शुभेच्छा संदेशाचे आदान-प्रदान करण्यात आले. दुपारी ४ पासून विविध प्रसंग, देखाव्यांच्या माध्यमातून बाळ येशूचे जीवन दर्शन घडवण्यात आले. त्यानंतर रात्री ख्रिसमस गीतांचे पारायण करण्यात आले. रात्री साडे १० वाजता मिस्सा बलिदान साजरा करण्यात आला.

खोलापूर येथेही ख्रिसमस डे उत्साहात येथील कॅथलिक चर्चमध्ये नाताळ साजरा केला. ख्रिसमस डे च्या निमित्ताने चर्चला व परिसराला फफुले व पताकांनी सजवले होते. कॅथोलिक चर्च प्रमुख फादर के पी जोस यांच्या मार्गदर्शनाखाली सामूहिक प्रार्थना घेतली . ी त्यांनी ख्रिसमस डे चे महत्व सांगितले. बालगोपालांनी हजेरी लावून ख्रिसमस डे चा आनंद लुटला.

# पंचवीस दिवसांत फक्त एक लाख नऊ हजार हेक्टरची ई-पीकपाहणी



बुलडाणा : जिल्ह्यात रब्बीची पीक पेरणी होऊन हिरवा हरभरा विक्रीस आला आहे. गव्हाची पेरणी आटोपली आहे. इतर पिकेही सध्या उगवण क्षमतेत आहे. त्यामुळे सातबारावर स्वत:च शेतकऱ्यांनी पीक पेरा नोंदणी करण्यासाठी ॲण्ड्राइड मोबाइलचा वापर करणे आवश्यक आहे. मात्र शेतकऱ्यांच्या मालाला भाव नसताना तो मोबाइल तरी केव्हा वापरणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्याला ॲप केव्हा कळणार तरीही जिल्ह्यातील एक लाख ९०९६ हेक्टरची नोंदणी शेतकऱ्यांनी केली आहे. अजून ६ लाख ५७ हजार ४३९ हेक्टर आरची नोंदणी बाकी आहे. ही नोंदणी पंचवीस दिवसांतील असून वीस दिवस नोंदणीसाठी बाकी आहेत.

रब्बी हंगामी ई पीक पाहणी डिजिटल क्रॉप सर्वे अंतर्गत जिल्ह्यात आज रोजी पर्यंत सात लाख ५६ हजार ५३५ हे. आर. क्षेत्रापैकी एक लाख ९०९६ हे. क्षेत्रावर, तसेच एकूण आठ लाख ३६ हजार ०३३ पीक पाहणी करावयाच्या ऑनर प्लॉट पैकी एक लाख ५६४२ प्लॉटवर संबंधित शेतकऱ्यांनी आपल्या पिकांची ई पीक पाहणी डीसीएस व्हर्जन ३.० या मोबाईल अपद्वारे आपल्या सातबारावर नोंदणी केलेली आहे. आजवर जिल्ह्यात डिजिटल क्रॉप सर्वे अंतर्गत ई-पीक पाहणीची नोंदणी १४.४२ टक्के क्षेत्रावर झालेली आहे.


**Change Of Name**

MY OLD NAME WAS **MOHAMMAD FAHAD QURAISHI.** NOW MY NEW NAME IS **MOHD FAHED QURESHI.**
**ADD :** HOUSE NO 846, KASABPURA, BEHIND BANDU CLINIC, HANSAPURI, NAGPUR 440018

MY OLD NAME WAS **RUTUMBARA HINDURAO PADALE.** NOW MY NEW NAME IS **DIVYA VISHAL DESHMUKH.**
**ADD :** MEHAKAR ROAD WARD NO. 5 , AMDAPUR BULDHANA

MY OLD NAME WAS **SHEIKH MUHAMMED LOUTH MUHAMMED YAQUB.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD LOUTH.**
**ADD :** WALIDAIN MASJID, RAJARAM SOCIETY , NAGPUR

MY OLD NAME WAS **MUHAMMED YAQUB SHEIKH.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD YAQUB MOHAMMAD ISHAQUE.**
**ADD :** WALIDAIN MASJID, RAJARAM SOCIETY, NAGPUR



**NAGPUR MUNICIPAL CORPORATION**
**Tender Notice**

Commissioner NMC invites Offline tenders for the following works in Two Envelops System. These Offline tender can be submitted by the registered contractors of NMC. The Terms and conditions of Offline tenders are available in Tender Form. The sale and purchase of tender form can be done at E.E. (DPDC, SLUM), 5th Floor NMC Civil Office

| Sr. No. | Name of Work | BOQ Cost Rs. | EMD |
|---|---|---|---|
| 1-2024 | Construction of Toilet Block at Samaj Bhavan near Kranti Jyoti Savitribai Fule Buddha Vihar at Savitribai Fule Nagar Manewada Road in P.N. 34 | 397575 | 4000 |
| 2-2024 | Repairing Civil Work of Sulabh Shouchalaya at Kamal Chowk Nagpur | 403386 | 4100 |
| 3-2024 | Repairing Civil Work of Sulabh Shouchalaya at Juni Mangalwari Nagpur | 401544 | 4100 |
| 4-2024 | Water Pro ofing Repairing Sanitary Work & Painting of Shahar Sadan Kendra (Samagra Building) at Nandanvan | 826842 | 8500 |
| 5-2024 | Artistic Painting & Pro. & Laying Tiles of Sanjay Nagar Primary School at Depty Signal | 835171 | 8500 |
| 6-2024 | Pro. & Fixing Paving Block of Kapil Nagar Secondary School at Kapil Nagar | 804239 | 8500 |

**NOTE** - **1)** Cost of Blank Tender form Rs. 590/- **2)** Tender sale & submission start date : 27/12/2024. **3)** Tender submission end date/sales end date 09/01/2025 up to 5.00 pm. **4)** Date of opening of Tender (if possible) 10/01/2025 up to 5.00 pm. **5)** Eligibility criteria and mode of Submission shall be as stated in uploaded tender document. **6)** Time Limit & Class Of Contractor Stated in tender document

Advt No. 813 PR Date 26.12.2024

Executive Engineer, (SLUM)
NMC, Nagpur.

P/N/24/813



**कार्यालय नगर परिषद वाडी**
ता.व जि. नागपुर
Email: comcwadi@gmail.com

जा.क्र. नपवा/स्ववपापुवि/निविदा/१६१२/२०२४ दि.:२६/१२/२०२४

**ई-निविदा सुचना (पहीली वेळ)**

वाडी नगर परिषद आरोग्य विभागाकडुन ऑनलाईन पध्दतीने वैशिष्ट्यपुर्ण कामासाठी विशेष अनुदान या योजने अंतर्गत व्यायामशाळा साहित्य बसविणे, (ग्रिन जिम साहीत्य) पुरवठा करुन वसविणे. (पार्ट १ व पार्ट २) या कामाची ई-निविदा दिनांक २६/१२/२०२४ रोजी महाराष्ट्र शासनाच्या http://mahatender.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली आहे. वरील कामाबाबत संपूर्ण माहीती व इतर माहीती महाराष्ट्र शासनाच्या http://mahatender.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुकांनी नोंद घ्यावी.

(संदिप बोरकर)
मुख्याधिकारी
नगर परिषद वाडी


RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३




# वर्षअखेर विशेष २०२४




**देशात स्वातंत्र्यानंतर कायद्यात सुधारणा करण्यात आल्या असल्या, तरी कायद्यात मूलतः बदल करण्यात आला नव्हता, तो बदल सरत्या वर्षात झाला. भारतीय न्यायिक संहिता, भारतीय नागरी संरक्षण संहिता आणि भारतीय पुरावा कायदा हे तीन नवे फौजदारी कायदे एक जुलैपासून लागू झाले. सर्वोच्च न्यायालयाचे हे अमृतमहोत्सवी वर्ष असून या वर्षात न्यायालयाने अनेक दूरगामी निवाडे जाहीर केले.**

## न्यायव्यवस्था झळाळली!

वर्षअखेर विशेष २०२४ कोर्ट कायदा

**महेश जोशी**

भारतीय न्यायिक संहिता, भारतीय नागरी संरक्षण संहिता आणि भारतीय पुरावा कायदा हे तीन नवे फौजदारी कायदे एक जुलैपासून लागू झाले आहेत. भारतीय न्यायिक संहिता कायद्याने आता आयपीसी ( ) ची जागा घेतली आहे. ही दोन्ही विधेयके संसदेच्या हिवाळी अधिवेशनात मंजूर करण्यात आली होती. नव्या कायद्यात कलम ३७५ आणि ३७६ च्या जागी बलात्कारासाठी कलम ६३ आले आहे. सामूहिक बलात्कारासाठी कलम ७०, हत्येसाठी कलम ३०२ ऐवजी १०१ कलम आहे. भारतीय न्यायिक संहितेत २१ नवे गुन्हे जोडले गेले आहेत. त्यात एक नवा गुन्हा म्हणजे, मॉब लिंचिंग. मॉब लिंचिंगवरही कायदा करण्यात आला आहे. ४१ गुन्ह्यांमध्ये शिक्षेत वाढ करण्यात आली आहे. याशिवाय ८२ गुन्ह्यांमध्ये दंड म्हणून ठोठावण्यात येणाऱ्या रकमेत वाढ करण्यात आली आहे. भारतीय न्यायिक संहितेने १८६० मध्ये केलेल्या 'आयपीसी'ची जागा घेतली आहे. भारतीय नागरी संरक्षण संहिता १८९८ मध्ये बनवलेल्या'सीआरपीसी' ची जागा घेतली आहे आणि १८७२ च्या 'इंडियन इविडन्स ॲक्ट' (भारतीय पुरावा कायदा)ची जागा भारतीय साक्ष्य अधिनियम घेतली आहे. हे तीन नवे कायदे लागू झाल्यानंतर अनेक नियम आणि कायदे बदलले आहेत. यामध्ये अनेक नव्या विभागांचा समावेश करण्यात आला आहे. काही विभाग बदलण्यात आले आहेत, तर काही काढून टाकण्यात आले आहेत. नवे कायदे लागू झाल्यानंतर सामान्य माणूस, पोलिस, वकील आणि न्यायालय यांच्या कार्यपद्धतीत खूप बदल अपेक्षित आहेत. 'सीआरपीसी' मध्ये एकूण ४८४ कलमे असताना, भारतीय नागरी सुरक्षा संहितेत (बीएनएसएस) ५३१ कलमे होती. यामध्ये ऑडिओ-व्हिडीओ म्हणजेच, इलेक्ट्रॉनिक माध्यमातून गोळा केलेल्या पुराव्यांना महत्त्व देण्यात आले आहे. त्याचबरोबर कोणत्याही गुन्ह्यात कारागृहात जास्तीत जास्त शिक्षा भोगलेल्या कैद्यांना खासगी जातमुचलक्यावर सोडण्याची तरतूद नव्या कायद्यात आहे. कोणताही नागरिक गुन्ह्याच्या संदर्भात कुठेही शून्य एफआयआर दाखल करू शकतो. एफआयआर दाखल केल्यापासून १५ दिवसांच्या आत, तो मूळ अधिकारक्षेत्राकडे म्हणजेच, केस असलेल्या ठिकाणी पाठवावा लागेल. पोलिस अधिकारी किंवा सरकारी अधिकाऱ्यावर खटला चालवण्यासाठी संबंधित प्राधिकरणाकडून १२० दिवसांच्या आत परवानगी घेतली जाईल. जर ठरलेल्या अवधीत मंजुरी मिळाली नाहीतर, ते मंजूर असल्याचे मानले जाईल. एफआयआर झाल्यानंतर ९० दिवसांच्या आत आरोपपत्र दाखल करावे लागणार आहे. अर्थात पूर्वीही हीच तरतूद होती. आरोपपत्र दाखल केल्यापासून ६० दिवसांच्या आत न्यायालयाला आरोप निश्चित करावे लागतील. यासोबतच खटल्याची सुनावणी पूर्ण झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत निकाल द्यावा लागणार आहे. निकाल दिल्यानंतर त्याची प्रत ७ दिवसांत द्यावी लागेल.

भारतीय नागरी संरक्षण संहितेच्या कलम ४१७ मध्ये असे नमूद केले आहे, की कोणत्या प्रकरणांमध्ये शिक्षेला उच्च न्यायालयात अपील करता येत नाही. जर एखाद्या दोषीला उच्च न्यायालयाने तीन महिने किंवा त्यापेक्षा कमी कारावास किंवा ३ हजार रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा ठोठावल्या असतील तर त्याला उच्च न्यायालयात आव्हान देता येत नाही. 'आयपीसी'मध्ये कलम ३७६ मध्ये सहा महिन्यांपेक्षा कमी शिक्षेला आव्हान देता येत नव्हते. म्हणजेच, नव्या कायद्यात काहीसा दिलासा देण्यात आला आहे. याशिवाय जर एखाद्या दोषीला सत्र न्यायालयाने तीन महिने किंवा त्यापेक्षा कमी कारावास किंवा २०० रुपयांचा दंड किंवा दोन्ही शिक्षा ठोठावल्या असतील, तर त्यालाही आव्हान देता येणार नाही. त्याचबरोबर कोणत्याही गुन्ह्यासाठी दंडाधिकारी न्यायालयाने १०० रुपये दंड ठोठावला असेल, तर त्याविरुद्ध अपील करता येणार नाही; मात्र तीच शिक्षा अन्य काही शिक्षेसोबत दिल्यास त्याला आव्हान दिले जाऊ शकते. स्वातंत्र्यानंतर स्वतंत्र भारताचे सर्वोच्च न्यायालय स्थापन झाले आणि २८ जानेवारी १९५० रोजी न्यायदान सुरू झाले. त्याचा अमृत महोत्सव पंतप्रधान नरेंद्र मोदी व तत्कालीन सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड यांच्या उपस्थितीत झाला. केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या इमारतीच्या विस्तारासाठी आठशे कोटी रुपये मंजूर केले आहेत. पारतंत्र्यात ब्रिटिश वसाहतवादी व्यवस्थेत 'फेडरल कोर्ट' हे सर्वोच्च न्यायालय म्हणून स्थापन झाले होते. संसद इमारतीत प्रिन्सच्या चेंबरमधील या कोर्टात सहा न्यायमूर्ती होते. २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना लागू झाल्यानंतर दोन दिवसांनी म्हणजे २८ जानेवारी रोजी प्रिन्स चेंबरच्याच ठिकाणी स्वतंत्र भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून ते सहा न्यायमूर्ती न्यायासनावर बसले आणि त्यांनी न्यायदान सुरू केले. म्हणून त्या दिवसाला महत्त्व आहे. स्वातंत्र्य, न्याय, समानता व बंधुत्व या नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण व जतन करणे, हा घटनेचा आत्मा आहे आणि त्या घटनेचा रक्षणकर्ता म्हणून सर्वोच्च न्यायालयाची स्थापना झाली. म्हणूनच जगातील सर्वांत मोठी लोकशाही असलेल्या भारतात सर्वोच्च न्यायालयाला घटनेने व्यापक व जवळपास अमर्याद अधिकार दिले आहेत. त्याचबरोबर न्यायव्यवस्था ही कायदेमंडळ व कार्यकारी मंडळापासून स्वतंत्र आहे. अशा स्वतंत्र अस्तित्वामुळेच वेगवेगळ्या व्यक्ती, गट, घटक, खासगी वा शासकीय व्यवस्था यांच्यातील वादांची सोडवणूक करून न्यायनिवाडा करण्याचा अधिकार न्यायालयांकडे आहे. कोणत्याही घटकाकडून आपल्या अधिकारांचा बेलगाम व मनमानी वापर झाला तर त्याला चाप लावण्याचे काम सर्वोच्च न्यायालय करते. म्हणून ते 'सर्वोच्च' आहे.

मागील काही वर्षांत सर्वोच्च न्यायालयाने आधुनिक तंत्रज्ञानातून बरीच प्रगती साधली आहे. यापूर्वीच्या सरन्यायाधीशांनी तंत्रज्ञानाची कास धरल्यानंतर चंद्रचूड यांनी त्याकामी प्रगतीचा मोठा पल्ला गाठला. म्हणूनच आज सुनावणीला उपस्थित राहण्यासाठी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगचा पर्याय, महत्त्वाच्या प्रकरणांची सुनावणी थेट पाहण्यासाठी युट्युबची लिंक, नवी प्रकरणे दाखल करताना प्रत्यक्ष न्यायालय इमारतीतील रजिस्ट्रीत वेळ घालवण्याऐवजी ई-फायलिंगची व्यवस्था, सुनावणीच्या तारखांबाबत ईमेल, एसएमएस अशा माध्यमांतून



आगाऊ सूचना मिळणे ही दृश्य प्रगती उल्लेखनीय आहे. १९८५मध्ये इंग्रजी, हिंदी व अन्य भाषांतील २४ हजार ७१६ याचिका पत्रांद्वारे सर्वोच्च न्यायालयात पोहोचल्या आणि २०२२मध्ये तोच आकडा तब्बल एक लाख १५ हजार १२०पर्यंत गेला, हे सर्वोच्च न्यायालयावरील वाढत्या विश्वासाचेच द्योतक म्हणावे लागेल. सर्वोच्च न्यायालयाने २०२४ मध्ये अनेक ऐतिहासिक निकाल दिले. सर्वोच्च न्यायालयाने अरविंद केजरीवाल यांना जामीन देण्याबाबत आणि उत्तर प्रदेशच्या योगी आदित्यनाथ सरकारच्या बहुचर्चित 'बुलडोझर न्याय'वरही निकाल दिला. 'सुप्रीम कोर्ट ऑब्झर्व्हर'च्या अहवालानुसार, या वर्षी कोर्टाने अनेक महत्त्वाचे निर्णय दिले, ज्यांचा राजकारण, समाज आणि अर्थव्यवस्थेवर खोलवर परिणाम झाला. बिल्किस याकूब रसूल विरुद्ध भारत सरकार प्रकरणात, सर्वोच्च न्यायालयाच्या दोन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने बिल्किस बानो प्रकरणातील ११ दोषींच्या सुटकेबाबत गुजरात सरकारने दिलेला निर्णय रद्द केला. या दोषींवर २००२ च्या गुजरात दंगलीदरम्यान बानोच्या कुटुंबावर सामूहिक बलात्कार आणि हत्या केल्याचा आरोप होता. प्रशासकीय अधिकार असूनही न्यायालयीन पुनरावलोकनाच्या योग्यतेचे न्यायालयाने मानले आणि गुजरात सरकारचे हे पाऊल गुन्हेगारांना मदत करणारे असल्याचे म्हटले. सर्वोच्च न्यायालयाने २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या आसपास २०१८ निवडणूक रोख्यांची योजना रद्द केली. या योजनेअंतर्गत कंपन्या, व्यक्ती आणि संस्था राजकीय पक्षांना बेनामी देणगी देऊ शकतात. न्यायालयाने ही योजना पारदर्शकतेच्या दृष्टिकोनातून अयशस्वी ठरवली आणि निवडणूक आयोग आणि स्टेट बँकेला डेटा सार्वजनिक करण्याचे आदेश दिले. दिल्ली दारू धोरण घोटाळ्यात अटक करण्यात आलेल्या अरविंद केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला. या निकालाने 'पीएमएलए'मधील कठोर जामीन नियमांचे स्पष्टीकरण सौम्य केले आणि राजकीय पक्षांच्या नेत्यांसाठी जामीन प्रकरणांमध्ये नवीन दृष्टिकोनाचा मार्ग खुला केला.

सर्वोच्च न्यायालयाने राखीव प्रवर्गांमध्ये (एससी/एसटी) उप-वर्गीकरणाचा अधिकार कायम ठेवला. हा निर्णय राज्यांना विशिष्ट वर्गांमध्ये उप-वर्गीकरण करण्याचा अधिकार देतो, ज्यामुळे समाजात समानता सुनिश्चित होते. खनिज क्षेत्र विकास प्राधिकरण विरुद्ध भारतीय स्टील प्राधिकरण; उत्तर प्रदेश सरकार विरुद्ध ललता प्रसाद वैश या खटल्यात, नऊ न्यायाधीशांच्या खंडपीठाने केंद्र आणि राज्यांमध्ये कायदा बनवण्याच्या अधिकारांचे विभाजन स्पष्ट केले. औद्योगिक क्षेत्राचे नियमन करण्याचा अधिकार राज्यांना आहे आणि केंद्राला याशिवाय कोणताही कायदा करण्याचा अधिकार नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. 'जस्ट राइट्स फॉर चिल्ड्रन अलायन्स' विरुद्ध एस हरीश प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले, की बाल लैंगिक शोषण आणि शोषण सामग्री बाळगणे आणि सामायिक करणे हा दंडनीय गुन्हा आहे. हा निर्णय 'सोशल मीडिया' कंपन्यांसाठी आव्हान बनला आहे. कारण आता त्यांना असा मजकूर त्वरित काढून टाकण्याचे आदेश देण्यात आले आहेत. नागरिकत्व कायदा (आसाम ॲकॉर्ड) च्या कलम ६अ ची वैधता या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने आसाम करारानुसार नागरिकत्व मिळविण्याच्या अटी कायम ठेवल्या आणि कलम ६अ संविधानाशी सुसंगत असल्याचे मानले. या निर्णयामुळे आसामच्या सांस्कृतिक अस्मितेचे रक्षण करताना अनेक निर्वासितांना नागरिकत्व मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. खासगी मालमत्तेला सामुदायिक संसाधन मानले जाते, की नाही हा प्रश्न निकाली काढला. न्यायालयाने निर्णय दिला, की खासगी मालमत्ता केवळ तेव्हाच सामुदायिक संसाधन मानली जाऊ शकते, जेव्हा ती विशिष्ट निकष पूर्ण करते, जसे की राष्ट्रीयीकरण आणि जप्ती. सर्वोच्च न्यायालयाने ५७ वर्षे जुनी प्रथा रद्दबातल ठरवून निर्णय दिला, की जर एखादी संस्था अल्पसंख्याक समुदायाने स्थापन केली असेल, तर ती कायद्याने स्थापन केली असली, तरीही तिला अल्पसंख्याक दर्जा मिळू शकतो. अलिगड मुस्लिम विद्यापीठाच्या बाबतीतला हा निर्णय आहे. न्यायमूर्ती संजीव खन्ना यांची २४ ऑक्टोबरला देशाचे नवे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. ते देशाचे ५१ वे सरन्यायाधीश आहेत. एकीकडे चांगल्या निर्णयाची चर्चा होत असताना न्या. चंद्रचूड यांची काही भाष्ये वाद निर्माण करणारी ठरली. महाराष्ट्रातील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील विभाजनानंतर दाखल करण्यात आलेल्या याचिकांवर अखेरपर्यंत निकाल न दिल्याने ते टीकेचे लक्ष्य ठरले.

✦✦✦

## अर्थजगतात सातत्याने चढ-उतार

**भारतीय अर्थव्यवस्थेचा वेग गेल्या २३ महिन्यांमधील नीचांकी पातळीवर आला असला, तरी नव्या वर्षात पुन्हा पूर्वपदावर येण्याची शक्यता आहे. एकीकडे रुपया आणि शेअर बाजार गटांगळ्या घेत असताना दुसरीकडे भारत सरकारच्या तिजोरीची चिंता मिटली आहे. अर्थव्यवस्थेत अशा अनेक बाबी आहेत, ज्यामुळे चिंता वाटावी अशी परिस्थिती आहे, मात्र दुसरीकडे अनेक बाबींमुळे दिलासाही मिळतो आहे.**



वर्षअखेर विशेष २०२४ अर्थकारण

**नंदकुमार काळे**

गेल्या काही महिन्यांपासून भारतीय अर्थव्यवस्थेवर निराशेचे ढग दाटून आले आहेत. 'अमेरिकन फेडरल रिझर्व्ह'ने तिथल्या व्याजदरात ०.२५ टक्क्याने वाढ केली आहे. त्याचा परिणाम भारतीय शेअर बाजार कोसळण्यात झाला आहे. गेल्या काही महिन्यांपासून परकीय वित्तीय संस्थांही गुंतणुकीबाबत धरसोडीचे धोरण घेत आहेत. त्याच वेळी पाच-सहा महिने महागाईचा भस्मासूर रिझर्व्ह बँकेला आणि केंद्र सरकारला जुमानत नव्हता. त्यातल्या त्यात चांगली बाब म्हणजे पावसाने चांगली साथ दिली. त्यामुळे गहू, लसूण वगळता उर्वरीत बहुतांश शेतीमालाचे भाव घटले आहेत. कांदा, बटाटा आणि टोमॅटोने पाच-सहा महिने चांगलेच रडवले. आता बटाट्याच्या उत्पादनात वाढ झाली आहे. कांद्याच्या भावात निम्म्याहून अधिक घसरण झाली आहे. कांद्याच्या लागवडीखालील क्षेत्र १३५ टक्क्यांनी वाढले आहे. त्यामुळे भाव आटोक्यात आल्याने रिझर्व्ह बँकेला आता कर्जावरच्या व्याजदरात कपात करण्याची संधी येत असताना दुसरीकडे रुपयाच्या घसरणीने चिंता वाढली आहे. आयातीवरचा खर्च वाढला आहे. सोने आणि कच्च्या तेलाच्या आयातीवर करावा लागत असलेला मोठा खर्च हा आपल्या परकीय साठ्यावर ताण वाढवतो आहे. त्यातच कच्च्या तेलाचे आणि खाद्यतेलाच्या भावातील वाढ चिंता वाढवणारी आहे. दोन्हींच्या बाबतीत आपल्याला आयातीवरच अवलंबून राहावे लागत आहे. अशी स्थिती असताना पतमापन संस्थांच्या अंदाजात भारतीय अहवालात आशेचा किरण किरण दाखवला आहे. रेटिंग एजन्सी 'एस अँड पी'ने २०२५ चा भारताचा अंदाज चालू आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी ६.८ टक्के आणि २०२५-२६ साठी ६.९ टक्के वर्तवला आहे. मजबूत शहरी उपभोग, सेवा क्षेत्रातील स्थिर वाढ आणि पायाभूत सुविधांमध्ये सतत गुंतवणुकीमुळे भारताचा विकास दर जगात सर्वाधिक राहील. रिझर्व्ह बँकेने चलनवाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी रेपा दर ६.५ टक्के ठेवला आहे. रोख राखीव प्रमाण (सीआरआर) ०.५० टक्क्यांनी तरलता वाढवण्यासाठी कमी केले. भारताचे खासगी क्षेत्र मजबूत स्थितीत आहे. 'फ्लॅश इंडिया कंपोझिट आउटपुट इंडेक्स' नोव्हेंबरमध्ये ५८.६ वरून डिसेंबरमध्ये ६०.७ वर वाढला आहे. देशाच्या खासगी क्षेत्राने उत्पादन आणि सेवा या दोन्ही क्षेत्रात लक्षणीय वाढ दर्शविली. नवीन व्यापार प्रवाह आणि लक्षणीय रोजगार निर्मितीमुळे डिसेंबरचा डेटा भारताची आर्थिक लवचिकता आणि स्थिर पुनर्प्राप्ती दर्शवतो. 'पीएमआय' नोव्हेंबरमध्ये ५६.५ वरून डिसेंबरमध्ये ५७.४ वर पोहोचला. ते चांगल्या व्यवसायाची स्थिती दर्शवते. आउटपुटमधील वाढ, नवीन ऑर्डर आणि रोजगार, मजबूत देशांतर्गत मागणीमुळे ही वाढ झाली आहे. उत्पादकांनी इनपुट खरेदी वाढवली आणि वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी 'प्री-प्रॉडक्शन इन्व्हेंटरीज'चा विस्तार केला आहे. सेवा क्षेत्र हे वाढीचे प्रमुख चालक राहिले.

सेवा प्रदात्यांना देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मजबूत मागणीचा फायदा झाला. त्यामुळे क्षेत्राची लवचिकता अधोरेखित झाली. त्याचवेळी इनपुट खर्चाचा दबाव कायम राहिला. त्यामुळे उत्पादकांना विक्रीच्या किमती वाढवण्यास प्रवृत्त केले. भाव हळूहळू वाढले उत्पादन किंमत निर्देशांक फेब्रुवारी २०१३ पासून सर्वोच्च पातळीवर पोहोचला. अन्न, मालवाहतूक आणि श्रम यांच्यावरील खर्चाचा दबाव हे एक आव्हान राहिले. गेल्या सहा महिन्यांपासून भारतीय शेअर बाजार सारखा अस्थिर राहिला. कधी मोठी उसळी तर कधी अचानक गटांगळी अशी स्थिती राहिली. मध्य पूर्वेतील युद्ध, रशिया-युक्रेन युद्ध, अमेरिकेतील सत्तांतर, जर्मनीसह युरोपीय देशांत अस्थिर सरकारे आणि मंदीचे सावट याचा परिणाम शेअर बाजारावर होत आहे. सोन्याच्या वाढत्या आयातीचा फटका बाजाराला बसला. परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारही कधी चीनला तर कधी भारतात सोईनुसार गुंतवणूक करीत असल्याने बाजार अस्थिर आहे. बाजारावरचा एकूणच विश्वास डळमळीत झाल्याचा परिणाम दिसतो आहे. २०२४ मध्ये भारतीय रिअल इस्टेटमध्ये खासगी इक्विटी (पीई) गुंतवणूक ४.१५ अब्ज डॉलर आहे. ती मात्र ३२ टक्क्यांनी वाढली आहे. 'हाऊसिंग सेगमेंट'मध्ये जास्त ओघ आल्याने ही गुंतवणूक वाढली आहे. भारतीय रिअल इस्टेटमधील खासगी इक्विटी गुंतवणूक कॅलेंडर २०२४ मध्ये ४१५३ दशलक्ष डॉलरवर पोहोचली आहे. वेअरहाऊस मालमत्तेला १८७७ दशलक्ष डॉलरची गुंतवणूक मिळाली, तर कार्यालयीन मालमत्तांना १०९८ दशलक्ष डॉलर मिळाले. गेल्या दशकात, आर्थिक स्थिरता आणि सातत्यपूर्ण वाढीमुळे मुंबई हे गुंतवणूकदारांच्या सर्वाधिक पसंतीचे स्थान आहे. डॉलरच्या तुलनेत रुपयाने नीचांकी पातळी गाठली आहे. १९ डिसेंबर रोजी आंतर-बँक परकीय चलन बाजारात रुपया प्रथमच ८५ वर उघडला. ही ऐतिहासिक घसरण रुपयाच्या मजबूतीबाबत चिंता वाढवत आहे. 'फेडरल रिझर्व्ह'चे डिसेंबरचे चलनविषयक धोरण हे या घसरणीचे प्रमुख कारण मानले जाते. अमेरिकी मध्यवर्ती बँक 'फेडरल रिझर्व्ह'ने १८ डिसेंबर रोजी आपले चलनविषयक धोरण जाहीर केले. त्यात व्याजदरात २५ आधार अंकांची कपात करण्यात आली. ही हालचाल आधीच अपेक्षित होती; परंतु २०२५ संबंधी फेडच्या संकेतांनी बाजाराची निराशा केली. आता २०२५ मध्ये फक्त दोनदा व्याजदर कपात होण्याची शक्यता आहे, तर आधी चार वेळा कपात करणे अपेक्षित होते. त्याचा परिणाम जागतिक बाजारावर स्पष्टपणे दिसून आला.

एकीकडे विलफॉल डिफॉल्टरची संख्या वाढत आहे. देशात मोठ्या थकबाकीदारांचे १६ लाख कोटी रुपयांचे कर्ज राईट ऑफ करण्यात आले. त्याच वेळी बँकांनी आगाऊ करभरणा केल्यामुळे बँकांकडे कर्ज द्यायला पैसे नाहीत, अशी स्थिती आहे. लोक कमी व्याजाच्या अपेक्षेने सरकारी बँकातून कर्ज घेतात आणि जादा व्याजदराच्या अपेक्षेने भांडवली बाजार आणि एसआयपीमध्ये पैसे गुंतवतात. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा 'एनपीए' एका दशकातील नीचांकी पातळीवर आला. विक्रीचा कल असाच राहिला, तर डॉलरची मागणी वाढेल आणि रुपया आणखी कमजोर होऊ शकतो. रुपयाच्या घसरणीमुळे आयातदार, परदेशी शिक्षणासाठी जाणारे विद्यार्थी आणि कंपन्यांचे नुकसान होईल. आयातदारांना अधिक पैसे द्यावे लागतील, विद्यार्थ्यांचा खर्च वाढेल आणि कंपन्यांसाठी विदेशी कर्ज घेणे महाग होईल. तथापि, निर्यातदार आणि भारतीय आयटी कंपन्यांना याचा फायदा होईल. त्यामुळे त्यांचे शेअर्स वाढू शकतात. देशाच्या अर्थव्यवस्थेबाबत हे चित्र असताना निवडणूक आयोग, रिझर्व्ह बँक आणि केंद्रीय अर्थमंत्रालयाने सांगूनही आणि वारंवार इशारे देऊनही राजकीय पक्ष निवडणूक जिंकण्यासाठी 'रेवडी संस्कृती'चाच आधार घेत असल्याने राज्यांच्या अर्थव्यवस्था अडचणीत आहेत. रिझर्व्ह बँकेच्या ताज्या अहवलात राज्यांना पुन्हा एकदा इशारा दिला आहे. शेतकरी कर्जमाफी, मोफत वीज आणि वाहतूक यांसारख्या शिथिलता दिल्यास सामाजिक आणि आर्थिक पायाभूत सुविधांसाठी त्यांचे महत्त्वपूर्ण स्त्रोत संपुष्टात येऊ शकतात. चालू आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात अनेक राज्यांनी कृषी कर्जमाफी, शेती आणि घरांना मोफत वीज, मोफत वाहतूक, बेरोजगार तरुणांना भत्ते आणि महिलांना रोख मदत जाहीर केली आहे. अशा खर्चामुळे त्यांची उपलब्ध संसाधने कमी होऊ शकतात आणि गंभीर सामाजिक आणि आर्थिक पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या त्यांच्या क्षमतेला बाधा येऊ शकते.रिझर्व्ह बँकेच्या अहवालानुसार, अनुदानावरील खर्चात मोठी वाढ झाल्यामुळे आर्थिक ताण निर्माण झाला आहे. शेतकरी कर्जमाफी, मोफत/अनुदानित सेवा (जसे की शेती आणि घरांना वीज, वाहतूक, गॅस सिलिंडर) आणि रोख रकमेच्या तरतुदीमध्ये परावर्तित होत आहे. शेतकरी, तरुण आणि महिलांना हस्तांतरित करणे ही एक भेट आहे. अहवालानुसार, राज्यांनी त्यांच्या अनुदानावरील खर्चावर नियंत्रण आणून तो तर्कसंगत करणे आवश्यक आहे. त्यातल्या त्यात समाधानाची बाब म्हणजे केंद्र सरकारला जीएसटी तसेच अप्रत्यक्ष कर संकलनातून मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ झाली आहे.

✦✦✦

# पुल खचल्यावर सरकारला जाग



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

नागपूर-चंद्रपूर-वर्धा मार्गाला जोडणाऱ्या हैदराबादकडे जाणाऱ्या बुटीबोरी येथील राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाणपूल केवळी तीन वर्षात खचल्याची बाब गंभीर आहे. याबाबत केंद्रीय नितीन गडकरी यांच्याशी चर्चा करणार असून शहरातील सर्व उड्डाण पुलाचे सुरक्षा ऑडीट केले जाईल, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

अतिशय वर्दळीच्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरील बुटीबोरी उड्डाण पुलाला तडे गेले आहेत. या घटनेनंतर हा पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. यामुळे या मार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. वाहनांच्या लांब रांगा दिसून येते आहे. याबाबत गडकरी यांच्याशी चर्चा करणार आहे. तसेच शहरातील सर्व उड्डाण पुलाचे सुरक्षा अंकेक्षण केले जाईल, असे फडणवीस यांनी सांगितले.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी, तज्ज्ञ, व्हीएनआयटीचे प्राध्यापक आणि उड्डाणपुलाचे डिझाइनर यांनी या उड्डाणपुलाची पाहणी केली. तज्ज्ञांनी पुलाला ज्याठिकाणी तडे गेले आहेत, त्याठिकाणचे सॅम्पल घेतले आहेत. त्याची तपासणी करून तडे जाण्याचे नेमके कारण शोधण्यात येणार आहे. राष्ट्रीय प्राधिकरणाच्यावतीने बुटीबोरी मार्गावर १.६९ किलोमीटर लांबीचा उड्डाणपूल जून २०२१ मध्ये उभारण्यात आला.

तब्बल ७० कोटी खर्चून या पुलाची उभारणी करण्यात आली आहे. बुटीबोरी मार्गावर होणारी वाहतूक कोंडी रोखण्यासाठी या पुलाची उभारणी करण्यात आली होती. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी, तज्ज्ञ तसेच व्हीएनआयटीच्या प्राध्यापकांच्या चमूने या पुलाची पाहणी केली. पुलावरील वाहतूक खालील मार्गावरून वळती करण्यात आल्याने वाहतुकीची कोंडी होत आहे.

पूल सुरू होण्यापूर्वी व्हीएनआयटीचे प्राध्यापक आणि पुलाचे डिझाईन तयार करणाऱ्या तज्ज्ञांनी या उड्डाणपुलाची चाचपणी आयआयटी मुंबईच्या माध्यमातून केली होती. त्यामुळे त्यांना चौकशीसाठी बोलावण्यात आले आहे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार देखभाल-दुरुस्तीचे काम सुरू होते. त्यावेळी एक जडवाहन पुलाच्या काठावरून गेला. त्यामुळे पुलाचा काही भाग खचला. सुरक्षिततेचा उपाय म्हणून पुलावरून वाहतूक बंद करण्यात आली आहे. पुलाखालील वाहतूक सुरू आहे. पुलाची संपूर्ण तपासणी केल्यानंतर पुलावरून वाहतूक सुरू केली जाईल.

## कायदा सुव्यवस्थेचे महाराष्ट्रात तीन-तेरा

वडेट्टीवार यांचा सरकारवर हल्लाबोल



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

कल्याणमधील एका अल्पवयीन मुलीवरील अत्याचार व हत्येच्या प्रकरणावरून काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर टीकेची झोड उठवली आहे.

सद्यस्थितीत राज्यात कायदा सुव्यवस्थेचे तीन-तेरा वाजलेत. जाग येण्यासाठी हे सरकार आणखी किती वाट पाहणार? असा संतप्त सवाल यांनी या प्रकरणी सरकारला केला आहे.

कल्याण येथे एका अल्पवयीन मुलीच्या बलात्कारानंतर हत्या करण्यात आली आहे. त्यातच पुण्यातील राजगुरूनगर येथेही दोन अल्पवयीन सख्ख्या बहिणींची निर्घृण हत्या करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. बदलापूर येथील लैंगिक अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर या दोन्ही घटना घडल्यामुळे विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील कायदा सुव्यवस्थेवरून सरकारवर निशाणा साधला आहे.

वडेट्टीवार म्हणाले, बदलापूर... आता कल्याण, पुणे ! जाग येण्यासाठी महायुती सरकार आणखी किती घटनांची वाट बघणार? कल्याण येथे एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली. आरोपी विशाल गवळी याच्यावर यापूर्वीही अशा गंभीर गुन्ह्यांची नोंद असताना तो जामिनावर सुटला आणि पुन्हा एका बालिकेवर अत्याचार करून तिचा जीव घेतला. हे अत्यंत संतापजनक आहे. यामुळे राज्यातील पोलिस आणि कायदा यांचा गुन्हेगारांवर धाक उरला नसल्याचे स्पष्ट होते.

बदलापूर असो किंवा कल्याण, महिला सुरक्षेच्या मुद्द्यावर महायुती सरकार किती गंभीर आहे, हे या घटनांमधून स्पष्ट होत आहे. राजगुरुनगर, पुणे येथे दोन निष्पाप बहिणींची हत्या हा देखील संतापजनक प्रकार आहे. खेळता - खेळता हरवलेल्या या मुलींच्या निर्घृण हत्येमुळे राज्यातील कायदा सुव्यवस्थेचे तीन-तेरा वाजल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. गुन्हेगार निर्भयपणे वावरत आहेत, हे या सरकारच्या अपयशाचे लक्षण आहे.

राज्यात महिला आणि लेकी निर्भयपणे फिरू शकत नाही इथे गुंड, बलात्कारी निर्धास्तपणे फिरत आहे. राज्यात महिला आणि मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर आहे. दोन्ही घटनांतील गुन्हेगारांना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, यासाठी पोलिस आणि न्यायव्यवस्थेने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे.

## नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्यांची विद्यार्थिनींकडे शरीरसुखाची मागणी

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. २६ :

परीक्षेत गुण वाढवून देण्यासाठी एका प्राचार्याने विद्यार्थिनींकडे चक्क शरीरसुखाची मागणी केल्याचा धक्कादायक उघडकीस आला आहे.

विद्यार्थिनींनी आक्रमक भूमिका घेत पालक, सामाजिक कार्यकर्ते आणि प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींना विद्यालयात बोलावून घेतले आणि सर्वांसमक्ष प्राचार्याने केलेल्या गैरकृत्याचा भंडाफोड केला. त्यानंतर पालक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी प्राचार्याला चोपले. पोलिसांनी प्राचार्यांना ताब्यात घेतले.

जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या अधिनस्त शासकीय परिचर्या प्रशिक्षण विद्यालयात एएनएम आणि जीएनएमच्या २०० विद्यार्थिनी प्रशिक्षण घेत आहेत. या विद्यालयाचे प्राचार्य किरण एस. मुरकुट हे वर्षभरापूर्वी विद्यालयात रुजू झाले. एएनएमच्या प्रथम वर्षात शिकणाऱ्या पाच विद्यार्थिनी मागील वर्षी परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यामुळे त्यांना पुन्हा परीक्षा द्यावी लागली. या विद्यार्थिनींची ५ व ६ नोव्हेंबर २०२४ रोजी परीक्षा घेण्यात आली. ८ नोव्हेंबर रोजी प्राचार्य मुरकुट यांनी रात्री दोन विद्यार्थिनींना व्हॉट्सॲपवर पेपर कसे गेले? याबाबत विचारणा केली. त्यावर विद्यार्थिनींनी निकालाची भीती वाटत असल्याच सांगितले. त्यावर तुम्ही माझी मर्जी राखणार असाल तर मी तुम्हाला पास होण्यासाठी मदत करु शकतो, असे प्राचार्याने सांगितले आणि लगेच मॅसेज डिलिट केले. विद्यार्थिनींनी या मॅसेजेसचे स्क्रिनशॉट काढून पालकांना माहिती दिली.

पालक व कार्यकर्त्यांकडून प्राचार्याला चोप



२६ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता दरम्यान पीडित विद्यार्थिनी, संतप्त पालक, सामाजिक कार्यकर्ते प्राचार्याच्या कक्षात धडकून विचारणा केली असता प्राचार्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे संतप्त पालक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी प्राचार्याला बेदम चोप दिला. यावेळी विद्यार्थिनींनी सांगितले की, प्राचार्याकडून त्यांना वारंवार अशाप्रकारे लज्जास्पद वागणूक दिली जात होती. विद्यार्थिनींचे संपर्क क्रमांक मागायचे, मात्र आम्ही त्यांना कधीही इतर मुलींचे संपर्क क्रमांक दिले नाही.

या विद्यार्थिनींना त्यांच्याच सोबत शिकणाऱ्या एका विद्यार्थिनीने प्राचार्य सांगतात त्या प्रमाणे वागले तर आपल्याला काहीही होणार नाही, असे बोलून धमकावत असल्याचेही यावेळी सांगितले. विशेष म्हणजे, काही महिन्यांपूर्वी या विद्यालयातील विद्यार्थिनींना विषबाधा झाल्याचा धक्कादायक प्रकार घडला होता . परंतु, काही कारणातून हा प्रकार दडपण्यात आला होता.

## या आमदाराने दिला राजीनाम्याचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २६ :

मतदार संघातील पाण्याच्या मुद्द्यावर एका नवनिर्वाचित आमदाराने पक्षश्रेष्ठींना थेट राजीनाम्याचा इशारा दिला आहे. मतदारसंघातील शेतकरी पाण्यासाठी त्रस्त आहेत. आदिवासींना शेतीसाठी अनेक वर्ष पाण्यापासून वंचित ठेवण्यात आले आहे, असा संताप इगतपुरीचे आमदार हिरामण खोसकर यांनी व्यक्त केला आहे. इगतपुरी तालुक्यातील धरणांचे पाणी शहापूरला दिल्यास प्रसंगी आमदारकीचा राजीनामाच देऊ, असा थेट इशाराच त्यांनी दिला आहे.

भावली धरणाचे पाणी अन्य जिल्ह्यांना देण्यावर आमदार खोसकर यांनी तीव्र विरोध केला होता. याबाबत त्यांनी जलसंपदा विभागासह संबंधित मंत्र्यांशी पत्रव्यवहार केला आहे. आपल्या त्या मागणीसाठी आपण ठाम असून राज्य शासनाने भावली धरणाचे पाणी अन्य जिल्ह्यांना दिल्यास आपण राजीनामा देऊ यावर ठाम आहोत, असा दावा त्यांनी केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार हिरामण खोसकर मतदारसंघातील मतदारांच्या अडचणींसाठी आक्रमक झाले आहेत. मतदारसंघातील धरणांचे पाणी अन्य जिल्ह्यांना दिले जाते. मात्र आदिवासी आणि शेतकरी शासनाच्या उदासीनतेमुळे उपेक्षित राहतात, अशी नाराजी खोसकर यांनी व्यक्त केली आहे.

## फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई करणार

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांची घोषणा



■ वृत्तसंस्था
नाशिक, दि. २६ :

शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांवर कारवाई करणार असल्याची घोषणा राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केली आहे. तसेच नव्या कायद्यात शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर कारवाईची तरतूद करणार असल्याचे देखील यावेळी माणिकराव कोकाटे यांनी म्हंटले आहे. नाशिक येथे त्यांनी संवाद साधला त्यावेळी ही घोषणा केली आहे.

कोकाटे म्हणाले, आम्ही जोपर्यंत कायदा तयार करत नाही तोपर्यंत व्यापाऱ्यांच्या नावांची यादी करता येणार नाही. त्यामुळे जोपर्यंत कायदा होत नाही तोपर्यंत कोणत्या शेतकऱ्यांनी कोणत्या व्यापाऱ्यांना शेत माल विक्री करावा याबाबतची यादी करता येत नाही. तसेच शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी पोलिसांनी कारवाई कशी करावी याबाबतचा निर्णय पोळी दलातील अधिकाऱ्यांनी घ्यावा, अशा सूचना देखील माणिकराव कोकाटे यांनी दिल्या आहेत.

कृषी खाते संवेदनशील असून मी त्याच्या दुप्पट संवेदनशील आहे. शेतकऱ्यांचे फोन उचलले जातील, कारवाई केले जातील, न्याय दिला जाईल. तसेच वेळ पडल्यास गृहमंत्री, मुख्यमंत्र्यांशी बोलणार आहे. याशिवाय दोन्ही उपमुख्यमंत्र्यांशी बोलणार आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी कठोर कायदा केला जाईल, असे कोकाटे यांनी स्पष्ट केले.

## भाजप आमदाराच्या मामांच्या हत्येचे रहस्य उलगडले
# सुपारी देवून पत्नीने करवली हत्या



■ वृत्तसंस्था
पुणे, दि. २६ :

येथील भाजपचे विधान परिषदेचे आमदार योगेश टिळेकर यांचे मामा सतीश वाघ यांच्या हत्या प्रकरणी मोठा उलगडा झाला आहे. पोलिसांनी केलेल्या तपासात सतीश वाघ यांची हत्या शेजारी राहणाऱ्या व्यक्तीने केली असल्याची चर्चा होती.

मात्र, आता पोलिसांच्या तपासात नवा खुलासा झाला असून सतीश वाघ यांच्या पत्नीनेच त्यांच्या हत्येची सुपारी दिल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. प्रेम प्रकरणातून हा सगळा प्रकार घडला असल्याचे समजत आहे. सतीश वाघ यांच्या पत्नीला पोलिसांच्या गुन्हे शाखेने अटक केली आहे.

शेजाऱ्यासोबत असलेल्या प्रेम संबंधात अडसर ठरत असलेल्या सतीश वाघ यांची 5 लाखांची सुपारी देऊन पत्नीनेच काटा काढला असल्याने एकच खळबळ उडाली आहे. सतीश वाघ हे उद्योजक होते. ९ डिसेंबरला पहाटे मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडले होते. या दरम्यान ब्ल्यू बेरी हॉटेल बाहेर चारचाकी वाहनातून आलेल्या चौघांनी त्यांना जबरदस्ती गाडीत बसवत त्यांचे अपहरण केले होते.

ही अपहरणाची घटना सीसीटीव्हीत कैद झाली होती. या प्रकरणी हडपसर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांकडून या प्रकरणी शोध सुरु होता. या दरम्यान त्याच दिवशी रात्री एका ठिकाणी घाटात सतीश वाघ यांचा मृतदेह सापडला होता. सतीश वाघ यांची अपहरणानंतर लगेच त्याच गाडीत चाकूने भोसकून, ७२ वेळा वार करुन हत्या केल्याची माहिती समोर आली होती. यानंतर पोलिसांनी युद्ध पातळीवर या घटनेचा तपास सुरू केला.

यात पोलिसांनी चार आरोपींना अटक केली होती. यासाठी पुणे ते सोलापूर महामार्गावरील शेकडो सीसीटीव्ही फुटेज त्यांनी तपासले होते. या सगळ्या तपसानंतर त्यांच्या भाडेकरुने त्यांच्या हत्येची सुपारी घेतल्याचे समजले व ही सुपारी सतीश वाघ यांच्याच पत्नीने दिल्याचे यात निष्पन्न झाले आहे.

सतीश वाघ यांच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी आत्तापर्यंत अटक केलेल्या आरोपींमध्ये मोहिनी वाघ, पवनकुमार शर्मा, विकास शिंदे, आतिश जाधव, अक्षय जवळकर (सुपारी देण्यात आलेली व्यक्ती), असे अटक झालेल्यांची नावे आहेत.

## लोकरंजन




### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या उपस्थितीत संगीत मानापमानचा भव्य दिव्य ट्रेलर

नववर्ष मराठी चित्रपटसृष्टीसाठी खूप खास ठरणार आहे. कारण ज्या चित्रपटाची प्रेक्षक आतुरतेने वाट बघताय तो संगीतमय चित्रपट संगीत मानापमान नववर्षाच्या सुरवातीला प्रदर्शित होणार आहे. जिओ स्टुडिओ प्रस्तुत आणि सुबोध भावे दिग्दर्शित संगीत मानापमानचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीस आलाय. विशेष म्हणजे महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडणविस ह्यांच्या उपस्थितीत हा भव्य दिव्य सोहळा पार पडला.

शौर्याला, धैर्याला, पराक्रमाला आणि त्यागाला वंदन करून एका संगीतमय प्रेमकथेचा हा संपूर्ण प्रवास चित्रपटात आपण अनुभवायला मिळतो. शौर्याची, प्रेमाची, ईर्षेचं, मानापमानाची कथा त्यात दिग्गज कलाकारांची तगडी टीम असा अनोखा संगम अनुभवायाची उत्सुकता वाटते. खाडीलकरांच्या मूळ संगीत मानापमान कलाकृतीने प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले. त्यामुळे 'संगीत मानापमान' ट्रेलरला त्या चाहत्या वर्गाकडूनही लक्षवेधी प्रतिसाद मिळतोय.

विविधांगी विषयांचा सुंदर मिलाप आणि कलाकारांचा रंगतदार सोहळा यावेळी या चित्रपटाच्या निमित्ताने पडद्यावर पाहायला मिळणार आहे.

चित्रपटात सूबोध भावे, सुमित राघवन, वैदेही परशुरामी, उपेंद्र लिमये, नीना कुलकर्णी, निवेदिता सराफ, शैलेश दातार, अर्चना निपाणकर आदी कलाकार प्रमुख भूमिकेत आहेत. बुद्धिमत्ता, स्वाभिमान आणि मनमोहक सौंदर्य यांच्या अलौकिक संगमाने चमकणारा तेजस्वी तारा म्हणजेच भामिनी चं पात्र अभिनेत्री वैदेहीने चित्रपटात सुरेखपणे साकारलय, वैदेहीची एक नवीन झलक आपल्याला पहायला मिळते.

तसच कुटील, चाणाक्ष, धूर्त भावी सेनापती चंद्रविलास म्हणजेच सुमित राघवन ह्यांनी देखील आपली भूमिका चोख पार पाडली आहे. दिग्दर्शक आणि अभिनेते सुबोध भावे ह्यांचा ॲक्शन अवतार सगळ्यांनाच भावला आहे. इतकच नव्हे तर अभिनेत्री अमृता खानविलकर हिची देखील छोटीशी झलक एका गाण्यात पाहायला मिळते आणि इतर दिग्गज आणि नामवंत कलाकार एकाच सिनेमात असल्यामुळे प्रेक्षकांना जणू उत्सवाचं निमित्तच मिळतं. ■ ■

### मित्रांची धमाल घेऊन येतोय संगी




अर्मोक्स फिल्म्स आणि यंत्रणा फिल्म्स निर्मित, सुप्रीम मोशन पिक्चर्स आणि सत्यम ज्वेलर्स प्रस्तुत संगी हा हिंदी चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन सुमित कुलकर्णी यांनी केले असून लेखन थोपटे विजयसिंह सर्जेराव यांचे आहे. रोहन भोसले, अरुण प्रभुदेसाई, पिंटू सॉ, मोनिका प्रभुदेसाई, प्रतीक ठाकूर, सुमित कुलकर्णी हे 'संगी'चे निर्माते आहेत. तर लालासाहेब शिंदे, राजेंद्र शिंदे आणि राहुल किरणराज चोप्रा सहनिर्माते आहेत. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर झळकले असून यात शरीब हाश्मी, संजय बिष्णोई, श्यामराज पाटील, विद्या माळवदे आणि गौरव मोरे यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

संगी म्हणजेच मैत्री... त्यामुळे याचे कथानक मैत्रीभोवती फिरणारे आहे. मात्र पोस्टरमध्ये तीन मित्र दिसत असतानाच काही नोटाही दिसत आहेत. त्यामुळे आता पैसे आणि मैत्री यांचा एकमेकांशी काय संबंध असणार हे जाणून घेण्यासाठी १७ जानेवारीपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे. एकंदरच हलकीफुलकी, हास्य आणि मनोरंजनाने भरलेली कथा असलेला हा चित्रपट प्रेक्षकांना नक्कीच खिळवून ठेवणारा असेल, हे नक्की. ■

### लक्ष्मी निवास' आनंदयात्रा - स्वप्नांची सफर झी मराठीवर

झी मराठी प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यासाठी आणि वेगवेगळे प्रयोग करण्यासाठी नेहेमीच सज्ज असते. म्हणूनच 'लक्ष्मी निवास' या स्वप्नं आणि भावना यांनी भरलेल्या मालिकेच्या भव्य लाँचच्या निमित्ताने मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज उद्यान (शिवाजी पार्क) येथे एक भव्य, अप्रतिम आणि अनोखी स्कूटर रॅली आणि पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती.


'लक्ष्मी निवास' ही कथा आहे, स्वतःचं घर बांधण्याचं स्वप्न बघणा-या एका मध्यमवर्गीय जोडप्याची. लक्ष्मी एका श्रीमंत घरात वाढलेली मुलगी. श्रीनिवासवर असलेल्या अतोनात प्रेमामुळे तिनं त्याच्याशी पळून जाऊन लग्न केलं आणि माहेरशी असलेले सगळे संबंध तिला तोडावे लागले. श्रीनिवासकडे स्वतःच्या हक्काचं घर नाही यावरुन झालेला अपमान असह्य झाल्याने तिने स्वतःचं घर होईपर्यंत माहेरी पाऊल न ठेवण्याचा निर्णय घेतला. लक्ष्मी आणि श्रीनिवासचा संसार उत्तम फुलला. ३ मुलं, ३ मुली आणि श्रीनिवासची आई इतकं मोठं कुटुंब झालं. आता दोन मुलींची लग्न बाकी आहेत.

लक्ष्मी आणि श्रीनिवास समोर अनेक आव्हानं आहेत. कुटुंबासाठी झटताना स्वतःच्या इच्छा मागे सारत लक्ष्मी आणि श्रीनिवासला आपल्या स्वतःच्या घराचं स्वप्न साकारायचं आहे. या मालिकेचं लेखन करत आहे सायली केदार, तर मालिकेचे निमार्ते आहेत क्रिएटिव्ह माईंड सुनील भोसले. या मालिकेच्या निमित्ताने मराठी टेलिव्हिजनवर पहिल्यांदाच दररोज १ तासाचा भाग प्रक्षेपित होणार आहे. दररोज मालिकेचा १ तासाचा भाग प्रक्षेपित होण्याची ही पहिलीच वेळ आहे. 'लक्ष्मी निवास' २३ डिसेंबरपासून दररोज रात्री ८ वा. फक्त आपल्या झी मराठीवर. ■ ■




: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), अकोला व कृषि विभाग, महाराष्ट्र शासन
यांचे संयुक्त विद्यमाने आयोजीत



डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२६ व्या जयंती प्रित्यर्थ
राज्यस्तरीय कृषि प्रदर्शनी, कृषि महोत्सव व चर्चासत्र
ॲग्रोटेक २०२४
दि. २७ ते २९ डिसेंबर, २०२४
स्थळ : विद्यापीठ क्रिडांगण, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला
* कृषि विद्यापीठ व संलग्न कृषि संस्थानांची दालने * विद्यापीठ शास्त्रज्ञांसोबत विविध विषयांवर दररोज चर्चासत्र
* कृषि विभागाची दालने * कृषि औजारे व उत्पादनांची दालने * कृषि व कृषि संलग्नीत योजनांची माहिती
* पशूसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास विभागाची दालने * मत्स्यव्यवसाय विकास विभागाची दालने
* ग्रामीण व्यवसाय उत्पादने * कृषि व ग्रामीण उद्योग दालने * फळे व भाजीपाला प्रदर्शन * पशू प्रदर्शनी
* पुष्प प्रदर्शनी * बचत गटांचा सहभाग * विद्यापीठ प्रकाशने
आयोजक
विस्तार शिक्षण संचालनालय, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
कृषि विभाग, महाराष्ट्र शासन
कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापण यंत्रणा, अकोला

महासागर

नागपूर

वृत्तसागर

■ शुक्रवार, दि. २७, डिसेंबर २०२४ ■

## गुंतवणुकीच्या नावावर ३ लाखांचा गंडा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

गुंतवणुकीवर बक्कळ नफ्याचे आमिष दाखवून उत्तर प्रदेशातील एका तरुणाने ओळखीतील एका व्यक्तीला 3 लाखांचा गंडा घातला. ही घटना मानकापूर पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आली. पोलिसांनी मोहम्मद रियाज मोहम्मद अयाज (31) रा. शकील लेआऊट, गोधनीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. मोहम्मद मुजफ्फर मोहम्मद परवेज (28) रा. मुजफ्फरनगर, उत्तरप्रदेश असे आरोपीचे नाव आहे.

गतवर्षी एका नातेवाईकाच्या माध्यमातून रियाजची ओळख मुजफ्फर याच्यासोबत झाली होती. मुजफ्फरने तो दिल्लीच्या एमएमआर सिग्नल टच सिस्टम प्रा. लि. कंपनीसोबत एअर लाईन तिकीट विक्रीचे काम करीत असल्याची माहिती दिली होती. त्याने रियाज यांना कंपनीत एक लाख रुपये गुंतविल्यास दर महिन्याला 9,600 रुपये नफा मिळतो अशी बतावणी करीत गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले. रियाज यांना त्याचा प्रस्ताव आवडला. त्यांनी 50 रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर मुजफ्फरसोबत करारनामा केला. त्यानंतर रियाज यांनी मुजफ्फरच्या बँक खात्यात 3 लाख रुपये जमा केले. सुरूवातीचे 3 महिने मुजफ्फरने त्याला 28,800 रुपयांचा नफा ही दिला. त्यानंतर पैसे मिळणे बंद झाले. रियाजने त्याच्या नंबरवर कॉल केला असता फोन बंद होता. बऱ्याच प्रयत्नानंतरही रियाजला पैसे परत मिळाले नाही. शेवटी कंटाळून त्यांनी पोलिसात तक्रार केली.

# एमपीएससी परीक्षेत महाज्योतीची मैत्रेयी जमदाडे राज्यात मुलींमध्ये अव्वल



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

दर्जेदार प्रशिक्षण देण्याचे मोलाचे कार्य महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर करीत आहे. उत्तम प्रशिक्षणाच्या जोरावर महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) मार्फत 2022-23 वर्षात घेण्यात आलेल्या 'इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी' (राजपत्रित) पदाच्या अंतिम निकालात महाज्योती संस्थेची मैत्रेयी अविनाश जामदडे मुलींमध्ये राज्यात प्रथम स्थान आपल्या नावी केले.

राज्यातील इतर मागास वर्ग (ओबीसी), विमुक्त जाती-भटक्या जमाती (व्हीजेएनटी) व विशेष मागास (एसबीसी) प्रर्वगातील विद्यार्थ्यांना मिळालेल्या मूल्याधिष्ठित प्रशिक्षण तसेच विद्यावेतनातून त्यांना अर्थसहाय्याचे पाठबळाच्या जोरावर सावित्रीआई फुले

### इतर मागास बहुजन कल्याण राजपत्रित अधिकारी पदावर होणार रुजू

यांची लेक असलेल्या मैत्रेयी जामदडे ने आपल्या नावी कामगिरी केली आहे. मैत्रेयी जामदडे या मुलींने प्राप्त केलेल्या घवघवीत यशामुळे आज ती 'इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी' (राजपत्रित) पदावर रुजू होणार असल्याचा आनंद असल्याची महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक . राजेश खवले यांनी दिली.

पुण्यात राहणाऱ्या मैत्रेयी जामदडे हिने सांगितले की, महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या बहुजन कल्याण व स्त्रीशिक्षण या विचारांवर उभारण्यात आलेल्या महाज्योती संस्थेच्या योजनांचा लाभ घेण्याची मला सुवर्ण संधी मिळाली. विशेष म्हणजे, एमपीएससी मार्फत घेण्यात आलेल्या 'इतर मागास बहुजन कल्याण विभाग (राजपत्रित) अधिकारी पदाच्या परीक्षेत मी प्रथम स्थान मिळविल्याचा मला आनंद आहे. महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाईंच्या बहुजन हिताच्या ध्येयास पूरक सेवा करण्याची संधी मला अधिकारी म्हणून या विभागात मिळत असल्याचा मला अभिमान असल्याचेही मैत्रेयी जामदडे हिने सांगितले.

पुढे बोलतांना मैत्रेयी जामदडे ने सांगितले की, 'महाज्योती'या संस्थेमार्फत मला पुण्यातील नामांकित एच. व्ही. देसाई स्पर्धा प्रशिक्षण केंद्र येथे मोफत मार्गदर्शन मला मिळाले. तसेच 'महाज्योती' मार्फत विद्यावेतनातून अभ्यास करण्यास भरीव मदत मला मिळाली. यामुळे मला परीक्षेची तयारी करताना प्रत्येक टप्प्यावर योग्य दिशा मिळाली. एमपीएससी 'इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी' (राजपत्रित) पदाच्या अंतिम निकालात मला मुख्य परीक्षेत 119 गुण व मुलाखतीमध्ये 50 पैकी 35 गुण (सर्वाधिक) गुण मिळवता आले. महाज्योतीमार्फत ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी प्रवगार्तील एमपीएससी विद्यार्थ्यांना विद्यावेतनातून त्यांना अर्थसहाय्याचे पाठबळ देण्याचे मोलाचे कार्य करीत आहे. तसेच एच. व्ही. देसाई स्पर्धा प्रशिक्षण केंद्रातून मिळालेले वेळोवेळी मार्गदर्शन यामुळे मला राज्यात अव्वल स्थान गाठता आले. या सर्व शैक्षणिक सहकायार्बाबत महाज्योती व एच. व्ही. देसाई स्पर्धा प्रशिक्षण केंद्राचे मी मनपूर्वक आभार मानत असल्याचे मनोगतही मैत्रेयी जमदाडे ने हिने व्यक्त केले.

शिक्षणाचे महत्व अबाधित आहे. शिक्षणामुळेच आपले स्वप्नांची दारांची चावी मिळविता येते. यानंतरच भविष्यात यशस्वी करियर घडविण्याचा मार्ग मोकाळा होत असतो. यानंतर विद्यार्थ्यांना शासन सेवेत योग्य ती संधी उपलब्ध करून देण्याचे कार्य हे ह्यमहाज्योतीह्य करीत आहे. त्यामुळेच आज मैत्रेयी जमदाडे या प्रशिक्षणाथीर्नी 'इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी' (राजपत्रित) पदाच्याच्या परीक्षेत राज्यात मुलींमध्ये पहिला क्रमांक आपल्या नावी केले आहे.

# मोबाईल शॉपीमध्ये दोघांवर चाकुने वार

### मोबाईल खरेदीवरून वाद

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २६ :

नवीन मोबाईल खरेदीसाठी आलेल्या एका तरुणाने उधारीवर मोबाईल नेण्यावरून वाद घातला. मोबाईल विक्री करणाऱ्या दोन मुलांनी त्याला दुकानाबाहेर काढले. यामुळे संतापलेल्या या युवकाने दोघांवर चाकूने वार करून गंभीर जखमी केल्याची घटना आज ( ता.२६ ) सकाळी ११ वाजताच्या दरम्यान पंचवटी कॉम्प्लेक्स समोरील रोडवर घडली. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली असून तीन दिवसाचा पिसीआर मिळाला आहे. या घटनेमुळे हिंगणा शहरात खळबळ उडाली आहे.

आरोपी प्रणय मधुकर चतुर (३३) रा.धनगरपूरा, हिंगणा असून याला अटक करण्यात आली. जखमीमध्ये सतीश अरूण कांबळे (३४)रा.हिंगणा,सागर शांताराम फटींग (३०) रा.जुनेवानी यांचा समावेश आहे.

२६ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता प्रणय चतुर हा हिंगणा येथील सतीश मोबाईल शॉपी येथे नवीन मोबाईल खरेदीसाठी सकाळी ११वाजता गेला. विवो कंपनीचा २० हजार रुपयाचा मोबाईल त्याने पसंत केला. मोबाईल दुकानदाराने त्याला कॅश की फायनान्स करावयाचा आहे,असे विचारले. त्याने कॅश देत असल्याचे सांगितले. यामुळे दुकानदारांनी कॅशचे बिल बनविले. बिल देण्यापूर्वीच प्रणय मोबाईल आपल्या हातात घेतला. बिल जेव्हा मागितले तेव्हा पैसे नसल्याचे कारण सांगून नंतर दोन दिवसांनी पैसे देतो असे सांगितले. यामुळे दुकानदार व विक्री करणाऱ्या मुलाने सदर मोबाईल त्याला परत करण्यास सांगितले.

### आरोपीवर मानसिक रोग तज्ञाचे उपचार सुरू

हिंगणा धनगरपुरा निवासी प्रणय चतुर हा मानसिक रुग्ण असल्याचे त्याच्या वडिलांनी पोलिसांना सांगितले. मागील पाच ते सहा वषार्पासून त्याच्यावर मानसिक रोग तज्ञाकडून नियमित उपचार सुरू आहे. आज सकाळीही त्यांनी वडिलांसोबत भांडण केले. भांडण करून संतापलेल्या अवस्थेत तो घराबाहेर गेला. यानंतर हा प्रकार केल्याचे सांगितले. यामुळे आरोपी हा मनोरुग्ण आहे का? असा प्रश्न निर्माण झाला.

मात्र त्यांनी मोबाईल परत करण्यास नकार देताच दुकानातील मुलांनी सदर मोबाईल त्याच्याकडून हिसकावून घेतला व त्याला दुकानाबाहेर काढले. याच कारणावरून संतापलेल्या प्रणयने चाकूने मोबाईल दुकानातील सागरच्या पोटावर पहिले वार केला.यानंतर सतीश च्या छातीवरही वार केला. दोघेही गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती होताच हिंगणा पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. दोन्ही जखमींना तातडीने एम्स रुग्णालयात दाखल केले. सतीशवर रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली. दोघांचीही प्रकृती आता स्थिर असल्याचे समजते. या प्रकरणाची तक्रार मोबाईल शॉपी मालक आकाश मस्के यांनी पोलिसात दाखल केली.

यावरून पोलिसांनी आरोपी प्रणय चतुर याच्या विरोधात भांदवी ३०७ कलमान्वये गुन्हा दाखल करून अटक केली. पोलिसांनी त्याला न्यायालयात हजर केले, असता तीन दिवसाचा पीसीआर देण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास ठाणेदार जितेंद्र बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# नितीन गडकरी यांच्या नावाने १० सराफा व्यावसायिकांची फसवणूक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा मुख्य सुरक्षा अधिकारी असल्याची बतावणी करून एका युवकाने शहरातील जवळपास १० सराफा व्यावसायिकांची लाखोंनी फसवणूक केली. त्या ठगबाज युवकाविरुद्ध सीताबर्डी, अंबाझरी आणि बजाजनगर पोलीस ठाण्यात फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. रोकडे ज्वेलर्समध्ये गडकरी यांच्या नावाचा वापर करुन फसवणूक करण्याचा प्रयत्न करताना या युवकाचे बींग फुटले.

बुधवारी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास बजाजनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रोकडे ज्वेलर्समध्ये एक युवक दागिने खरेदी करण्यासाठी आला. त्यांनी स्वतःचे नाव राजवीर ऊर्फ पंकज चावला असे सांगितले. मी गडकरी साहेबांचा मुख्य सुरक्षा अधिकारी आहे. मला गडकरी साहेबांनी पाठवले आहे. गडकरी यांनी रोकडे ज्वेलर्समध्ये दागिने खरेदी करण्याचा सल्ला दिला, अशी बतावणी त्याने केली. व्यवस्थापकाने त्याची ओळख संचालक राजेश रोकडे यांच्याशी करुन दिली. त्यानंतर त्याला दागिने खरेदी करण्यासाठी दुकानात नेले. त्या युवकाने पाच लाखांचे दागिने खरेदी केले आणि दागिन्याचे बिल धनादेशाने देणार असल्याचे सांगितले. त्यामुळे राजेश रोकडे यांना संशय आला. त्यांनी गडकरी यांच्या कार्यालयात फोन करून राजवीर चावला या मुख्य सुरक्षा अधिकाऱ्याबाबत माहिती घेतली. राजवीर चावला नावाचा कोणताही सुरक्षा अधिकारी नसल्याचे कार्यालयातून कळविण्यात आले. यादरम्यान तो युवक पळून गेला. रोकडे यांनी लगेच सीसीटीव्ही फुटेजमधून त्या ठकबाज युवकाचा फोटो घेऊन बजाजनगर पोलीस स्टेशन गाठले. लेखी तक्रार दिली असून पोलिसांनी गुन्हा दाखल केला, अशी माहिती अंबाझरीचे ठाणेदार विनायक गोल्हे यांनी दिली.

राजेश रोकडे यांनी फसवणुकीचा प्रयत्न हाणून पाडल्यानंतर त्या तोतया सुरक्षा अधिकाऱ्याचे फोटो सराफा संघटनेच्या व्हॉट्सअॅप ग्रूपवर टाकले. त्यानंतर लगेच कोठारी ज्वेलर्स आणि बटुकभाई ज्वेलर्सच्या संचालकांनी राजवीर चावला ओळखले आणि फसवणूक झाल्याची कबुली दिली. त्यामुळे लगेच पोलीस ठाण्यात तक्रारी करण्यात आल्या.

सीताबर्डी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बटुकभाई ज्वेलर्समध्ये दोन दिवसांपूर्वीच हा राजवीर चावला गेला होता. त्याने भाजप नेते गडकरी यांचा मुख्य सुरक्षा अधिकारी असल्याचे सांगून तब्बल ५ लाख रुपये किंमतीचे दागिने खरेदी केले. त्यांना बनावट धनादेश देऊन बील दिले. त्यानंतर तो अंबाझरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोठारी ज्वेलर्समध्ये गेले. तेथेही त्याने गडकरी यांच्या नावाचा वापर करुन २.५७ लाख रुपये किंमतीचे दागिने विकत घेतले. दोन्ही सराफा व्यवसायिकांनी गडकरी यांचे नाव सांगितल्यामुळे विश्वास ठेवला. मात्र, त्या युवकाने त्यांची फसवणूक केली.

# अभय योजनेत जिल्ह्यातील ८,१८६ वीज ग्राहकांनी केला १३.८९ कोटींचा भरणा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

वीजबिल थकबाकीमुळे कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित असलेल्या ग्राहकांना केवळ मूळ थकबाकीच्या रकमेचा एकरकमी किंवा सहा हफ्त्यात भरणा करून थकबाकीमुक्ती व पुनर्वीज जोडणीची संधी महावितरण अभय योजनेतून उपलब्ध झाली आहे. या अभय योजनेमध्ये नागपूर जिल्ह्यात आतापर्यंत सहभागी 8 हजार 186 वीजग्राहकांनी तब्बल 13 कोटी 89 लाख रुपयांच्या मूळ थकबाकीचा भरणा करीत राज्यात आघाडी मिळविली आहे.

या योजनेत आतापर्यंत नागपूर प्रादेशिक विभागातील 26 हजार 768 लघु व उच्चदाब थकबाकीदार ग्राहकांनी 28 कोटी 47 लाख रुपयांच्या मूळ थकबाकीचा भरणा केला आहे. 31 मार्च 2024 पर्यंत थकीत बिलामुळे कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडित झालेल्या (पीडी) घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांसाठी ही योजना आहे. थकित बिलांच्या योजनेत कृषी ग्राहकांचा समावेश नाही. या योजनेत वीज ग्राहकांना दिलासा देण्यासाठी थकित बिलाच्या मूळ रकमेवरील व्याज आणि विलंब आकाराच्या स्वरुपातील दंड माफ करण्यात येत आहे. या योजनेत मूळ बिलाच्या 30 टक्के रक्कम भरून ऊर्वरित 70 टक्के रक्कम सहा हफ्त्यात भरायची सवलत ग्राहकांना मिळत असून एक रकमी थकित बिल भरणा-या लघुदाब ग्राहकांना 10 तर उच्चदाब ग्राहकांना 5 टक्के सवलत दिल्या जात आहे. या योजनेची अंतिम मुदत 31 डिसेंबर 2024 पर्यंत असल्याने थकबाकीपोटी कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित असलेल्या अधिकाधिक ग्राहकांनी त्यांच्याकडील थकीत वीज बिलाचा भरणा करुन या योजनेत सहभागी होण्याचे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

# लॉटरी दुकानावर पोलिसांची धाड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

अंबाझरी पोलिसांनी गोपनिय माहितीवरून गोकुळपेठ परिसरातील एका लॉटरीच्या दुकानात धाड टाकली. तेथे प्रतिबंधित लॉटरीवर खायवडी-लगवाडी करताना दोन आरोपींना रंगेहात अटक केली. पोलिसांनी त्यांच्याकडून 23 हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. फिरोज रहिम खान (47) रा. कोराडी रोड आणि अंकित गजभिये (25) रा. भांडेवाडी अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

गोकुळपेठच्या राजश्री लॉटरी येथे काही इसम शासनाने बंदी घातलेल्या लॉटरीवर जुगार खेळत असल्याची माहिती अंबाझरी पोलिसांच्या पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी पंचासह दुकानात धाड टाकली असता वरील आरोपी ग्राहकांकडून खायवाडी-लगवाडी करून जुगार खेळताना सापडले. पोलिसांनी ताब्यात घेत त्यांच्याकडून संगणक, मॉनिटर, कॅल्यूलेटर, प्रिंटर यासोबतच खेलो गेम नावाचे प्रिंटेड 16 वेगवेगळ्या खेळाचे चिठ्ठ्या, रोख 1200 रुपये असा एकूण 23 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

# स्व. प्रबोधनकार ठाकरे समाज प्रबोधन पुरस्कार-२०२४

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक चळवळीला उज्ज्वल इतिहास आहे. सांस्कृतिक व सामाजिक परिवर्तनासाठी अनेक मान्यवरांचा यात सहभाग आहे. या परंपरेत थोर समाजसुधारक व विचारवंत प्रबोधनकार ठाकरे यांचे नाव महत्त्वाचे आहे. त्यांच्या कार्याला मानाचा मुजरा करण्यासाठी मारवाडी फाऊंडेशनच्या वतीने समाज प्रबोधनाचे कार्य करणाऱ्या मान्यवर व्यक्तीचा दरवर्षी एक लक्ष रुपये रोख, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात येत असतो. २०२४ चा "स्व. प्रबोधनकार ठाकरे समाज प्रबोधन पुरस्कार"



उत्तम कथा-कादंबरीकार, सामाजिक प्रश्नांचे भान असलेले सजग कार्यकर्ते व समाजशास्त्राचे अभ्यासक मा.डॉ. मिलिंद बोकील यांना देण्यात येणार आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा शनिवार, दि.२८ डिसेंबर, २०२४ सायं. ५.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे संपन्न होईल, हा पुरस्कार सुप्रसिद्ध समीक्षक, लेखक, विचारवंत व ९० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. अक्षयकुमार काळे यांच्या शुभहस्ते व चिंतक व साधना साप्ताहिकाचे संपादक विनोद शिरसाठ यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात येईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दैनिक महासागरचे संपादक श्रीकृष्ण चांडक राहतील या पुरस्कार वितरण समारंभाप्रसंगी नागरिकांनी उपस्थित राहावे असे मारवाडी फाऊंडेशनच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

# अखिल भारतीय माहेश्वरी महिला संघटना क्षितिजाची राष्ट्रीय बैठक नागपुरात आयोजित

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

विदर्भ प्रादेशिक माहेश्वरी महिला संघटनेतर्फे नागपूर जिल्हा व नागपूर शहर माहेश्वरी महिला संघटनेच्या आदरातिथ्य अंतर्गत, अखिल भारतीय माहेश्वरी महिला संघटनेची दुसरी आणि सहावी कार्यकारिणी बैठक १० ते १२ जानेवारी २०२५ दरम्यान गोयंका फार्म, नागपूर येथे आयोजित करण्यात आली आहे. महिला सक्षमीकरणांतर्गत महिला गृहउद्योजक भगिनींसाठी 'उद्यम वाटिका' हा औद्योगिक मेळावा आयोजित करण्यात आला असून, त्याचे उद्घाटन १० जानेवारी रोजी सकाळी राष्ट्रीय अध्यक्ष श्रीमती मंजूजी बांगर यांच्या हस्ते होणार आहे. राष्ट्रीय सरचिटणीस ज्योतीजी राठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. यावेळी कार्यकारिणीची बैठक आयोजित केली जाईल.

दुपारी ४ वाजता क्षितीजा २०२५ चा उद्घाटन सोहळा होणार असून, सौ.कांचनताई नितीन गडकरी यांच्या हस्त उदघाटन होईल. प्रमुख पाहुणे सत्यनारायण नुवाल, पूनमचंद, पुरुषोत्तम श्रवण मालू, श्यामसुंदर सोनी, रमेश रांदड, शरद सोनी उपस्थित राहतील. कार्यक्रमाच्या स्वागताध्यक्ष लता मोहता, हिंगणघाट तर स्वागत मंत्री मीना सावळ आहेत.

आपल्या समाजातील ज्या भगिनी आणि मुलींनी विविध क्षेत्रात विशेष यश संपादन केले आहे त्यांना 'शक्तीवंदन सन्मान' देऊन गौरविण्यात येणार आहे. कु. सिद्धी सोमाणी ज्वेलर, कु. किरण मुंद्रा, कुमारी कीर्ती नंदकिशोर भुराडिया, कु. निवृत्ती चांडक यांचा त्यात समावेश आहे. यावेळी राष्ट्रीय संस्थेतर्फे समाजातील १५ गरजू मुलींना उच्च शिक्षणासाठी १५ लॅपटॉप देण्यात येणार असून यामध्ये बाल व किशोर विकास समिती संस्कार सिद्ध यांचे विशेष सहकार्य लाभणार आहे. विदभार्तील प्रा. एम. सांस्कृतिक संस्थेतर्फे सायंकाळी पवन बसंती नृत्यनाटिका सादर केली जाईल.

११ जानेवारी रोजी सकाळी योगासने व विविध मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन करण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय प्रेरक वक्त्या ब्रह्मा कुमारी डॉ. बी. के. सुनीता, यांचे प्रेरक भाषण होईल. राष्ट्रीय महिला सेवा ट्रस्टच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीचा समारोप होईल. सांस्कृतिक समितीने आयोजित केलेला झोनल कार्यक्रम - फेस्टिव्हल रो रंग.. मिठी मारवाडी का संग, ज्यामध्ये आपली संस्कृती आणि पारंपारिक सण यावर मारवाडी भाषेत सुंदर सादरीकरण केले जाईल आणि त्यात प्रत्येक प्रदेशातील परफॉर्मन्सचा समावेश असेल. त्यात १५ स्पर्धक सहभागी होणार आहेत. याशिवाय पारंपारिक महाराष्ट्रीयन सण हळदी कुमकुमचा कार्यक्रम आयोजक संस्थेतर्फे घेण्यात येणार आहे.

राज्यमंत्री ते प्रदेशाध्यक्ष अशी विभागीय रिपोर्टिंगची स्पर्धा होणार आहे. महिला सशक्तीकरण अंतर्गत, 'होय मी स्वयंसिद्ध' नावाचा एक कार्यक्रम होणार आहे ज्यामध्ये नेपाळ चॅप्टरसह २७ राज्यांतील आपल्या माहेश्वरी समाजाच्या ३२ स्वयंनिर्मित निमित्त सहभागी होतील, ज्यांनी स्वतःला सिद्ध केले आहे. फील्ड हा कार्यक्रमाचा मुख्य भाग असेल. त्यानंतर राष्ट्रीय अधिका-यांसोबत प्रादेशिक अधिका-यांची बैठक होणार आहे.

१२ जानेवारी रोजी सकाळी रिसॉर्टमध्ये फेरफटका मारला जाईल. साहित्य समिती विविध सामाजिक विषयांवर अनोख्या शैलीत 'विविध दर्पण' ही वादविवाद स्पर्धा आयोजित करणार आहे. नेपाळ चॅप्टरसह २७ राज्यांतील सहभागी युक्तिवाद आणि वादविवादाच्या रूपात आपली मते मांडतील. मकर संक्रांतीनिमित्त वस्त्रमळ वाटपाचा कार्यक्रमही होणार असून त्याअंतर्गत हजारो साड्यांचे वाटप करण्यात येणार आहे. त्यानंतर समारोपीय कार्यक्रम होईल.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाहतूक, निवास, भोजन व्यवस्था, नोंदणी, स्वच्छता, स्टेज व्यवस्था, स्वागत समिती, संपर्क समिती, प्रचार समिती अशा अनेक समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. प्रदेशाध्यक्षा सुषमा बंग, सचिव निलिमा मंत्री, सर्व क्षेत्रीय अधिकारी, जिल्हाध्यक्ष, सचिव, नागपूर जिल्हाध्यक्ष प्रगती माहेश्वरी, सचिव मीनु भट्ट, शहर महिला समिती अध्यक्षा नीता सारडा, सचिव ज्योती मंत्री व संपूर्ण चमू विशेष परिश्रम घेत आहे . देशभरातून सुमारे ६०० भगिनी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती सुनीता मल्ल आणि पूनम झंवर यांनी दिली आहे.

# नामांकित कंपनीच्या नावाने बनावट उत्पादनांची विक्री

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

नामांकित ॲप्पल कंपनीचे नाव आणि लोगोचा उपयोग करून बनावट उत्पादनांची बाजारात विक्री करणाऱ्या 9 दुकानदारांवर गुन्हे शाखेच्या पथकाने धाड टाकली. पोलिसांनी आरोपी दुकानदारांकडून 2.17 कोटी रुपयांचा माल जप्त केला आहे. पोलिसांनी ही कारवाई ॲप्पल कंपनीच्या प्राधिकृत प्रतिनिधी मृणाल महेशचंद्र अग्रवाल यांच्या तक्रारीवरून केली.

मृणाल ॲप्पल कंपनीत गत 5 वर्षांपासून कायदेशीर सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. त्यांना सीताबर्डी आणि धंतोली परिसरातील काही दुकानदार ॲप्पल कंपनीचे नाव आणि लोगोचा उपयोग करून बनावट उत्पदनांची विक्री करीत असून त्यांनी हा माल मोठ्या प्रमाणात साठवून ठेवला असल्याची माहिती मिळाली होती. मृणाल यांनी पोलिस उपायुक्त (गुन्हे) माकणीकर यांची भेट घेऊन तक्रार दिली. माकणीकर यांनी अंमली पदार्थ विरोधी पथकाला कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार पथकाने सर्वात आधी धंतोली ठाण्यांतर्गत धनवटे चेंबरजवळील एनजीएम मोबाईल शॉपीवर धाड टाकली. दुकानाच्या झडतीत 59.94 लाख रुपये किंमतीचा ॲप्पल कंपनीच्या नावाने असलेल्या विविध प्रकारच्या बनावट असेसरीज आढळल्या. ज्यामध्ये मोबाईल कव्हर, बॅटरी, स्पेअर पाट्र्स आणि इतर उत्पादनांचा समावेश आहे. पोलिसांनी सर्व माल जप्त करून दुकान मालक नवीन अहमद शकील अहमदविरुद्ध कॉपी राईट ॲक्टसह विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला.

### सीताबर्डीत ८ दुकानदारांवर कारवाई

त्यानंतर पथकाने सीताबर्डीच्या राहुल मार्केटमध्ये धाड टाकली. येथे एकानंतरएक 8 दुकानावर धाड टाकून 1 कोटी 57 लाख रुपयांचा बनावट माल जप्त करण्यात आला. आरोपी दुकानदारांमध्ये राज मोबाईलचा संचालक अमित दिलीपकुमार इसरानी, नागनेची टेलिकॉमचा संचालक कल्याण सिंह मंगल सिंह, कुमारी बाबू कव्हर, दिया मोबाईलचा संचालक प्रज्वल जीवन जरूळकर, सुनील रहेजा, श्रीरामदेव मोबाईल असेसरीजचे संचालक जेपाराम देवाराम चौधरी, राजू चौधरी आणि चामुंडा मोबाईलचे संचालक भीमराम विरमाराम चौधरी यांचा समावेश आहे.

# विद्यागंगा पब्लिक स्कूलने तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात पटकावला प्रथम व तृतीय क्रमांक

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. २६ :

मौदा तहसीलच्या तारसा येथील जनता विद्यालयाच्या प्रांगणात आयोजित तहसीलस्तरीय बालविज्ञान प्रदर्शनात विद्या गंगा पब्लिक स्कूल, तारसा येथील विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करून दिव्यांग प्रवर्गात प्रथम क्रमांक व प्रदर्शनात तृतीय क्रमांक पटकावला अनेक शाळांनी विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात त्यांचे मॉडेल सादर केले होते.




या प्रदर्शनात विविध वयोगटातील व पार्श्वभूमीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे प्रदर्शन केले. स्पर्धेमध्ये इयत्ता सातवी लाइफ कॅप्सूल आपत्ती व्यवस्थापन प्रकल्पातील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थिनी कुमारी प्रजनली भुजाडे हिने अपंग गटात प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत शिक्षक पंकज वटेकर यांनी मॉडेल मेकिंगमध्ये इशांत गणवीर व साहिल बोरकर या विद्यार्थ्याने तृतीय क्रमांक पटकावला स्वप्नील श्रावणकर, माजी अध्यापन अधिकारी चिंकुरे, विस्तार अधिकारी मरस्कोले आदी मान्यवरांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकाचे अभिनंदन केले. स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र व पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका माननीय देशमुख मॅडम यांनी सर्वांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान, अन्न, आरोग्य व स्वच्छता, वाहतूक, व दळणवळणाचे महत्व सांगितले व शाळेच्या संचालिका वैशाली लेंडे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले त्यांना भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. संचालन शिल्पा खंडित व प्रमोद रावणे यांनी केले.

# स्लॅब तोडून ठेवला उर्वरित काम केंव्हा होणार?

## लोणारा येथील वर्ग खोलीचे दुरुस्ती काम थंडबस्त्यात



■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर, दि. २६ :

जिल्हा परिषद शाळेच्या वर्गखोलीवरील जीर्ण झालेला स्लॅब ठेकेदारांनी तोडला मात्र अद्याप पर्यंत त्या वर्ग खोलीवर नव्याने स्लॅब टाकण्याचे काम थंडबस्त्यात असल्यामुळे जिल्हा परिषद प्रशासनाने या अर्धवट कामाकडे लक्ष देऊन संबंधित कंत्राटदारांकडून तात्काळ काम पुर्ण करावे,अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे

कळमेश्वर पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या लोणारा येथे जिल्हा परिषदेच्या शाळेत ७ वगार्तून ५१ विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यांना ज्ञानार्जन करण्याकरिता स्वतंत्र वर्ग खोल्या बांधण्यात आलेल्या आहेत. यापैकी सद्यस्थितीत पाच वर्गखोल्यांमधून विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यात येत होते.

परंतु यापैकी एक वर्ग खोली जीर्ण झाल्याने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक नियोजन समितीच्या माध्यमातून दुरुस्ती मंजूर करण्यात आली आहे. याकरिता पाच लाखाचा निधी देण्यात आला आहे. या निधीत वर्ग खोली वरील षटकोनी स्लॅब तोडून त्या ठिकाणी नवीन स्लॅब टाकने व टाईल्स लावने आदी कामाचा अंतर्भाव आहे.

या कामाचे जिल्हा परिषद स्तरावरून ई टेंडरिंग झाले असून कंत्राटदाराला कामही देण्यात आले आहे. संबंधित कंत्राटदाराने या वर्गखोलीवरील स्लॅब तोडला. याला आता दहा पंधरा दिवसाचा कालावधी लोटलेला आहे. परंतु अद्याप पर्यंत नवीन स्लॅब टाकल्या गेला नाही. स्लॅब तोडला तेव्हां पासून काम बंद असल्याने नव्याने स्लॅब टाकण्यास दिरंगाई होत आहे. यामुळे शालेय विद्यार्थ्यांना बसण्यासाठी इतर वर्गखोल्यात जागा अपुरी पडत आहे. तसेच या इमारतीच्या बांधकामासाठी आणून ठेवलेले साहित्य प्रांगणात पडलेले आहे. लोणारा हे गाव गोंडखैरी पंचायत समिती तसेच गोंडखैरी जिल्हा परिषद सर्कल मध्ये येते. या क्षेत्रातील लोकप्रतिनिधींनी थंडबस्त्यात असलेल्या वर्ग खोलीच्या दुरुस्तीकडे लक्ष देऊन उर्वरित काम मार्गी लावावे अशी नागरिकांनी मागणी केली आहे.

# ऑटोडीलरच्या कार्यालयात चोरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

एका ऑटोडीलरचे कार्यालय फोडून डीव्हीआर आणि चारचाकी वाहनासह एकूण 4 लाख 62 हजार रुपयांचा माल चोरी केला. ही घटना पाचपावली पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी असीम अख्तर अब्दुल सलाम अंसारी (42) रा. मोमिनपुराच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

अख्तर यांचे कामठी रोडवर जी-9 ऑटोडील नावाने दुकान आहे. रात्री 8.30 वाजताच्या सुमारास ते दुकान बंद करून घरी गेले होते. मध्यरात्रीला चोरांनी शटरचे कुलूप तोडून दुकानात प्रवेश केला. गल्ल्यात त्यांना काही मिळाले नाही. आरोपी सीसीटीव्ही कॅमेऱ्याची डीव्हीआर आणि बाहेर उभी एमएच-31/ईयू-0672 क्रमांकाची कार चोरी करून पसार झाले. सकाळी अख्तर दुकानात आले असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी पोलिसात तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# मंदिरे आणि पुरोहित यांना संघटित करण्याची आवश्यकता : गोविंद शेंडे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

मंदिरे आणि पुरोहित या हिंदू धर्माच्या रक्षणासाठी दोन मोठ्या सामाजिक शक्ती आहेत. त्यांचा समाजावर प्रचंड प्रभाव आहे. त्यांचे हे कार्य त्यांना अधिक चांगले करता यावे यासाठी त्यांना संघटित करण्याचे काम मंदिर आयामाच्या कार्यकर्त्यांनी करावे, असे आवाहन विश्व हिंदू परिषदेचे क्षेत्र मंत्री गोविंद शेंडे यांनी अभ्यास वगार्चा समारोप करताना मार्गदर्शन केले.

विश्व हिंदू परिषदेच्या मंदिर एवं अर्चक पुरोहित संपर्क आयामाचा विदर्भ प्रांताचा एक दिवसीय कार्यकर्ता अभ्यास वर्ग बुधवार दिनांक 25 डिसेंबरला नागपुरात संपन्न झाला.

नागपूर विदभार्तून सहा महिला कार्यकर्त्यांसह एकूण 56 कार्यकर्ते वर्गात सहभागी झाले. पहिल्या सत्रामध्ये विदर्भ विश्व हिंदू परिषदेचे प्रांतमंत्री श्री प्रशांत तितरे यांनी विश्व हिंदू परिषदेच्या सर्व



आयामांच्या कामाची माहिती देऊन महत्त्व सांगितले. उद्घाटन सत्रात विश्व हिंदू परिषदेच्या विदर्भ प्रांत उपाध्यक्ष ममताताई चिंचवडकर व्यासपीठावर होत्या तर समारोप सत्रामध्ये प्रांत सहमंत्री देवेशजी मिश्रा व्यासपीठावर होते.

दुसऱ्या सत्रामध्ये विश्व हिंदू परिषदेचे क्षेत्र संपर्कप्रमुख यांनी मंदिर आयामाची भूमिका व कार्य त्याबद्दल सविस्तर माहिती दिली. मंदिर आणि पुरोहित या सामाजिक संस्थांचे महत्त्व, त्यांनी हिंदू धर्म, संस्कृती, परंपरा उज्वल राखण्यासाठी बजावलेले कार्य याबद्दल सांगून आज या संस्थांसमोर उभे झालेले प्रश्न स्वरूप स्पष्ट केले आणि ते सोडवण्यासाठी संघटित होण्याचे आवाहन केले. कार्यकर्त्यांच्या प्रश्नांचे त्यांनी समाधान केले.

यानंतरच्या सत्रात नागपूरचे कार्यकर्ते, विदभार्तील कार्यकर्ते आणि महिला कार्यकर्त्या यांच्या स्वतंत्र बैठकी होऊन त्यात कामाचा विचार झाला व वेगवेगळे उपक्रम ठरवण्यात आले.

विश्व हिंदू परिषदेच्या धर्मयात्रा आयामाचे क्षेत्र प्रमुख राजेश्वर निव्वल यांनी यात्रा सुंदर स्वच्छ पर्यावरण पूरक करण्याच्या दृष्टीने आपण यात्रांकडे लक्ष दिलं पाहिजे असे सांगितले. यात्रा म्हणजे अर्थव्यवस्थेला गती देणारे जुन्या काळाचे एक्सपो किंवा प्रदर्शन आहेत असे ते म्हणाले.

कोणतेही काम करण्यासाठी किंवा प्रश्न सोडवण्यासाठी कार्यकर्त्यांची रचना उभी करावी लागते ही रचना उभी कशी करावी त्यांचे संघटन कसे बांधावे त्यासाठी कसा विचार केला पाहिजे काय पथ्य पाळले पाहिजे, याचे मार्गदर्शन अनिल सांबरे यांनी तिसऱ्या सत्रात केले. प्रांत प्रमुख प्राध्यापक वासुदेव नागपुरे यांनी वर्गाचे संचालन केले. सहप्रमुख प्रशांत जोशी, डॉक्टर संजय पात्रीकर, नागपूर प्रमुख भरत महाशब्दे, सहप्रमुख मनीष कुलकर्णी यांनी व्यवस्था सांभाळली.

# सव्वा लाखाच्या मालावर डल्ला

**नागपूर :** अज्ञात आरोपीने एका कापड दुकानाचे कुलूप तोडून रोख रकमेसह 1 लाख 25 हजार रुपयांच्या मालावर डल्ला मारला. ही घटना लकडगंज पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी इशांत दीपक गुबे (34) रा. टेलर लाईन, छावणी सदरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. गुबे यांचे सीए रोडवर टेलिफोन एक्सचेंज चौकाजवळील गांधी गेट मार्केटमध्ये कापडाचे दुकान आहे. गत 23 डिसेंबरला रात्री 11 वाजताच्या सुमारास ते दुकानाला कुलूप लावून घरी गेले होते. मध्यरात्रीनंतर अज्ञात आरोपीने त्यांच्या दुकानाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. गल्ल्यातील 35 हजारांची रोकड, दोन लगेज बॅग आणि विविध कपडे असा एकूण 1,25,000 रुपयांचा माल चोरी करून पसार झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी गुबे दुकानात आले असता ही घटना उघडकीस आली. त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली.

# ४५ वर्षीय इसमाचा चिमुकलीवर अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. २६ :

जुने कन्हान पोलीस स्टेशनच्या मागे ४५ वर्षीय इसमाने चिमुकलीवर अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. पोलीसांन कडुन मिळालेल्या माहिती नुसार मंगळवार (दि.२४) डिसेंबरला सकाळी ९ वाजता चिमुकल्या मुलीची आई बाहेर कामाला गेली होती. घरी आल्यावर मुलगी दिसली नाही. आईने पोलीस स्टेशनला पोहचुन मुलीला विचारले असता मुलीने सांगितले की तारसा रोडवर प्रमोद वंजारी मामा भेटले. त्याने मुलीला १५० रुपए लहान मुलीच्या वाढदिवसा करिता केक घ्यायला दिले. ती बाहेर समोसा खात बसली होती. तेव्हा आरोपी प्रकाश बाळकृष्ण कुर्वे (वय ४५) रा.संजीवनी नगर कन्हान हा तेथे पोहोचला. आरोपीने मुलीने नाही म्हटले असता तिच्या तोंडावर काळा दुपट्टा बांधुन हात खिचुन मुलीला मारत मारत जुने कन्हान पोलीस स्टेशनच्या मागे घेऊन गेला आणि तिच्या वर अत्याचार केला. कन्हान पोलीसांनी मुलीच्या आईच्या तक्रारी वरून आरोपी प्रकाश कुर्वेला अटक करुन त्यांचा विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष गायकवाड राजेंद्र पाटील करीत आहे.

# मांढळ प्राथमिक आरोग्य केंद २४ तास सुरु ठेवा : आशिष आवळे

■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. २६ :

व्यापार नगरी म्हणून प्रसिद्ध मांढळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्र पाच वाजता बंद करत असल्याने त्यानंतर आलेल्या पेशंटनी कुठे उपचार करायचा? हा प्रश्न मांडळ व परिसरातील नागरिकांना पडलेला आहे. या आशयाचे निवेदन क्षेत्राचे नवनिर्वाचित आ. संजय मेश्राम यांना आशिष आवळे यांच्या नेतृत्वात देण्यात आले.



वैद्यकीय सुविधा ही 24 ही तास दिली जाते. प्राथमिक आरोग्य केंद्र मांढळ ही तालुक्यातील मोठी PHC आहे. या PHC वर मांढळ जिल्हा परिषद सर्कलची संपूर्ण गावे अवलंबून आहेत. तसेच कन्हान्डला अभयारण्य प्रकल्प व पुनर्वसित गावांचाही मोठ्या प्रमाणात भरणा आहे. तालुक्यातील मोठी बाजारपेठ असून येथील प्राथमिक आरोग्य केंद्र कोणतीही आकस्मिक सेवा न देता सदर PHC ही 5 वाजता बंद केली जाते.

नूतन इमारतीच्या बांधकामाकरिता जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळा येथे स्थलांतर करण्यात आलेले आहे. असे येथील कर्मचाऱ्यांकडून सांगितले जाते. तिथे रुग्णांना प्राथमिक व बाह्य रुग्णांना कोणताही उपचार मिळत नाही. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील मेडीकल ऑफिसर यांना वरिष्ट अधिकाऱ्यांच्या कोणत्याही आदेशाविना मनमानी पद्धतीने प्राथमिक आरोग्य केंद्र सायंकाळी 5 वाजताच बंद केले जाते. व कोणतीही इमर्जन्सी (तातडीची) सेवा दिली जात नाही.

सुट्टीच्या दिवशी तर पूर्णपणे प्राथमिक आरोग्य केंद्र बंद असते. करिता प्राथमिक आरोग्य केंद्र मांढळ हे (24 7) सुरु ठेवण्याकरिता आदेशित करण्याकरिता उमरेड विधानसभा नवनिर्वाचित आ. संजय मेश्राम यांना निवेदन देण्यात आले. प्रसंगी अध्यक्ष पुर्व विदर्भ राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस व ग्रा. पं. सदस्य मांढळ आशिष आवळे, दुर्गाप्रसाद दुधपचारे व सागर सोनकुसरे प्रामुख्याने उपस्थित होते.

# कळंबीत बिबट्याने गायीला केले ठार



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २६ :

कळंबी येथील शेतकरी प्रकाश मोहोड यांच्या गायीला बुधवार २५ डिसेंबर रोजी बिबट्याने लचके तोडून ठार केले. त्याच दिवशी रात्री ८ वाजता अनिल डेहनकर यांच्या शेतात अशोक डेहनकर व त्याचा मुलगा महेश डेहनकर शेतातील मोटर पंपाची लाईन बंद करायला गेले होते. तेव्हा शेतात बिबट्या पाणी पित असल्याचे दिसताच लगेच दोघेही जण बाजुला असलेल्या झोपडीत गेले. झोपडीचे दार लावले लगेच मोबाईल वरून गावातील राजू वरुळकर, प्रशांत बावणे, ललित वरुळकर, ईशान लोणारे, मोहोद, प्रतिक मोहोळ, राहुल डेहनकर, अमर वरुळकर, नामदेव ठाकरे कुंदन बावणे यांना फोन केले.

सर्व नागरीक रात्रीच शेतात पोहचले. दोघेही जण घाबरलेले होते. त्यांना घेऊन गावात पोहचले.परिसरात बिबट्या फिरत असल्यामुळे नागरीक दहशतीत आहे. शेतात जायला नागरीक घाबरत आहे.बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी ग्रा.पं. सदस्य अनिल डेहनकर यांनी केली आहे.

# ग्राहकांच्या समस्यांना प्राधान्य देणार : सुजाता गावंडे



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २६ :

अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या पदाधिकारी यांनी आणलेल्या समस्याग्रस्त ग्राहकांच्या समस्यांना प्राधान्याने सोडविण्यासाठी प्रयत्न करणार.असे आश्वासन नायब तहसीलदार श्रीमती सुजाता गावंडे यांनी दिले.

अ.भा.ग्राहक-पंचायत व हिंगणा तहसील कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने तहसील कार्यालयात राष्ट्रीय ग्राहकदिन साजरा करण्यात आला.याप्रसंगी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन त्या बोलत होत्या.

याप्रसंगी डॉ. सरिता कडु,ग्राहक पंचायतचे विदर्भप्रांत सदस्य विनायक इंगळे गुरुजी,जिल्हा उपाध्यक्ष बब्बुभाई शेख, डॉ. अतुल लामसोंगे, प्रा. दिपक रामटेके, ॲड.अर्चना सोनारे व पुरवठा निरीक्षण अधिकारी रागीनी गायकवाड उपस्थित होते.

सर्वप्रथम ग्राहक हा कसाकसा आणि कुठेकुठे फसवल्या जात आहे. पेट्रोल भरताना कशी फसवणूक करतात. सिलींडर घेताना वजन करुन घेणे गरजेचे आहे. तसेच कोणतीही वस्तू खरेदीनंतर पक्की पावती घेणे काळाची गरज आहे, अशी माहीती इतर पाहुण्यांनी दिली.प्रास्तविक डॉ. अतुल लामसोंगे यांनी तर संचालन रागीनी गायकवाड व आभार पांडुरंग काळे यांनी मानले.

यावेळी निलिमा गोबाडे, आशाताई बुरनुरे, नामदेव आमनेरकर, वसंता राडे, बाबुलाल तामगाडगे, प्रज्ञाताई रामटेके, जयवंता कैकाडे, अनिल चावरे, प्राची लांजेवार, अरुण गव्हाळे, शंकर मुन, विनय सोनडवले, अक्रम शेख, अस्पाक पठाण, विजय मसराम, किरण घवघवे, विशाल मसराम, विशाल बांदरे, विलास जेमती, भगवान बालपांडे, नरहरी रामटेककर व माजी सरपंच संतोष कटरे उपस्थित होते.

## महसूल विभाग
### तहसिलदार, कामठी यांचे कार्यालय

दुरध्वनी क्रमांक :- ०७१०९-२९५००९ Email ID tahsildarkamptee@gmail.com
प्रस्तु-४ ना.तह. कामठी/कावि. ३५१/२०२४ दिनांक २६/१२/२०२४

वाचा - १. जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ २. जन्म मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३
३. भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र
४. मा. जिल्हा दंडाधिकारी यांचे कडील आदेश क्रमांक अ.का./डी-१/ जन्म मुत्यु आदेश / कावी १५८/२०२३, दि.११.०५.२०२४
५. अर्जदार श्री/ श्रीमती सुधाकर बबनराव टेटे रा. गादा, ता. कामठी. नागपुर यांचा अर्ज दि. ०७/१०/२०२४ प्राप्त दि.११/१०/२०२४

-: जाहीरनामा :-

ज्याअर्थी अर्जदार, श्री/श्रीमती सुधाकर बबनराव टेटे रा. गादा ता. कामठी, जि. नागपुर यांनी या कार्यालयात त्यांच्या आजोबाचे नोंदणीसाठी महाराष्ट्र जन्म/मुत्यु अधिनियम १९६९ चे कलम ११(२) व (३) अन्वये मुत्यु नोंद ग्रामपंचायत गादा ता. कामठी यांचे दप्तरी घेण्याकरीता आदेशीत करणेकामी अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू अर्जदार, श्री/श्रीमती सुधाकर बबनराव टेटे रा. गादा ता. कामठी, जि. नागपुर त्यांचे आजोबा नामे आबाजी श्रावण टेटे यांची मुत्यु दिनांक. १५/१०/१९६५ रोजी झालेला असल्याचे अर्जदार यांनी त्यांच्या अर्जात नमुद केलेले आहे.

त्याअर्थी मी कार्यकारी दंडाधिकारी, कामठी उपरोक्त वाचा क. १. आणि २ नुसार व ३ व ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा मुत्युबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरीता व गृह चौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणत्याही हितसंबंधाचे काही आक्षेप/उजर / हरकती असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारासह नायब तहसिलदार दंडाधिकारी, कामठी यांच्या न्यायलयात स्वता:या कार्यालयत जातीने / वकील मार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनाम्याच्या दिनांकापासुन पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप/उजर / विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास मुत्युबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन प्रस्तावित मुत्यु नोंदीबाबतचा आदेश निर्गमीत करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

| अनु.क्र. | मुत्यु व्यक्तीचे नाव | अर्जदाराशी नाते |
|---|---|---|
| १. | आबाजी श्रावण टेटे रा. गादा ता. कामठी, नागपुर | आजोबा |

स्वा/-
(आर.एच.बमनोटे)
नायब तहसीलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, कामठी

## जाहिरनामा / सायटेशन नोटीस

कोर्ट विद्यमान सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर, कामठी यांचे न्यायालय, कामठी, जि. नागपुर
एम.जे.सी. नं. ११३/२०२४ पे.ता.: २८/०१/२०२५
प्रोसेस नं. १९८८/२०२४

Applicants : 1) Akhtari Ahmad Wd/ Mushtakh Ahmad, Aged 71 Years, Occu. Household, 2) Mustakim Ahmad S/o Mushtakh Ahmad, Aged 40 Years, Occu. Private, 3) Shaista Parvin Wd/o Abdul Hafij Aged about 53 years Occ. Housewife, 4) Abdul malik S/o Abdul Hafij Aged about 38 years Occ. Private, 5) Abdul Reyaz S/o Abdul Hafij Aged about 36 years, Occ. Private, All R/o. Kadar Zenda Near Badi masjid, Kamptee, Tah. Kamptee, Dist. Nagpur.
---- V/S ----
Non Applicant : Nil

मयत: -Late Abdul Gafur Sheikh Ali, मयत दि. १०/०५/२०२४, ठिकाण कादर झेंडा. कामठी. Late Ameena B. Abdul Gafur, मयत दि. ०३/०७/२०२४. ठिकाण- कादर झेंडा, कामठी, Late Abdul Sattar Abdul Gafur, मयत दि. ३०/०६/२०२४, ठिकाण- कादर झेंडा, कामठी, Late Abdul Jabbar @ Mushtak, मयत दि. १३/१०/१९९९, टिकाण- कादर झेंडा कामठी, Late Khatija B. Abdul Sattar, मयत दि. २८/०७/२०२४, विकाण- कादर झेंडा, कामठी, Late Abdul Hafij Abdul Sattar, मयत दि. २०/१०/२००७ तिकाण- कादर होंडा, कामठी.

सदरहु अर्जदारांनी वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये मयत Late Abdul Gafur Sheikh Ali, Late Ameena B. Abdul Gafur, Late Abdul Sattar Abdul Gafur, Late Abdul Jabbar @ Mushtak, Late Khatija B. Abdul Sattar, Late Abdul Hafij Abdul Sattar, याचे वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनवाणीची तारीख कोर्ट विद्यमान सहदिवाणी न्यायाधिरा क.स्तर, कामठी यांनी दि २८/०१/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबधिताना नातेवाईकाना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर अर्जदार मयतदाराचे वारस नव्हे असे कोणास समझविण्याचे असेल तर पेशी तारखेवर हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखा जरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुददतीत कोणी योग्य ती कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला Late Abdul Gafur Sheikh Ali, Late Ameena B. Abdul Gafur, Late Abdul Sattar Abdul Gafur, Late Abdul Jabbar @ Mushtak, Late Khatija B. Abdul Sattar, Late Abdul Hafij Abdul Sattar, यांचे वारसान प्रमाणपत्र मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १९/१२/००२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिव्यानिशी दिला.

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी

## जाहीरनामा

कोर्ट विद्यमान श्री भोजराज बडवाईक नायब तहसिलदार, रामटेक यांचे न्यायालय
प्र.क्र. / एम आर सी-८१/२०२४
मौजा रामटेक ता. रामटेक
जिल्हा नागपूर

ज्याअर्थी अजाब बारकुजी ठेंगरे रा. महात्मा फुले वार्ड रामटेक, ता. रामटेक जि. नागपूर यांनी मामेबहीण नामे निर्मला लक्ष्मणराव भागालकर यांचा जन्म दिनांक १४.०८.१९६६ रोजी मौजा महात्मा फुले वार्ड रामटेक ता. रामटेक येथे राहत्या घरी येथे झाला असुन जन्मची नोंद नगर परिषद रामटेक येथे केली नाही. त्याबाबत नगर परिषद रामटेक यांनी दिनांक १६.१०.२०२४ रोजी नोंद नसल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे नामे निर्मला लक्ष्मणराव भागालकर यांचा जन्म दिनांक १४.०८.१९६६ बाबत नगर परिषद रामटेक येथे नोंद घेणे बाबत आदेश पत्र मिळणे करीता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याव्दारे असे सुचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जात नमूद निर्मला लक्ष्मणराव भागालकर यांचा जन्म दिनांक १४.०८.१९६६ बाबत नगर परिषद रामटेक येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तक्रार असल्यास आपण दिनांक ३०.१२.२०२४ पावेतो आपले आक्षेप अथवा उजर तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक ५.१२.२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

स्थळ :- रामटेक
दिनांक : ०५/१२/२०२४

स्वा/-
(भोजराज बडवाईक)
नायब तहसिलदार, रामटेक

## जाहीरनामा

कोर्ट विद्यमान श्री भोजराज बडवाईक नायब तहसिलदार, रामटेक यांचे न्यायालय
प्र.क्र. / एम आर सी-८१/२०२४
मौजा मानापुर ता. रामटेक
जिल्हा नागपूर

ज्याअर्थी अरुण केशवराव नगरे रा. मानापुर ता. रामटेक जि. नागपूर यांनी स्वतः नामे अरुण केशवराव नगरे यांचा जन्म दिनांक ०५.०६.१९८३ रोजी मौजा मानापुर, ता. रामटेक येथे राहत्या घरी येथे झाला असुन जन्मची नोंद गट ग्रामपंचायत मानापुर येथे केली नाही. त्याबाबत गट ग्रामपंचायत मानापुर यांनी दिनांक ०१.०१.२०२४ रोजी नोंद नसल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे नामे अरुण केशवराव नगरे यांचा जन्म दिनांक ०५.०६.१९८३ बाबत गट ग्रामपंचायत मानापुर येथे नोंद घेणे बाबत आदेश पत्र मिळणे करीता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याव्दारे असे सुचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जात नमूद अरुण केशवराव नगरे यांचा जन्म दिनांक ०५.०६.१९८३ बाबत गट ग्रामपंचायत मानापुर येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तक्रार असल्यास आपण दिनांक ०३.०१.२०२५ पावेतो आपले आक्षेप अथवा उजर तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक २६/१२/२०२५ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

स्थळ :- रामटेक
दिनांक : २६.११.२०२८

स्वा/-
(भोजराज बडवाईक)
नायब तहसिलदार, रामटेक

# रिअल इस्टेट सल्लागारांच्या हक्कांसाठी सरकारसमोर मुद्दे मांडणार...

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचे आश्वासन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

भारतीय रिअल इस्टेट सल्लागार वेलफेअर युनियन, नागपूरच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आणि विधानसभेचे माजी अध्यक्ष नाना पटोले यांची नुकतीच भेट घेतली. या बैठकीत रिअल इस्टेट सल्लागारांच्या समस्या, फसवणुकीचे प्रकार आणि महारेराशी संबंधित अडथळ्यांवर सखोल चर्चा करण्यात आली.



सल्लागारांच्या व्यावसायिक अडचणी, कमीशनची अनिश्चितता, आणि कायदेशीर प्रक्रियांत येणाऱ्या अडचणींमुळे निर्माण झालेल्या आव्हानांवर उपाय शोधण्यावर भर देण्यात आला. यावेळी चर्चेदरम्यान सल्लागारांनी त्यांचे प्रश्न मांडताना कमीशन देण्याबाबतचा अन्याय, फसवणुकीच्या घटनांमध्ये होणारे नुकसान, आणि महारेरामध्ये नोंदणीच्या कठोर नियमांमुळे निर्माण होणाऱ्या अडचणींवर प्रकाश टाकला. सल्लागारांनी ही प्रक्रिया अधिक सुलभ करण्याची गरज व्यक्त केली, ज्यामुळे व्यवसाय करणाऱ्यांसाठी एक सुरक्षित आणि पारदर्शक प्रणाली तयार होऊ शकेल.

नाना पटोले यांनी सल्लागारांच्या समस्यांचे गांभीर्य समजून घेतले आणि यावर लवकरच उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. "रिअल इस्टेट सल्लागार हे व्यवसायातील महत्त्वाचा घटक आहेत. त्यांची मेहनत आणि त्यांचा सन्मान राखणे हे सरकारचे प्राथमिक कर्तव्य आहे," असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी सल्लागारांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी या मुद्द्यांना प्राधान्य देऊन सरकारसमोर मांडण्याचा शब्द दिला.

बैठकीत सल्लागारांनी महारेरा अंतर्गत लागू असलेल्या परीक्षेचे शुल्क, सहा महिन्यांच्या अहवालाची अट, आणि PMLA (मनी लॉन्ड्रिंग विरोधी नियम) यांसारख्या प्रक्रियांवर तक्रार व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, या नियमांमुळे सल्लागारांना अनावश्यक अडथळ्यांना सामोरे जावे लागते. याशिवाय, फसवणुकीवर कठोर कायदे तयार करून सल्लागारांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी ठोस पावले उचलण्याची गरज व्यक्त करण्यात आली. नाना पटोले यांनी आश्वासन दिले की काँग्रेस पक्ष या समस्यांना गंभीरतेने घेईल आणि सल्लागारांना न्याय मिळवून देण्यासाठी सरकारदरबारी ठोस भूमिका मांडेल.

त्यांनी सल्लागारांच्या कमीशनबाबत स्पष्टता आणण्याचे, फसवणुकीच्या घटना थांबवण्यासाठी कठोर नियम आखण्याचे, आणि रिअल इस्टेट व्यवसायात अधिक पारदर्शकता निर्माण करण्यासाठी आवश्यक त्या पावलं उचलण्याचं आश्वासन दिलं. या चर्चेत भारतीय रिअल इस्टेट सल्लागार वेलफेअर युनियनच्या शिष्टमंडळाने सक्रिय सहभाग घेतला. यामध्ये राजवीर सिंह, डॉ. के.एम. सुरडकर, प्रदीप मनवर, प्रबोध देशपांडे, संजय कृपान, संजय धापोडकर, संजय खोब्रागडे, अनिल सोनकुसरे आणि स्वप्नील खापेकर यांचा समावेश होता.

ही बैठक सल्लागारांसाठी आशेचा किरण ठरली आहे. सल्लागारांच्या हक्कांसाठी उभे राहून त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी काँग्रेस पक्षाने घेतलेली सकारात्मक भूमिका सल्लागारांच्या भविष्यासाठी महत्त्वाची ठरेल. या चर्चेमुळे सल्लागारांच्या व्यावसायिक जीवनात सकारात्मक बदल होण्याची अपेक्षा निर्माण झाली आहे.

# अनैतिक संबंधाच्या संशयातून गुंडाची हत्या

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

अनैतिक संबंधाच्या संशयातून एका गुंडाची हत्या करण्यात आली. ही थरारक घटना कळमना पोलिस ठाण्यांतर्गत आदिवासी प्रकाशनगर परिसरात घडली. राहुल सचिन गुप्ता (19) रा. आदिवासी प्रकाशनगर असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपीला अटक केली आहे. राजा अश्फाक शेख (22) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

राहुल हा सराईत गुन्हेगार होता. त्याच्यावर आर्म्स ॲक्ट, मारहाण, चोरी आणि घरफोडीसह 11 गुन्हे नोंद आहेत. तो परिसरात आपला दरारा निर्माण करण्याचा प्रयत्न करीत होता. आरोपी राजा हा सुद्धा परिसरातच राहतो. त्याचा कोणताही गुन्हेगारी रेकॉर्ड नाही. राहुलचे आपल्या वहिनीशी अनैतिक संबंध असल्याचा संशय राजाला होता. यावरून काही दिवसांपूर्वी राजाने राहुलला चांगलेच फटकारले होते आणि त्याच्या कुटुंबापासून दूर राहण्यास बजावले होते.

तेव्हापासून दोघांमध्ये वैमनस्य होते. मंगळवारी सायंकाळी 7 वाजताच्या सुमारास राजा आदिवासी प्रकाशनगरातील मशिदीमागे एका पानठेल्यावर होता होता. या दरम्यान राहुलही तेथे आला. एकमेकांना पाहून दोघांनीही शिविगाळ सुरू केली. बाचाबाचीचे रुपांतर हाणामारीत झाले. दोघांनीही एकमेकांना लाथा-बुक्क्यांनी मारण्यास सुरूवात केली. राजाने रस्त्यावर पडलेली बल्ली उचलून राहुलच्या डोक्यावर मारली. डोक्यातून रक्ताची धार लागली.

राहुलच्या एका मित्राने फोनवरून घटनेची माहिती त्याच्या आई-वडिलांना दिली. राहुलचे कुटुंबीय घटनास्थळी पोहोचले. राहुलला घेऊन रुग्णालयात जाण्यास निघाले असता त्याने नकार दिला. त्यामुळे ते त्याला घरी घेऊन गेले. डोक्याला मार लागला असल्याने राहुल लवकरच झोपला. बुधवारी सकाळी कुटुंबीयांनी त्याला उठविण्याचा प्रयत्न केला असता तो बेशुद्ध होता.

तत्काळ त्याला उपचारार्थ मेयो रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच कळमना पोलिस रुग्णालयात पोहोचले. पोलिसांनी राहुलची आई विद्या गुप्ताच्या तक्रारीवरून राजाविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंदविला. पोलिसांनी राजाला घरूनच अटक केली.

# मनपा मुख्यालयात ६ जानेवारी रोजी लोकशाही दिनाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

मनपा मुख्यालयात ६ जानेवारी रोजी लोकशाही दिन आयोजित करण्यात येणार आहे. या दिनी जनतेच्या तक्रारी, अडचणी व गा-हाणी ऐकण्याकरिता व त्यांचा निपटारा केले जाणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या दि. ३० डिसेंबर १९९९ चे शासन निर्णयाप्रमाणे जनतेच्या तक्रारीचे निराकरण करण्याचे दृष्टीने दर महिन्यातील पहिला सोमवार हा "लोकशाही दिन" म्हणून आयोजित करण्यात येते. या कार्यक्रमात जनतेच्या तक्रारी लिखीत स्वरुपात घेण्यात येतात व पुढील महिन्याभरात या तक्रारीचे निराकरण करण्यात येते. तसेच विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांनी विभागीय लोकशाही दिनात प्राप्त तक्रारीचे मनपात प्राप्त होणाऱ्या लोकशाही दिनात निकाली काढण्याचे निर्देशित केल्यानुसार सिव्हिल लाईन्स येथील मनपा मुख्यालयाच्या सामान्य प्रशासन विभागात लोकशाही दिन आयोजित करण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने सोमवार दि. ६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वा. सर्व कक्ष प्रमुख व झोन क्रमांक १ ते १० मधील सहा.आयुक्त यांनी यापूर्वीच्या विभागीय लोकशाही दिन व म.न.पा. लोकशाही दिनांतर्गत प्राप्त तसेच निकालात न निघालेल्या तक्रार अजार्चे सर्व माहितीसह जनतेच्या तक्रारी, अडचणी व गा-हाणी ऐकण्याकरीता व त्यांचा निपटारा करण्याकरीता माहितीसह उपस्थित राहावे असे आदेश मा. मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांच्या निर्देशानुसार सामान्य प्रशासन विभागाने आदेश निर्गमित केले आहे.

## तुषार भांजावर लावला एमपीडीए

**नागपूर** : गंभीर स्वरुपाच्या गुन्हेगारीत सक्रीय गुंड तुषार उर्फ भांजा रामेश्वर बिसेन (19) रा. शामनगर, पुनापूर रोडविरुद्ध पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी एमपीडीए लावला आहे. तुषारविरुद्ध चोरी, जबरी चोरी, दरोड्याची तयारी, लोकांना धमकावणे, आर्म्स ॲक्ट आणि मारहाणीसह गंभीर गुन्हे नोंद आहेत. पोलिसांनी याच वर्षी त्याच्यावर प्रतिबंधक कारवाई केली होती. त्यानंतरही तुषारने पारडी ठाण्यांतर्गत चोरी, मारहाण आणि जिवे मारण्याची धमकी सारखे गुन्हे केले. पारडी पोलिसांनी गुन्हे शाखेमार्फत तुषार भांजाविरुद्ध एमपीडीए लावण्याचा प्रस्ताव पोलिस आयुक्तांकडे पाठवला. पोलिस आयुक्तांनी त्याला एक वर्षासाठी छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले.

# रफी साहेबांना समर्पित 'शंभर वर्षापूर्वीची संध्याकाळ'

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

पद्मश्री मोहम्मद रफी साहब यांच्या 100 व्या वाढदिवसानिमित्त वैशूच्या म्युझिकल वर्ल्डने मोर भवनच्या नटराज हॉलमध्ये 'सौ साल पहले' या शीर्षकाखाली रफी साहेबांनी गायलेल्या अनमोल गाण्यांना श्रद्धांजली वाहण्याचे आयोजन केले होते.




निवृत्त महाव्यवस्थापक आणि शास्त्रज्ञ मोहन जी या कार्यक्रमाला विशेषतः उपस्थित होते. सर्वप्रथम वैशूच्या म्युझिकल वर्ल्डच्या संचालिका वैशाली मदारे यांनी सर्व कलाकारांचे व रसिकांचे अक्षरशः स्वागत केले.शहरातील नामवंत कलाकारांनी रफी यांची सोनेरी गाणी सादर केली आणि मोठ्या संख्येने प्रेक्षकांच्या टाळ्या मिळवल्या. ज्यामध्ये दिनेश कामतकर यांनी 'आपके हसीन रुख पे', 'तू कहां यह बता', नूतन सिंग छडीने 'ऐसा ना हो के', 'बरबाद मोहब्बत की दुआ', छाया लुताडे यांनी 'घर तुम भुला ना दोगे', काकोली मलिक यांनी केली. 'इस इश्क मोहब्बत की', पूर्णिमा दत्ताने 'झिलमिल सिताराओं का', 'दिवाना हुआ बादल', विजय वानखेडे यांनी लिहिले 'तू मी'. यूं', 'मुझे दर्दे दिल का', मून दत्ताचा 'क्या हुआ तेरा वादा', 'चुरा लिया है तुमने', संगीता रामटेकेचा 'तुम्हारी नजर', 'मुझे इश्क है तुझे से', रत्नेश सोमकुंवरचा 'पुकारता चला हो'. , 'तुज्याशिवाय मी कुठे जाऊ', सुब्रतो दत्ता 'तू एकटा कुठे जातोस', राज चौधरी 'तुम जो मिल गये हो', वैशाली मदारे यांनी 'हम और तुम और ये सामना' आणि 'आवाज देखे हमे तुम बुलाओ', 'तेरी बिंदिया रे', 'रात के हमसफर' आणि 'सौ साल पहले' हे टायटल गाणे गायन करून स्टेज सेट केला.

कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित रसिकांनी विशेषतः सचिन घुमडे, सागर रामटेके, जगदीश राऊत, प्रशांत शंभरकर, शिल्पा तागडे, अपर्णा चौधरी आदींनी दाद दिली.

कार्यक्रमाचे प्रभावी व्यवस्थापन आणि संकल्पना संगीतकार आणि गायक राज चौधरी यांनी केली. एपीएसचे विनोद अग्रवाल यांनी ध्वनी प्रक्षेपण आणि प्रवाहीकरण केले. त्यावेळी वैशाली मदारे यांनी सर्व प्रेक्षक, पाहुणे मंडळी आणि उपस्थित कलाकारांचे आभार मानले.



**नागपूर** : अन्न व औषध विभागाच्या कॅबिनेट मंत्रीपदी नियुक्ती झाल्याबद्दल नरहरी झिरवाळ यांचे ग्राहक जागृती संस्थेचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते कमल नारायण नामपल्लीवार यांनी पुष्पगुच्छ देवून त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते प्रेम कारेगावकर, राऊत, विजय डोंगरे, पाचपोर उपस्थित होते.

# कारागृहातून सुटताच तरुणाला मारहाण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

वकिलाच्या कारची तोडफोड करून खंडणी मागितल्याप्रकरणी कारागृहात असलेल्या गुंड बाहेर येताच पुन्हा सक्रीय झाला. मंगळवारी त्याने पैशांच्या व्यवहारातून जिवे मारण्याची धमकी देत एका तरुणाला जबर मारहाण केली. या प्रकरणी बजाजनगर पोलिसांनी ज्योतीप्रकाश भट्टाचार्य (37) रा. कोतवालनगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. रमन सवाईथूल (36) रा. त्रिमूर्तीनगर असे आरोपीचे नाव आहे.

ज्योतीप्रकाश हे हॉटेल व्यवसायी आहेत. आरोपी रमन ऑटोडीलिंगचा व्यवसाय करतो. या व्यवसायाच्या आड तो लोकांना चुना लावतो. आई आजारी असल्याचे सांगून रमनने ऑक्टोबर महिन्यात ज्योतीप्रकाश यांच्याकडून 12 हजार रुपये उसणे घेतले होते. मात्र बरेच दिवस लोटूनही तो पैसे परत करीत नव्हता. मंगळवारी सायंकाळी 7 वाजताच्या सुमारास ज्योतीप्रकाश देवनगरातील एका पानठेल्यासमोर उभे होते. या दरम्यान रमन दुचाकीने जाताना दिसला. ज्योतीप्रकाशने त्याला आवाज देऊन थांबविले आणि पैशांची मागणी केली. रमनने पैसे परत करण्याऐवजी शिविगाळ सुरू केली. जिवे मारण्याची धमकी देऊन ज्योतीप्रकाश यांना मारहाण केली. ज्योतीप्रकाश यांनी बजाजनगर पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून रमनचा शोध सुरू केला आहे. रमनविरुद्ध अनेक गंभीर गुन्हे नोंद आहेत. काही दिवसांपूर्वीच बजाजनगर पोलिसांनी त्याला खंडणी प्रकरणात अटक केली होती. चार दिवसांपूर्वीच तो कारागृहातून सुटून बाहेर आला आहे. रमन लोकांकडून गाडी विकण्याच्या नावावर पैसे घेतो आणि नंतर त्यांच्यावर उलटतो. रमनविरुद्ध पोलिसांना आणखीही तक्रारी मिळाल्या आहेत.

# नगरपालिका स्तरावर विरंगुळा केंद्र तयार करण्यात यावेत : जिल्हाधिकारी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

आयुष्याच्या सायंकाळी काही क्षण निवांत घालविण्याच्या उद्देशातून ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र गरजेची आहेत. ज्येष्ठ नागरिकांना करमणुकीसाठी विविध साहित्य उपलब्ध करुन देत नगरपालिका स्तरावर ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र तयार करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात जिल्हा जेष्ठ नागरिक समन्वय सनियंत्रण समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांच्यासह समाज कल्याण विभागाचे वरिष्ठ अधिकारी, ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

जिल्हा जेष्ठ नागरिक समन्वय सनियंत्रण समितीवर महाराष्ट्र जेष्ठ नागरिक महासंघातील दोन नवीन नियुक्त झालेल्या सदस्यांची निवड, ज्येष्ठ नागरिक कक्षातील संयोजक, उपसंयोजक, सहसंयोजक, सदस्य नियुक्तीबाबत आदी विषयांचा आढावा घेण्यात आला.

कुटुंबाची व पोटच्या मुलाबाळांची शेवटच्या श्वासापर्यंत काळजी करणाऱ्या आई-वडिलांना वृध्दापकाळात घरातीलच सदस्यांकडून अपमानजक वागणूक दिली जाते. आयुष्याचा अखेरचा प्रवास सुखकर व्हावा, अशी सर्वांची मनोमन इच्छा राहते. परंतु काही संवेदना हरपलेल्या पाल्यांकडून वयोवृध्द माता-पित्यांकडे दुर्लक्ष केले जाते.

# कालिदास हे जागतिक पटलावरचे कवी : डॉ. पंकज चांदे




## भाऊ दप्तरी यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

कालिदास हा विषय म्हणजे ज्ञानाचा समुद्र आहे. ज्ञान, कला, साहित्य या सगळ्यात ज्याचा उल्लेख आढळतो असा तो जागतिक पटलावरचा कवी आहे. त्याने आपल्या जागतिक स्तरावरील साहित्यात वैदर्भी रीती वापरल्यामुळे ते साहित्य सर्वसामान्यांना पटकन समजते, असे प्रतिपादन कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंकज चांदे यांनी केले.

विदर्भ साहित्य संघ-ग्रंथसहवासतर्फे कै. के. ल. उपाख्य भाऊजी दप्तरी यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी आयोजित कार्यक्रमात कवी कालिदासाचे श्रेष्ठत्व या विषयावर ते बोलत होते. विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथसहवासमध्ये झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वि. सा. संघाचे उपाध्यक्ष ज्येष्ठ लेखक, संशोधक आणि विचारवंत डॉ. राजेंद्र डोळके होते.

रघुवंश, शाकुंतल, ऋतू संहार, मेघदूत अशा कालिदास यांच्या विविध साहित्यकृतींचा उल्लेख करताना डॉ. चांदे म्हणाले, शेक्सपिअरपेक्षा कालिदास सरस होता. त्याच्या रचना उपमांकरिता प्रसिद्ध आहेत. कालिदासाने मेघदूत या खंड काव्यात मेघाला दूत केले आहे. अशी उपमा कोणत्याही काव्यात आढळत नाही. त्याच्या काव्यात उपमा आणि अर्थांतरन्यास यांचा सुंदर संगम आढळतो, असेही ते म्हणाले. अध्यक्षीय समारोपात डॉ. राजेंद्र डोळके यांनी कालिदासाच्या साहित्याचा संशोधनात्मक विचार करायला हवा, असे विचार मांडले. भाऊजी दप्तरी यांच्याबद्दल बोलताना ते म्हणाले, विद्वतरत्न ही पदवी भाऊजी दप्तरी यांना लोकमान्य टिळक यांनी दिली. भाऊजी हे बुद्धिवादी होते. कालिदासांबद्दलही भाऊजींनी लिखाण केले आहे. भाऊजींनी उपनिषदांवर चार ग्रंथ लिहिले असल्याचे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक, संचालन व आभारप्रदर्शन विवेक अलोणी यांनी केले. विद्वतरत्न डॉ. के. ल. दप्तरी स्मृती संदर्भ ग्रंथालय, महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी स्मृती ग्रंथालय या नावानेही हे ग्रंथालय ओळखले जात असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी वि. सा. संघाचे सरचिटणीस विलास मानेकर, माधुरी वाडीभस्मे, डॉ. मोनाली पोफरे, तसेच दप्तरी कुटुंबिय उपस्थित होते.

## अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांचे अभिनंदन



**नागपूर** : महायुती सरकारमध्ये अन्न व औषध प्रशासनाचे कॅबिनेट मंत्रीपदी नियुक्ती झालेले नरहरी झिरवाळ यांचे शहरातील प्रसिद्ध कवी तथा दलित मित्र तान्हा नागपुरी यांनी स्वागत केले. यावेळी यशवंत तेलंग, युवा नेते विजय डोंगरे, योगेश ठाकरे, सचिन मोहोड, धर्मप्रकाश शेंडे उपस्थित होते.